

प्रगती

प्रगती

# माणूस

१५ सप्टेंबर १९६५
किंमत ३० पैसे

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
किफायतशीर गुंतवणूक

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**100 रुपयांची ठेव**

**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास १ रुपया वटणावळ अधिक पाठवावी

राजहंस प्रकाशित
पुणे

४१९ नारायण, पुणे




वर्ष पाचवे : अंक आठवा : १५ सप्टेंबर १९६५
किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

हा अंक निघू शकला हेच नशीब. कारण या पंधरवड्याच्या सुरवातीसच पुण्यात गणेशमूर्तीच्या विटंबनेचा प्रकार घडून त्यातून दंगल-जाळपोळींचा वणवा पेटला. दंगली व जाळपोळींचा बंदोबस्त करण्यास पोलीसखात्याला अपेक्षेपेक्षा जास्त विलंब लागला व पुण्याचे एकूण नागरी-जीवनच तीन-चार दिवस पार निपचित पडले. अर्थातच अंकाच्या छपाईचा खोळंबा झाला. त्यातून घाईघाईने जे सजले, उभे राहिले ते वाचकांसमोर ठेवले आहे.

□ श्री. पुरंदरे यांचा लेख आहेच.

□ प्राध्यापक मधुसूदन गोखले यांचा कुटुंबनियोजनावरील अभ्यासपूर्ण लेख हे या अंकाचे एक खास आकर्षण म्हणून सांगता येईल.

□ कथाविभाग श्री. अरविंद दीक्षित व आनंद घाटुगडे यांनी सजविला आहे.

□ 'नाझी भस्मासुर' या वेळी थोडक्यात आटोपावा लागला. पुढील एखाद्या अंकात याची भरपाई करण्याचा विचार आहे.

□ चित्रपट, नाट्य ही दोन्ही सदरे यावेळी देणे अशक्यच होते. कारण पुण्यातील संचारबंदी. आता युद्धाचे वातावरण! पुढील अंकाच्या प्रकाशनात काय काय अडचणी व विक्षेप येतील हे आजच कसे सांगणार! — संपाइक

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# दिल्ली दरबार

## □ धीरोदात्त संरक्षणमंत्री

कच्छ-सिंध सीमा करारावर स्वाक्षऱ्या होऊन अवघे ३६ दिवस लोटण्याचे आतच काश्मीरमध्ये आक्रमक पाकिस्तानने गनिमी टोळ्या धाडून उपद्रव निर्माण करण्यास प्रारंभ केल्याने दि. ८ ऑगस्टपासून दिल्ली दरबारात विचारविनिमयाची एकच गर्दी उसळलेली आहे. दि. १७ ऑगस्टपासून परिस्थिती इतक्या झपाट्याने पालटू लागली की अप्रत्यक्ष युद्धाला तोंड फुटल्यागतच अवस्था झाली. पहिल्या दोन दिवसांतच परिस्थिती इतकी चिघळली की संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाण यांना त्यांच्या वृद्ध मातोश्री अत्यवस्थ असल्याची चिंताजनक वार्ता कळूनही राजधानी सोडून मुंबईकडे जाणे शक्य झाले नाही! शेवटी दि. १९ ला पहाटे मुंबईकडे त्यांनी प्रस्थान केले; परंतु वृद्ध मातोश्रींचे निधन तत्पूर्वीच होऊन गेलेले होते! संरक्षण मंत्री कर्तव्यरत असताना काळाने त्यांच्या मातोश्रींना हिरावून नेऊन त्यांच्या कठोर कर्तव्यनिष्ठेची कसोटीच पाहिलेली आहे! वृद्ध मातोश्रींच्या निधनानंतरच तेराव्या दिवशीसुद्धा श्री. चव्हाण यांची अशीच कसोटी पाहिली गेल्याचे कळले. दि. २८ ऑगस्टला काश्मीरमधील धुमश्चक्रीला चांगलेच तोंड फुटलेले होते. पंतप्रधान, संरक्षणमंत्री व प्रमुख सेनाधिकारी यांचा विचारविमर्श जोराने चालू होऊन सीमेवर "कृती" केली जाऊ लागली होती. सुमारे एक सहस्र पाकिस्तानी हल्लेखोरांचा नि:पात करण्यात भारतीय सेनेला सफलता लाभलेली होती. अशा अवस्थेत दि. २९ ऑगस्टला मुंबईस जाऊ का नको, असा प्रश्न त्यांचेसमोर उभा ठाकला! शेवटी पंतप्रधानांची अनुमती घेऊन दि. २९ ला पहाटे मुंबईस जाऊन सायंकाळला राजधानीत ते परतलेसुद्धा. घटनाचक्राचा वेग, वैयक्तिक सुखदु:खे व कठोर कर्तव्यनिष्ठा आदि जे जीवनाचे विविध पैलू अशा प्रसंगी जनतेसमोर येतात, त्यामुळेच संकटप्रसंगी जनतेला धीर लाभून जनतेचे मनोबल वाढीस लागते. दि. २५ ऑगस्टला भारतीय सेनेने युद्धविरामरेषा ओलांडून टिटवाल क्षेत्रात आपल्या चौक्या प्रस्थापित केल्यानंतरही संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाण यांनी दि. २६ ला पहाटेच श्रीनगरकडे कूच केले. कारण भारतीय सेनेचे सर्वोच्च अधिकारी (Supreme Commander of Forces) म्हणजेच राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन त्या दिवशी श्रीनगरला भेट देऊन सैनिकांची पाहणी करणार होते. राष्ट्रपतींच्या सोबत म्हणून संरक्षण मंत्री तेथे उपस्थित होते. त्याच दिवशी दुपारनंतर ही दोन्ही बडी मंडळी (V. I. P.) श्रीनगरहून राजधानीत परतली व त्यानंतरच घोषणा

झाली की राष्ट्रपती व संरक्षणमंत्री काश्मीरमधील एका आघाडीवर जाऊन आले ! संकटकाळी नुसते साहस करून चालत नाही तर आवश्यक ती सावधानता बाळगावी लागते याचाच हा अनुपम आदर्श आहे. अपप्रचार करण्यात निपुण असलेल्या पाकिस्तानी वृत्तपत्रांनी मात्र या दोघांच्या या श्रीनगरभेटीचा उल्लेख करून लिहिले की भारतीय सेनेचे मनोबल खचू लागले होते आणि म्हणून स्वतः राष्ट्रपतींनी श्रीनगरपर्यंत धाव घेतली होती ! आहे की नाही अजब अपप्रचारी डोके !

* *

'युद्धस्य कथा रम्या' असे म्हणून आजपर्यंत भारतीय नवयुवकांना अन्यत्रच्या वीरांच्याच कथा ऐकविल्या जात असत. परंतु आक्रमक पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्यासाठी सध्या भारतीय 'जवान' जे शौर्य-धैर्य प्रकट करीत आहेत त्याला तोडच नाही. सुसज्जित अमेरिकन लढाऊ विमाने पाकिस्तानच्या संग्रही असूनही भारतीय विमानचालक भारतनिर्मित लढाऊ विमानांच्या आधारानेच शत्रूचे अतोनात नुकसान करीत असल्याच्या वार्ता गेल्या एक सप्ताहापासून राजधानीत सतत येऊन थडकू लागल्या आहेत आणि आक्रमक पाकिस्तान पंजाबवर हल्ला करून दुसरा मोर्चा उघडण्यापूर्वीच भारतीय वीरजवानांनी पाकिस्तानच्या भूमीवरच लाहोर, सियालकोट, मुझफराबाद आदि स्थानांच्या निकटवर्ती क्षेत्रांत पाकिस्तानी सेनेला थोपवून धरलेले आहे !

ही 'रम्य' वार्ता काल (दि. ६ सप्टेंबर) संसदेत संरक्षणमंत्र्यांचेद्वारा घोषित होताच राजधानीच्या राजमार्गावर 'चलो लाहोर,' 'चलो रावळपिंडी' या घोषणा होऊ लागल्या, कारण पश्चिम पंजाबमध्ये तीन स्थळांहून मुसंडी मारून भारतीय सेना आगेकूच करू लागलेली होती. ही 'रम्य' कथा सर्वत्र प्रसृत होऊन सारा देश खडबडून जागा झाल्यागत 'एक राष्ट्र' म्हणून उभा राहिलेला दिसत असल्याचे सुखद दृश्यही अनुभवावयास मिळत आहे. परंतु दि. ५ सप्टेंबरला आक्रमक पाकिस्तानने अमृतसरजवळच्या क्षेत्रात पहिला विमानी-हल्ला करून पाहण्याचा असफल प्रयत्न केल्यानंतर लगेच राष्ट्रपती, पंतप्रधान, संरक्षणमंत्री, उच्च सेनाधिकारी यांच्यामध्ये परस्पर विचारविनिमय होऊन मध्यरात्रीनंतर शत्रूला खडे चारण्याचा वज्रकठोर निश्चय करण्यात येऊन दि. ६ ला पहाटे उचित कार्यवाहीला प्रारंभही होऊन गेला. त्यानंतरच काही तासांनी संसदेत त्याची घोषणा करण्यात आली होती.

एकेका अशा 'रम्य' कथेच्या पाठीमागे किती परिश्रम, किती योजना, किती सावधानता दडलेली असते हे सवडीने शोधून काढणे मोठे उद्बोधक ठरण्याचा संभव आहे. आज एका घटनेचा ओझरता उल्लेख एवढ्याचसाठी केला आहे. कारण त्यामुळे 'रम्य' कथा रम्य कशी बसते याचा अल्पसा अंदाज युद्धापासून आजपर्यंत अनेक योजने दूर राहिलेल्या मंडळींना येऊ शकेल.




**भारत सहिष्णु आहे : दुर्बल नाही**

**अलिगड विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगी पंतप्रधान शास्त्रीजी व उपकुलगुरू श्री. तैयबजी**

## □ ऐतिहासिक विमानहल्ला

भारताला स्वातंत्र्य लाभल्यापासून भारताच्या स्वातंत्र्य रक्षणार्थ भारतीय वायुदलाचा (एअर फोर्स) सर्वप्रथम इतक्या प्रभावीपणे हल्ला करण्यासाठी उपयोग केला गेलेला आहे. या घटनेचे सर्वत्र स्वागतच होत असले तरी अद्याप अनेकांचे या विषयीचे आश्चर्य ओसरलेले नाही. त्यामुळे दिल्ली दरबारात हा योग्य व विक्रमकारी निर्णय घेण्यात आला, या विषयीच्या अनधिकृत वार्ता गप्पागोष्टींतून प्रसृत होऊ लागलेल्या आहेत. त्यांपैकी एक वार्ता शंभर टक्के विश्वसनीय आहे असे सांगणे कठीण असले तरी बव्हंशी सत्य असण्याची शक्यता असल्याने वाचकांना सादर करीत आहे. काही गोटांत अशी चर्चा ऐकावयास मिळत आहे की भारत सरकारचा हा निर्णय म्हणजे दिल्लीतील अमेरिकन राजदूत श्री. चेस्टर बौल्स (जे




भारताचे सच्चे मित्र आहेत) यांच्या अनुभवी कूटनीतिज्ञतेचा (डिप्लोमसीचा) विजय आहे ! आक्रमक पाकिस्तान सरकार अमेरिकन शस्त्रास्त्रे व विमाने यांच्या पाठबळामुळे मुजोर बनून अमेरिकन सरकारच्या इशाऱ्याला न जुमानता या युद्ध-सामग्रीच्या सहाय्यानेच भारतावर हल्ला करीत आहेत हे पाहताच ते अस्वस्थ झालेले होते, असे कळते. अशा नाजूक अवस्थेत पाकिस्तान सरकारची कानउघाडणी करण्यास खुद्द वॉशिंग्टनमधील अमेरिकन सरकार पुढे येत नाही हे पाहून श्री. बौल्स यांनी दिल्लीत एक अनपेक्षित, पण सुखद प्रतिक्रिया व्यक्त करून भारत सरकारला अप्रत्यक्षपणे पाकिस्तानची मग्रुरी (मुजोरी) नष्ट करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याचे कळते. ही प्रतिक्रिया म्हणजे अप्रत्यक्ष संकेतच समजून भारतीय वायुदलाने पहिला ऐतिहासिक हल्ला चढवून पाकिस्तानी सेनेचे अमेरिकन रणगाडे विनष्ट करण्यास प्रारंभ केल्याचे कळते. ही वार्ता प्रारंभी म्हटल्यानुसार शंभर टक्के विश्वसनीय नसली तरी अमेरिकन कूटनीतीचा (डिप्लोमसीचा) वारा कसा वाहतो आहे, याची काही कल्पना देणारी असल्यानेच येथे सादर केलेली आहे.

संकटकालीन समयी अन्य विषयांवर लिहिले तर वाचकांना रुचणार नाही व

स्वत: दरबारीसुद्धा अन्य विषयांना सध्या स्पर्श करू इच्छित नसल्याने वाचकांची येथेच रजा घेणे इष्ट, नाही का ? क्षमस्व.

[ गेल्या अंकातील दरबार उशिरा हाती आला. तो सर्व जसाच्या तसा या अंकात देणे अर्थातच अप्रस्तुत ठरेल, पण चालू युद्धाची पार्श्वभूमी समजण्यासाठी गेल्या ' दिल्ली-दरबारा'तील पुढे दिलेला थोडा भाग वाचकांना महत्त्वाचा वाटेल. –सं. ]

## थोडी पार्श्वभूमी

'काश्मीरची कटकट कशाला हवी, पाकिस्तानशी तडजोड करून टाका की या प्रकरणी !', असे म्हणणाऱ्यांची स्थिती गेल्या काही दिवसांपासून दातखीळ बसल्यागत झाली आहे ! दिल्ली दरबारात गेल्या दोन सप्ताहांत (दि. ७ ऑगस्टपासूनच) जम्मू–काश्मीरचे महाराजा श्री. करणसिंग यांनी बरीच व वेळीच जागृती निर्माण केल्यानेच भारत सरकारतर्फे काही भरीव उपाययोजना होत असून पाकिस्तानी आक्रमणाला पायबंद घातला जात आहे. अन्यथा ही कटकट हवी कशाला, याच थाटात वा अंतर्गत घुसफुशीतच सारी शक्ती खर्च होऊन गेली असती. गेल्या दोन सप्ताहांत काश्मीरमधील गंभीर परिस्थितीच्या वार्ता येथे येऊन थडकू लागल्यानंतरही येथे थंड डोक्याने चर्चा चालूच राहिली, की जम्मू–काश्मीरमध्ये एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही भारत सरकार दि. ८ ऑगस्टपर्यंत झोपलेलेच का राहिले होते ? हे सर्व जवळून पाहिले, की प्रसंगविशेषी वाटू लागते की या देशाचा जणू राष्ट्रीय गुण (?) असल्यागतच दिल्ली दरबारात चर्चा चालू होते, की याला जबाबदार कोण ? सर्व गंभीर परिस्थितीचा साकल्याने विचार करून त्या परिस्थितीवर काबू मिळविण्यासाठी तातडीचा महान प्रयत्न राहतो घटकाभर दूर व चर्चाच चालू होते की गृहमंत्रालयाचे गुप्तचर (इंटलिजन्स) याला जबाबदार, की संरक्षण मंत्रालयाचे गुप्तचर अकार्यक्षम ठरले...! हे सामान्य नागरिकाने ऐकले तर तो म्हणू लागतो की दोन्ही मंत्रालये या प्रकरणी सारखीच जबाबदार वा दोषी आहेत ! दिल्ली दरबारात बहुतेक सर्वत्र ही चर्चा संसदेच्या बैठकीच्या प्रारंभी होऊन गेल्याने संसद बैठकीला प्रारंभ झाल्यानंतर याच मंडळीकडून उलट–सुलट चर्चा पुन्हा नव्याने सुरू झालेली ऐकू येत आहे की दोषी कोण हे नंतर ठरवू. प्रथम काश्मीरला आक्रमकांच्या कचाट्यातून तर वाचवा ! दिल्ली दरबाराच्या आसमंतात अशा गंभीर प्रसंगी वैचारिक गोंधळ वा बुद्धिभेद घडवून आणण्याचे पवित्र (?) कार्य करणारी जी 'कॉमरेड' मंडळी आहेत, त्यांनी सूर लावलेला आहेच, की 'यावेळी' शास्त्री सरकार सेनेला काश्मीरमध्ये धाडण्यास काही विशेष उत्सुक नव्हते. श्री. सादिकसाहेब होते म्हणून बरे झाले. त्यांनी आग्रहच धरला म्हणून मग शास्त्री सरकारला भराभर पुढे पावले टाकावी लागली. अन्यथा काश्मीरचा कारभार आटोपलेलाच होता !

**– दरबारी**

प्रवासी बन्धूंनों...

आपलें सहकार्य

गाडींत लागणारी

# आग

टाळूं शकेल.




निर्देशित


## आगप्रतिबन्धक नियमांचें

पालन करा.

पेटती सिगरेट फेकण्यापूर्वीं विझवा किंवा राखदाणीचा (ॲश् ट्रे) उपयोग करा.



डब्यांत स्टोव्ह पेटवूं नका.



आपल्या सामानांत ज्वालाग्राही पदार्थ नेऊं नका.



प्रवासांतील सुरक्षिततेच्या हेतूने मध्य रेल्वे द्वारा प्रकाशित

# किल्ले विशाळगड

## ब. मो. पुरंदरे

### पावनखिंड यात्रेचा उत्तरार्ध

घो घो पाऊस वरसत होता. वाऱ्याने सारी झाडंझुडपं आळोखेपिळोखे देत होती. आम्ही सारेजण पावनखिंडीच्या तोंडाशी उभे होतो. झाडाझुडपांचे शेंडे आणि पानं आम्ही खिंडीत उधळीत उवळीत गर्जत होतो, 'हर हर महादेव! हर हर महादेव!'

पावनखिंडीचं रूप भीतिदायकच आहे. दोन्ही बाजूंना डोंगरांची उतरण आहे. मधे खिंड आहे. किर्र झाडीने सारी खिंड झाकून गेली आहे. ऐन खिंडीतून पाणलोट खळाळत वाहतो आहे. खिंडीतच त्याचा धबधबा होऊन तो कोसळतो आहे. आवाज घुमतो आहे. दिवसा जरी एकटादुकटा माणूस इथं आला, तरी त्याला भीती वाटेल. एकटादुकटा यायला कुणी धजावणारच नाही अन् मग रात्रीच्या वेळी? छे! त्या विक्राळ रूपाची कल्पना मनात येताच अंग शहारतं.

आम्ही खिंडीत उभे होतो. अशाच पावसात, अशाच पाणलोटात आणि अशाच झाडीत तीनशेपाच वर्षांपूर्वी झुंजलेले बाजी प्रभू आणि त्यांचे मावळे आमच्या डोळ्यांपुढं तरळत होते. पाणलोटाच्या धुम् धुम् धुम् आवाजाने खिंड भरून गेली होती. क्षणभर एका झाडाच्याखाली उभा राहून मी खिंडीकडे पाहत होतो. मन तीनशेपाच वर्ष मागे गेलं होतं.

—महाराजांची पालखी घेऊन पावणेसहाशे मावळ्यांची टोळी झाडाझुडपांतून खिंडीकडे येत होती. पाठलाग करीत येत असलेले सिद्दी मसूदखानाचे सैन्य अगदी नजीक येऊन ठेपल्याची चाहूल लागत होती. बाजीप्रभू आणि त्यांचे मावळे भिजून चिंब झाले होते. शत्रूच्या आरोळ्या मागून येत होत्या. झुडपं हलत होती. अजून विशाळगड चार कोस दूर होता. साऱ्यांच्या जिवाची उलघाल उडाली होती. मृत्यू पाठलाग करीत येत होता. आता क्षणाक्षणाला मोल चढत होते. पाठलाग चुकवून विशाळगड गाठणं अशक्य होतं. महाराजांच्या आणि बाजीप्रभूंच्या मस्तकांत वादळ उठलं होतं. आता पुढं जाणं अशक्य होतं. रोरांवत घोंगावत मागून लोंढा येत होता.

"महाराजांची पालखी ह्याच खिंडीने पुढं गेली? बाजीप्रभूंनी हीच खिंड अडविली?"



त्या विचित्र ताठ कड्यावरून धो धो पावसात आम्ही चढायला सुरवात केली.

*

कुणाच्या तरी प्रश्नांनी मी भानावर आलो. माझ्याभवती सर्वांचा घोळका होता. मी स्वतःला सावरीत म्हटलं,

"होय, होय ! हीच ती घोडखिंड. पाठलाग तोंडाशी येत असलेला पाहून बाजीप्रभूंनी महाराजांना निकरानं विशाळगडाकडे जायला लावलं. तीनशे मावळे घेऊन

महाराज ह्या ह्या ह्या वाटेने असे गेले. विशाळगड हा असा थेट आग्नेयेला इथून चार कोसांवर आहे. महाराज पुढं गेले आणि इथं सुमारे पावणेतीनशे मावळ्यां-निशी बाजीप्रभू झुंजायला उभे ठाकले. महाराज विशाळगडावर पोहोचून खुणेच्या तोफा उडवीपर्यंत बाजी इथं झुंजणार होते. ही खिंड अडविणार होते. हा असा समोरून येणारा शत्रूचा लोंढा आपल्या ढालीवर रोखणार होते. हीच ती खिंड आहे. —आणि हीच ती खिंड बाजींनी अडवली. तोफेचा आवाज येईपर्यंत अडवली. अखेर तो वाघ इथं पडला! त्याच्या रक्तानं ही भूमी ओलावलेली आहे, लालावलेली आहे!"

क्षणभर आम्ही सारेच त्या खिंडीकडे भांबावलेल्या नजरेने बघत राहिलो. हजारोंचे हल्ले मूठभरांनी रोखून धरलेलं अद्‌भुत कृत्य इतिहासाने इथं प्रत्यक्ष पाहिलं होतं. घशासारख्या ह्या अरुंद खिंडीत घटसर्पानं स्वराज्याच्या प्राण घ्यावयाचा बेत केला होता, पण बाजीप्रभूंनी आपला प्राण वेंचून स्वराज्य वाचवलं होतं; ती खिंड समोर होती. तो विशाळगड दूर धुक्याआड होता. आम्हीही विशाळगडाचा आता रस्ता धरणार होतो.

आमच्या ह्या दिंडीत सामील झालेले पुण्याचे आठ तरुण पावनखिंडीतूनच माघारी फिरणार होते. विशाळगडला यायला त्यांना वेळ नव्हता. रजा नसल्यामुळे त्यांचा मोठा विरस झाला होता. ते तेथूनच परत फिरले. मोठ्या उदास मनाने त्या आठांनी आमचा निरोप घेतला आणि ते वाटाड्याबरोबर मलकापूरच्या वाटेला परत फिरले. मलकापूर तेथून साडेदहा मैलांवर होते. तेथून एस्. टी. ने ते कोल्हापूरमार्गे पुण्याला जाणार होते.

आम्ही उरलो बाराजण. आम्ही खिंडीतून पुढच्या मार्गाला लागलो.

पावनखिंडीपासून विशाळगड आठ मैल दूर आहे. गडाच्या पायथ्यालगत गजापूर नावाचं खेडेगाव आहे. या गजापुरात आम्ही मुक्काम करणार होतो. पावनखिंडी-पासून गजापूर आहे तीन मैलांवर. ही तीन मैलांची वाट अगदी डोंगराळ आहे. डोंगराची एक एक घळ ओलांडीत आम्ही चाललो होतो. पन्हाळगडापासूनच सतत पाऊस पडत होता, पण पावनखिंडीच्या पुढे पावसाची झड फारच जोराची लागली. सहस्रावधी छिद्रांच्या अभिषेकपात्रातून सह्याद्रीला अभिषेक चालला होता. असा पाऊस कधी पाहिला नव्हता. आता आम्ही विशाळगडाच्या आसमंतात आलो होतो. ह्या भागात पाऊस पडतो तीनशे इंच! आमच्या या प्रवासात, आमच्या अंगावर त्यांतला किती इंच पाऊस पडला कोण जाणे! काळ्याभोर आभाळाखालून आणि हिरव्यागार मखमलीवरून आम्ही चाललो होतो. पाण्याचे लोट उभे-आडवे वाहत होते. काही लोट आमच्याबरोबर आमच्या दिशेने धावत होते, तर कुठं कुठं मोठे मोठे लोट आम्हाला सामोरे येत होते. प्रत्येक दगड शेवाळून हिरवा झाला होता. झाडांच्या खोडावर आणि खांद्याफांद्यांवरही शेवाळं दाटलं होतं. आम्हाला वाटलं,

आता आमच्याही अंगाखांद्यांवर शेवाळं उगवणार !

नाकाच्या शेंड्यावर येणारे पाण्याचे थेंब पुशीत आम्ही बोलत बोलत चाललो होतो. समोर सहा मैलांवर विशाळगड धुक्यात लपला होता. सारा आसमंत दऱ्या-डोंगरांनी वेढलेला होता. घुम् घुम् घुम् असा आवाज घुमत होता. कसला ? धबधब्यांचा ! पावनखिंडीच्या पायथ्याशी पाच धबधबे कोसळतात आणि हे पाच प्रवाह एकरूप होऊन भरधाव वाहत असतात. ह्या पंचप्रवाहाला रूप येतं नदीचं. हीच ती कासारी नदी. कासारीची तबियत आज तर भयंकरच बिथरलेली होती. चवताळलेल्या वाघिणीसारखी ती रोरावत झेपावत होती. भोवरे उठत होते, पण इथं दिसणारा भोवरा एकदम पंधरा हात भिरकावला जात होता. तिच्या काठांवरच्या वृक्षांवरून लोंबणाऱ्या रानवेलींना सतत त्या प्रवाहात झोके बसत होते.

आम्ही कासारीच्या कडेकडेने ऐलतीरावरून चाललो होतो. गजापूरचा रोख धरलेला होता. गजापुरास जाण्यासाठी आम्हाला कुठं तरी कासारी ओलांडावीच लागणार होती. कारण गजापूर पैलतीरावर होतं. कासारीचं पात्र फारसं रुंद नव्हतं. असेल फार तर तीस-पस्तीस हात. पुढं अर्ध्या मैलावर कासारीला 'साकव' होता. साकव म्हणजे रानवेलींचा आणि बारीक बारीक, पण चिवट खांद्याकाटक्यांचा विणून केलेला पूल. ऐलतीरावरची दोन आवळीजावळी झाडं आणि पैलतीरावर समोर असणारी अशीच झाडं पाहून नदीनाल्यावर असे साकव बांधतात. एकप्रकारे हा झुलता पूलच असतो. इकडच्या भागातील शेतकरी असे साकव बांधण्यात फार कुशल आहेत.

आम्ही साकवाच्या रोखाने चाललो. उजव्या हाताला कासारी पिसाट धावत होती. तिच्या रागाला बळी पडलेलं एक झाड तिच्या झपाट्यात गवसलं होतं. ती त्याच्या झिंज्या धरून त्याला फराफरा ओढीत घेऊन चालली होती. पाऊस पडतच होता. आता ह्या पावसाचं काहीच वाटेनासं झालं होतं.

आम्ही साकवाजवळ येऊन पोहोचलो. दोन्ही तीरांवरची समोरासमोरची झाडं पाहून त्यांच्या कैचीत हा साकव गुंफला होता. बिनकठड्याचा हा अरुंद झुलता पूल दिसत होता भारी भारी डौलदार. रुंदी होती कशीबशी चारच वितीची. कठडा नाहीच ! माणूस त्यावरून चालायला लागला, की हा साकव डुगडुग हलतो ! खाली पाहून चालावं, तर ती तुफानी वेगाने गिरक्या-फिरक्या घेत चाललेली नदी दिसते. डोळे गरगरू लागतात. समोर पाहून चालावं, तर गुंफणीतल्या आडव्या काठ्याखांद्याला अडखळून नदीत पडायची भीती वाटते. पाठीवर सामान बांधलेलं असल्यामुळे नदीत पडण्याची कल्पनाही सहन होईना. पाठीशी धोंडा बांधून जीव देण्यातलाच प्रकार घडला असता. यापूर्वी मी काहीवेळा अशा भरलेल्या नद्या आणि ओढे पोहून ओलांडले होते. २ ऑगस्ट, १९५४ रोजी नगरेहवेलीत घुसताना अनेकांच्याबरोबर मीही एक फार मोठा प्रवाह पोहून पार केला होता. इतरत्रही बऱ्याचदा. हा कासारीचा

अवतार पाहिल्यावर मी सहज माझ्याच मनाला म्हटलं, 'काय राजे ? पोहून जाल का पैलाड ?'

मनं काही पटकन् 'हो' म्हणेना !

साकवावरून एका वेळी एकच माणूस पैलतीरावर येऊ शकतो. एकापेक्षा अधिक माणसं एकदम येऊ लागली, तर धोकाच. आमचे सारे शिलेदार साकवावरून नदी ओलांडत असताना माझ्या मनात असा एक प्रश्न उभा राहिला, की महाराजांना व त्यांच्या मावळ्यांना ही कासारी ओलांडूनच विशाळगडाकडे जावं लागलं असणार. कासारी टाळून गडाकडे जाणं अगदी अशक्यच आहे. मग महाराज व त्यांचे मावळे कसे गेले असतील ? त्यावेळी असा साकव असेल काय ? असेलही, पण त्यावेळी गडावर वाऱ्याच्या वेगाने पोहोचावयाची निकड असताना ते असेच एक एक, एक एक साकवावरून उतरले असतील का ? आम्हाला साकव ओलांडायला प्रत्येकी सुमारे एक मिनिट लागलं. महाराजांबरोबरच्या मावळ्यांना कदाचित् प्रत्येकी अर्धा मिनिट पुरेसं असलं तरीही तीनशे मावळ्यांना साकव ओलांडायला फारच वेळ लागणार. नाही का ? मग त्यांनी कासारी कशी ओलांडली असेल ? ऐतिहासिक कागदांत यासंबंधी काहीही उल्लेख नाही, पण असा तर्क धावतो, की त्या आणी-बाणीच्या प्रसंगी बहुसंख्य मावळ्यांनी ह्या नदीत उडी घेऊन ती पोहूनच ओलांडली असेल. एरवी इतक्या लोकांना झटकन् नदी पार करणं अशक्यच होतं.

आम्ही साकव ओलांडून चालू लागलो. गजापूर दिसत होतं अवघ्या एक फर्लांगा-वर. अगदी लहानसं गाव आहे हे. इथं आमचे एक मित्र राहतात. त्यांचं नांव गणपतराव सीनकर. आम्ही गावात शिरलो अन् समोरच एका खोपटाशी दहा-बारा पोलीस दिसले ! इतके पोलीस इथं धो-धो पावसात कशाला आले बुवा ? मग समजलं, की इकडच्या जनतेला अन्नधान्य मिळत नाही, म्हणून सत्याग्रह होणार होता, म्हणून हा बंदोबस्त होता. मला मोठं कुतूहलच वाटलं. इथं सत्याग्रह करणारे, सत्याग्रह करणार म्हणणे नेमकं करणार तरी काय ? इथं साम्राज्य पावसाचं, पर्वतांचं आणि किर्र झाडाझुडपांचं. ह्या सत्याग्रहींनी मिरवणूक काढली तर बघणार तरी कोण ? अन् तसं पाहिलं तर ह्या भागातली सारीच माणसं अन्नसत्याग्रह —म्हणजे उपोषण—रोज घरोघर करीतच आहेत. मी नंतर एका शेतकऱ्याच्या पोराला सहज कुतूहलाने विचारलं,

"आज तुझ्या घरी जेवायला काय केलं होतं रे ?"

"काय नाय जी ! फनसाच्या आठळ्या शिजून मीठ घालून खाल्ल्या !"

"काल रात्री काय काय जेवलास ?"

"काल राती बी ह्येच खाल्लं ! "

"फणसाच्या आठळ्याच ? भात-भाकरी नाही ? "

"न्हाई ! आंब्याच्या कोयीतलं बाठं शिजवून खाल्लं, पर त्येबी खल्लास झालं."



**तीनशे वर्षांपूर्वी महाराज आणि मावळे असेच साकवावरून गेले असतील का ?**

★

" धान्य मिळत नाही तुम्हाला ? "

" उलीउलीसं मिळतं. पुरत न्हाई. "

ह्या पोलीसपार्टीबरोबर ह्या भागाचे मामलेदारही आलेले आम्हाला भेटले. आम्ही शाळेत मुक्काम ठोकला. शेकोटया पेटवल्या आणि कपडे वाळवण्यास सुरवात केली. गणपतराव सीनकरांनी आमच्यासाठी फार कष्ट घेतले. आमची जेवणंखाणं झाली, तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. ह्या भागात सकाळ, दुपार अन् संध्याकाळ सारखीच दिसते. ढगाळ, धुकट, अंधारलेली.

जेवणानंतर आम्ही विशाळगडास जाण्यासाठी निघालो. बरोबर सामानाची ओझी घेतलीच नाहीत. रात्रीच्या मुक्कामाला पुन्हा गजापुरातच यायचं ठरवलं होतं. त्यामुळे रिकाम्या हातांनी आमच्या सडया स्वाऱ्या निघाल्या. रेनकोटाचा काडी-इतकाही उपयोग होत नाही, हा अनुभव लक्षात घेऊन बापूसाहेब गणपुले यांनी फक्त हाफपँट आणि अंगात गंजीफ्रॉक घातला होता.

गजापुरातून बाहेर पडलो आणि एक एक दांडगा ओढा भेटू लागला. अप्पासाहेब दांडेकर नेहमीसारखे अगदी पुढं होते. त्यांच्या पायात गमबूट होते आणि अंगावर त्यांनी खास शिवून घेतलेला निळया रेग्झिनचा रेनकोट होता. हा रेनकोट त्यांनी

बॉयलर सूटसारखा शिवला होता. डोक्याचं टोपडंही ह्या रेनकोटाच्या अंगचंच शिवून घेतलेलं होतं. असं हे अंगडंटोपडं घातल्यावर अप्पासाहेब फारच बाळसेदार दिसत !

अप्पासाहेब दांडेकरांचं झपझप चालणं आणि ताड ताड ताड डोंगर चढणं पाहिलं, की यांना एकावन्नावं वर्ष लागलंय, हे पटतच नाही. आमच्यातला कुणी फार मागे पडला की मी म्हणे,

"बघा बघा तो पन्नाशीचा गडी कसा चाललाय वाघासारखा ! नाही तर तुम्ही !"

त्यावर एकदा आमच्यातल्या एकानं मला सुनावलंच. म्हणाला,

"आजकाल असंच आहे ! "

"कसं आहे ? "

"तरण्यांचं झालंत कोळसं अन् म्हाताऱ्यांना आलंय् बाळसं ! "

आता काय बोलायचं ?

गजापुरापासून सुमारे अर्धा मैल पुढं आलो. वाटेत ओढे लागतच होते. एक-मेकांचे हात धरून साखळीने आम्ही ओढे ओलांडीत होतो. ओढयांना ओढ भयंकरच होती. तसंच शेवाळयाने सारी वाट निसरडी बनली होती. पाऊस तर कधीच थांबत नव्हता. आकाशाची पखाल फाटली होती. निसरडयावरून कुणी घसरलं की बाकीचे सारे हसत होते. मी अजून एकदाही कुठे पडलो नव्हतो.

पावलं गडाच्या पायथ्याकडे पडत होती. तेवढयात कानावर जोराचा खळखळाट येऊ लागला. आम्ही जाणलं, की नजीकच जोरदार ओढा असणार ! अन् खरो-खरच एक मोठा थोरला ओढा दुथडी भरून सुसाट वाहत होता. आघाडीला अप्पासाहेब आणि राम डिबळे हे दोघेजण होते. अप्पासाहेब रामचा हात धरून ओढयात उतरले. पाण्याच्या वेगामुळे झोकांडया जात होत्या. अप्पासाहेब ओढयाच्या मध्यापर्यंत रामचा हात धरून चालत गेले. पाणी कमरेइतकं होतं. हा ओढा नजीक त्या भयंकर कासारीला सामील होत होता. अप्पासाहेब जपून चालले होते. तेवढयात एकदम अप्पासाहेबांचा हात राम डिबळेच्या हातातून सुटला ! अतिशय झपाटयाने अप्पासाहेब धारेला लागले. गेले गेले ! एकदम ओरडा झाला,

"गेले ! धरा धरा त्यांना ! "

क्षणभर एकदम काळजात वीज लकाकली. मी अप्पासाहेबांच्या मागोमागच होतो. मी एकदम त्यांच्यावर झडप टाकली. मला त्यांचा हातच गवगला. मी त्यांना घट्ट पकडलं, पण पाण्याचा जोर इतका होता, की मीही निसटलो ! मीही धारेत भरकटलो गेलो. मुकुंदा गोंधळेकर आणि वसंतराव पेंढारकर एकदम धावले. राम डिबळेही अप्पांना धरायला धारेत घुसत होता. वेळीच मदतीचे हात आल्यामुळे सारे घडपणे पैलतीराला गेले. मुकुंदाची चपळाई चांगलीच प्रत्ययाला आली. राम डिबळेही मोठा अवधानी. एक-दीड मिनिट जरी उशीर झाला असता तरी अप्पा-



एकदम ओरडा झाला, " गेले ! धरा धरा त्यांना ! "

*

साहेब दांडेकर कासारीला सामील झाले असते ! आम्ही लगेच ह्मत–खिदळत पुढे चालू लागलो. अप्पासाहेबांच्या गमबुटांत पाणी शिरल्यामुळेच ते निसटले व धारेला लागले. त्यांना धारेत पडलेले दिसताच थोडचा अंतरावर शेतात काम करणारे दोन शेतकरी धावत निघाले. पण जर अप्पासाहेब कासारीच्या कल्लोळात दाखल झाले असते तर ? त्यांना वाचवणं फारच कठीण होतं. ह्या प्रकाराने अप्पासाहेब जरासे गंभीरच झाले.

आम्ही सारे मुकुंद गोंधळेकरची अन् राम डिंबळेची कौतुकं गात चाललो होतो. पुढचे ओढे ओलांडताना फार दक्षता घेत होतो. एक ओढा फारच मोठा होता, पण त्यावर साकव होता.

आम्ही गडाच्या ऐन पायथ्याशी पोहोचलो. आता तर दाट धुकंच होतं, पण एरवीही पायथ्याशी पोहोचलो तरी विशाळगड दिसत नाही. गडाच्या पूर्वेला उभा असलेला प्रचंड पहाड चढून गेल्यानंतरच गडाचं दर्शन घडतं. हा प्रचंड पहाड व गड

यांच्या दरम्यान भयंकर खोल दरी आहे. जणू काही हा राक्षसी खंदकच आहे. हा पहाड आणि गड यांना जोडणारा पुढं एक चिंचोळा मार्ग भेटतो. हा मार्ग जर बंद केला, तर गडावर जाणं अशक्यच आहे.

गडाच्या पायथ्याशी अनेक ऐतिहासिक खाणाखुणा आजही आहेत. इथं एक बाजारपेठ होती. तिची आता केवळ भिताडं उरली आहेत. औरंगजेबाने गडाला जेव्हा वेढा घातला, तेव्हा शाही फौजेसाठी अनेक विहिरी आणि झरे खोदण्यात आले. हे झरे व विहिरी आजही कायम आहेत. हा शाही वेढा दि. २७ डिसेंबर, १७०१ पासून २७ मे, १७०२ पर्यंत चालला होता. औरंगजेब स्वत: आलेला होता. त्याचा तळ जिथं पडला होता त्याला 'बादशहाचा माळ' असं नाव पडलं. तेच आजही रूढ आहे.

इथंच पायथ्याशी गोडे घराण्यातील एक स्त्री सती गेली. तिचं वृंदावन आहे. ह्या वृंदावनातच एक प्रचंड झाड फोफावलं आहे! गोडे ह्या कऱ्हाडा ब्राह्मण घराण्याचा विशाळगडाशी मराठेशाहीत फारच निकटचा संबंध होता. गडावर गोड्यांचा वाडाही होता. आता तिथं केवळ पडकी भिताडं शिल्लक आहेत. अमृतराव पंतप्रतिनिधींच्या पदरी गडावर नारो रायाजी गोडे हा मोठा कर्तबगार माणूस होता.

आम्ही पहाड चढत होतो. विशाळगडाला असे काही भयंकर कडे आहेत, की असे कडे दुसऱ्या कोणत्याही गडाला नाहीत. त्यांचं स्वरूप फारच भयप्रद आहे. आम्हाला आता गडाचं धूसर दर्शन घडत होतं. धुक्याच्या पडद्यामागून गडाचा प्रचंड देह विरळ विरळ दिसत होता. धुक्याच्या लाटा वाऱ्यावर उधळत होत्या. मोठमोठे धबधबे गडाच्या अजस्र ताठ कड्यांवरून कोसळत होते. एखाद्या अती अती प्रचंड शिवलिंगावरून दुधाच्या धारा निथळाव्यात, तसं ते गडाचं दर्शन होतं. गाभाऱ्यात लघुरुद्राचे स्वर घुमावेत तसे ते धबधबे खाली खोल खोल दरीत कोसळत घुमत होते. वारा वाढत्या वेगाने वाहत होता. त्या दऱ्या, ते कडे, ती किर्रर्र झाडी, ते धबधबे, तो मुसळधार पाऊस, तो घुमणारा आवाज, ते धुके आणि ह्या रौद्र वातावरणात शतकानुशतकं उभा असलेला तो मराठ्यांचा खेळणा ऊर्फ विशाळगड म्हणजे एक अद्भुत चमत्कार आहे. सह्याद्रीने महाराष्ट्राला बहाल केलेला हा एक अपूर्व नजराणा आहे. असल्या अचाट खांद्याबांध्याचा गड महाराष्ट्रात दुसरा नाही. महाराष्ट्रातच काय, पण उभ्या हिंदुस्थानच्या दौलतीत दुसरा नाही. अर्जुनाला श्रीकृष्णाने विश्वरूप दर्शन घडवलं. अर्जुन मांबावला तेव्हा. सह्याद्रीही आपलं रौद्र दर्शन आम्हाला घडवीत होता, विशाळगडच्या रूपाने. त्या रौद्ररूपाचं वर्णन करायला शब्दच नाहीत. आम्ही मांबावलेल्या नजरेनं विशाळगडाकडे बघत होतो. तो आमच्या डोळ्यांत मावतच नव्हता. मी विशाळगडला पूर्वी तीन-चारदा येऊन गेलो आहे. ते अचाट कडे पाहून मी पूर्वीही दचकलो आहे. दिपलो आहे, पण आजचा हा ऐन

आषाढातला त्याच्या अभ्यंगस्नानाचा सोहाळा खरोखर अपूर्वच. आमच्या हृदय-सिंहासनावर आज विशाळगडाला राज्याभिषेक होत होता. मी खरोखर नकळत डोळे मिटले. प्रत्यक्ष डोळयांना न साहवणारं ते अती रौद्र पण रम्य दर्शन अखेर मी मन:चक्षूंसमोर घेत होतो. विशाळगडाचं खरं दर्शन घ्यायचं असेल तर ते आषाढी पावसातच. मदोन्मादाने धुंद झालेला जणू इंद्राचा हा ऐरावतच.

विशाळगड फार प्राचीन दुर्ग आहे. याचं प्राचीन नाव खिलगिला. त्याचंच पुढं 'खेळणा' झालं. याची उंची समुद्रसपाटीपासून ३३०० फूट आहे. दक्षिणोत्तर रुंदी आहे ३२०० फूट आणि पूर्व–पश्चिम लांबी आहे १०४० फूट. पंख पसरून भरारी मारणाऱ्या गरुडासारखा याचा थाट आणि आकार आहे. मरसिंह शिलाहार राजाच्या अमलाखाली हा गड इ. स. १०५८ मध्ये होता. त्यावेळी किल्लेदार होता मरसिंहाचा चुलता गुहाल शिलाहार. शिलाहार घराण्यातला शेवटचा राजा भोज (इ. ११७८ ते १२०९). याच राजाने विशाळगडावरचे 'भूपाल तळे' बांधले असा समज आहे. बहुधा ते खरं असावं. गडावर आज अस्तित्वात असलेली सर्वांत जुनी वास्तू म्हणजे हे तळेच आहे.

शिलाहारांनंतर इथं यादवराजांची सत्ता आली. यादवराज्य इ. स. १३१८ मध्ये पूर्णपणे बुडालं. मुसलमानी रियासत सुरू झाली. ह्या आक्रमणाखाली मोठीमोठी साम्राज्यं जमीनदोस्त होत होती, पण विशाळगड मात्र ह्या भयंकर शक्तीला न जुमानता दीडशे वर्षं स्वातंत्र्यात नांदत होता. कोकणातील शिर्के नावाच्या एका लहानशा मराठा राजाचं राज्य आणि विशाळगडावरील मोरे नावाच्या अशाच एका मराठ्याचं राज्य मुसलमानांच्या रावणी आक्रमणाला धुरळयासारखं फुंकरून टाकीत होतं. ही राज्यं बुडवून खेळणा ऊर्फ विशाळगड जिंकण्याचा प्रयत्न सुलतानांनी अटोकाट करून पाहिला, पण सह्याद्रीने आणि सह्याद्रीच्या शूर सुपुत्रांनी त्यांची दाणादाण उडवून दिली. गनिमी कावा जन्मला सह्याद्रीच्या अन् त्यातल्या त्यात ह्या विशाळगडाच्या कुशीतच.

इ. स. १४५३ सालातली गोष्ट. कोकणातील शिर्के राजाला पार मोडून काढण्यासाठी बहमनी सुलतान अलाउद्दीनशाह याने आपला एक शूर सरदार मलिक उत्तुजार यास कोकणात स्वारीवर पाठवले. मलिक मोठी थोरली फौज घेऊन शिर्क्यांच्या किल्ल्यावर चालून आला. मलिकची फौज सामान्य नव्हती. ती शूर होती. क्रूरही तशीच होती. मलिक येत असलेला पाहून शिर्के राजा मलिकला एकदम शरणच गेला. मलिकला मग जास्त अवसान चढलं. त्याने शिर्के राजाला साफ साफ जबाब दिला, की मुसलमान झालास तरच जगशील! नाही तर कत्तल! बोल, मरायचंय् का जगायचंय्?

शिर्के राजा दीन होऊन म्हणाला, 'मी होतो मुसलमान!' मलिकला त्या उत्तरानं अस्मान ठेंगणं झालं. त्याची सारी फौज विजयानंदानं गरजली, 'झिंदाबाद!

झिंदाबाद ! !'

पण तेवढ्यात शिर्के राजा म्हणाला, 'मी मुसलमान होतो; पण आमच्या शेजारच्या त्या खेळणा गडावरचा तो शंकरराय मोरे मला नंतर त्रास देईल. म्हणून आपण त्याच्यावरही स्वारी करू. तो आपल्यापुढं टिकणार नाही. तो पराभूत तरी होईल, नाही तर शरण तरी येईल. मग त्यालाही बाटवू. तो बाटला, की मग मला त्रास होणार नाही. मी तुमच्याबरोबर मदतीला येतो. आपण खेळण्यावर स्वारी करू !'

हे मलिकला पटलं. तो खरोखर निघाला. शिर्क्यांनी मलिकला त्याच्या फौजेनिशी खेळण्याच्या घनदाट जंगलात आणि त्या महाभयंकर दऱ्याकपाऱ्यात आणलं. किती भयंकर होता हा भाग ? हा भाग इतका भयंकर होता की 'त्या घोर अरण्यास भिऊन मर्द वाघही गर्भगळीत व्हावा ! वाटा वाकड्या-तिकड्या होत्या. पर्वतांचा तो अक्राळविक्राळ देखावा पाहून प्रत्यक्ष राक्षस आणि भुतेही दचकून जावीत. इथं सूर्याचा कवडसाही पोहोचू शकत नव्हता. तीनही बाजूंना अस्मानाला भिडलेले पहाड ! वाराही धड वाहू शकत नव्हता. धड चालताही येत नव्हतं. विश्रांतीसाठी अंगभर मोकळी जमीनही नव्हती. चालून चालून थकलेलं मलिकचं सैन्य त्या गहन सह्याद्रीच्या दाढेत विश्रांतीसाठी पडलं' अन् त्याचवेळी शिर्के राजाने गुपचूप लपतछपत खेळणा गाठला आणि त्याने गडावरच्या शंकरराय मोरेला सांगितलं की गड्या चल ! शिकार तुझ्या दाराशी आली आहे !

लगेच शंकरराय गडावरून आपली मराठी वानरसेना घेऊन उतरला आणि त्याने मलिकवर एकदम झडप घातली. वेळ रात्रीची ! शंकररायाने आक्रमकांच्या अक्षरश: चिंधड्या उडवल्या. मलिकसकट अकरा हजार मुसलमानांची त्याने खांडोळी उडवली. त्याचवेळी भयंकर वादळ सुटले ! करकरणाऱ्या झाडांचा आवाज आणि मरणाऱ्या हशमांच्या आरोळ्यांनी ते रान खांडववनासारखं कोंदून गेलं. आक्रमकांचा पार् चुराडा उडाला. शंकरराय आणि शिर्के राजा हसत होते.

असा आहे हा विशाळगड आणि त्याचा परिसर. मलिकची दाणादाण त्या भयंकर दऱ्याकपाऱ्यांत कशी उडाली असेल, याची कल्पना आम्हाला पुरेपूर येत होती. हा विशाळगड मराठ्यांच्या गनिमीकाव्याचा आद्य गुरू आहे.

इ. स. १४६९ मध्ये बहमनी सुलतानाचा वजीर महंमद गवान स्वत: विशाळगडावर चालून आला. त्याने एक वर्षभर अविश्रांत यत्न केले, तरीही गड मिळेना, पण इ. स. १४७० च्या डिसेंबरात गवानला गड मिळाला ! असा कसा मिळाला ? फितुरीमुळे अगदी चटकन् मिळाला ! घरातच घरभेदे निघाले, तर तो सह्याद्री तरी काय करील ? तो हिमालय तरी काय करील ?

इ. स. १४७० च्या डिसेंबरपासून इ. स. १६५९ च्या डिसेंबरपर्यंत विशाळगड असाच गुलामगिरीत पिचत होता. अखेर त्याची भाग्यरेखा उजळली. अफजलवधानंतर

शिवाजीमहाराजांनी थेट पन्हाळा–खेळण्यापर्यंत धडक मारली आणि सारा मुलूख आणि हे गड काबीज केले. तेव्हापासून इ. स. १७०२ पर्यंत खेळणा स्वराज्यात होता. इ. स. १७०२ मध्ये औरंगजेबाने पाऊण लाख फौजेनिशी पाच महिने वेढा घालून हा गड घेतला, पण इ. स. १७०७ मध्ये औरंगजेब मेल्यावर गड पुन्हा स्वराज्यात आला. कोल्हापूरच्या विभक्त मराठी राजवटीने हा गड कृष्णराव प्रतिनिधींना दिला. विशाळगडकर प्रतिनिधींच्याच ताब्यात हा गड इ. १९४८ पर्यंत होता. नंतर संस्थान विलीन झालं.

धुक्याचे लोट गडाला बिलगून उसळत होते. वारं फार सुटलं होतं. इतिहासाची असंख्य पानं माझ्या डोळ्यांपुढून सरकत होती.

आम्ही आता गडाचा ऐन चढाव चढत होतो. गडाला सुंदर दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. ह्या पायऱ्या ऐतिहासिकच आहेत. एक एक पायरी लांबरुंद. अप्पासाहेब अगदी पुढं होते. ते एका कड्याच्या वळणावर वळले आणि उजव्या बाजूला असलेल्या कड्यावरून गड-गड-गड-गड करीत एक मोठा धोंडा धाडकन् त्यांच्यासमोर पडला ! पाणी उडालं ! थोडक्यात चुकलं ! ही दुसरी हुलकावणी! अप्पासाहेब जरा अधिकच गंभीर झाले.

गडाच्या त्या प्रशस्त आणि वळणं घेत घेत वर चाललेल्या पायऱ्यांच्या राजमार्गावरून आम्ही चालू लागलो. खरोखर हे पायऱ्यांवरून खळाळत येणारं पाणी फार फार छान दिसत होतं. प्रत्येक पायरीला प्रवाहाला घडी पडत होती. तांबूस रंगाच्या शालूच्या निऱ्या जणू डोंगराच्या उतरणीवर जराशा उलगडून ठेवल्या होत्या अन् वाऱ्याने जणू त्या अलगद फडफडत होत्या. – पण प्रत्येक पायरी पाण्याखाली शेवाळ्याने बुळबुळीत झाली होती ! आमच्यापैकी काही साथी चढता चढता घसरत होते, पडत होते. छान दिसत होतं ते !

माझं लक्ष डाव्या हाताला असलेल्या एका ताठ कड्याकडे गेलं. त्या कड्याला बिलगून एक मोठा थोरला धबधबा वरून खाली–खाली म्हणजे पाचशे फूट खाली दरीत कोसळत होता. धो धो पावसाचं पाणी त्या कड्यावरून मलमलीच्या ओढणीसारखं निसरत होतं. इथंही बुळबुळीत शेवाळं होतंच, पण कड्याला जरा खाची होत्या. माझ्या मनात एक वेड आलं. मी माझ्याबरोबरच्या मित्रांना थांबवलं अन् म्हटलं,

"माझ्या मागनं येता का ? ह्या समोरच्या कड्यावरून चढून जाऊ ! एकदम वर पोहोचू आपण ! 'वर' म्हणजे गडावर ! "

अन् काय नवल बघा ! सारे तयार झाले की ! अशा बाबतीत बापूसाहेब गणपुले नेहमीच पुढं. त्या विचित्र ताठ कड्यावरून धो धो पावसात आम्ही चढायला सुरवात केली. लगतच धबधबा पिचकाऱ्या उडवीत होता. जर का पाय किंवा हात निसटला तर–तर पाचशे फूट खोल दरीत मृत्यूच ! प्रेतसुद्धा हाती लागणार नाही. वसंतराव पेंढारकर, माधवराव ताम्हणे, शरच्चंद्र गुप्ते, लक्ष्मण घैसास वगैरे आम्ही

तो कडा शिडीसारखा चढत होतो अन् माझाच पाय जरासा—म्हणजे फार तर एक दीड इंचच घसरला. पडलो नाही, पण त्या क्षणी अंगातून उठून गेलेले शहारे, कोरडी पडलेली जीभ आणि धडधडू लागलेली छाती मी या जन्मात कधी विसरणार नाही. लगतचा धबधबा घुमत होता. जणू काही आम्ही त्या धबधब्याला दोरीसारखे धरूनच तो कडा चढत होतो. '

सारेजण सुखरूप या वेडातून 'पास' झालो. वर पोहोचल्यानंतरच केलेल्या वेडेपणाची भीती वाटू लागली ! वरून खाली डोकावून पाहिलं ! भयंकरच ते ! कुणी तेव्हा काहीही म्हणालं नव्हतं, तरीही मी धारेत बोललो,

" अरे, जिवाशी अशा दांडगाया करायचं हेच वय आहे ! घ्या वेडेपणा करून ! ह्या वयात सह्याद्रीसारखा दुसरा दोस्त खेळायला मिळायचा नाही ! "

आम्हा सर्वांच्याच चेहऱ्यावर काही एक न्याराच आनंद उमलला होता. त्यावर पावसाचे शिपकावे बसत होते. आम्ही हा शॉर्टकट् घेतल्यामुळे आम्ही आमच्यापुढे गेलेल्या तुकडीच्या आधीच वर पोहोचलो.

आम्ही गडाच्या माथ्यावर पोहोचलो आणि गडावरून दिसणारं अनुपमेय सृष्टि-सौंदर्य पाहून जो तो एकमेकांना निसर्गाच्या त्या गमती दाखवू लागला. ती सारी लूट साठवून घ्यायला हे दोन डोळे अपुरे पडत होते. आमचा सह्याद्री खरोखर किती श्रीमंत आहे ! लक्षावधी अलंकारांनी तो नखशिखांत नटला होता.

पण काय योग पाहा ! आम्ही गडावर गेलो आणि त्या धो धो पावसाच्या जोडीला तुफानी वादळ सुरू झालं. भयानक वादळ. गडावरची झाडं कराकरा लवू लागली. वाऱ्याचा वेग राक्षसी होता. आमच्या झोकांड्या जाऊ लागल्या. पावसाच्या धारांचा मार आमच्या तोंडावर इतका तडाखून होऊ लागला, की तो आम्हाला असह्य होऊ लागला. आवळे चोचावेत तशा त्या दाभणटोकी जलधारा आम्हाला चावू लागल्या. गणपुल्यांच्या अंगावर रेनकोट नव्हता, फक्त हाफपँट अन् बनियन. त्यांचं अंग तर माऱ्याने लालीलाल झालं. आजपर्यंत आम्हाला इतकं कुणीच थोबाडून काढलं नव्हतं. भयंकर मार खात होतो आम्ही. तरीही आम्ही हसत होतो. गडावरची तळी, विहिरी आणि टाकी अथांग भरून वाहात होती. गडावर चार सहा खोपटं होती. त्यांत लोक राहात होते. अशा पावसात आणि सदैव वाहणाऱ्या पावसाळी वादळात ही माणसं इथं राहतात ! आजचं वादळ भयंकरच होतं. माधवराव ताम्हण्यांना मी विचारलं,

" ह्या वादळाचा वेग किती असेल ? "

" नक्की सांगणं कठीण, पण ताशी शंभर मैल खासच ! त्याहून कमी नाही. "

माधवरावांना अशा विषयांचा फार छंद आहे. खूप अभ्यास केला आहे त्यांनी.

वादळामुळे चालताना आमच्या झोकांड्या दारूबाजासारख्या जात होत्या. आम्ही चार–चार जणांचं कोंडाळं करून एकमेकांना बिलगून चालत होतो. रेनकोटात वारा

घुमून ते फुगत होते. फडफडत होते. वादळाने धुमाकूळ मांडला होता. वादळाचा आवाज भयंकर रोरावत होता. तेवढ्यात लक्ष्मण घैसासांनी सहज मागे वळून पाहिलं. एकदम हर्षावून ते ओरडले,

" अरे, ते बघा ! ते बघा !"

वा ! विलक्षण ! विलक्षण ! अपूर्व ! असामान्य ! ते पाहून आम्ही तो पावसाचा मारा विसरलो. खरोखर त्याला तोड नव्हती. काय होतं ते ? समोरच्या डोंगराच्या कड्यावरून कोसळणारे धबधबे त्या तुफानी वाऱ्याच्या फुंकरीने उलटे फिरत होते ! वाऱ्याचा मारा इतका होता, की मोरांच्या पिसाऱ्यासारखे धबधब्यांचे फवारे नाचत होते. छोटे छोटे धबधबेही उलटे फिरत होते. गिर्रेबाज कबुतरं पिसारा उभारून घुमत राहावीत तसे ते दिसत होते. पाण्याचे हे पंखे समोर फडफडत होते. आम्ही सारे खळाळत्या पाण्यात उभे राहून ते प्रपातनृत्य बघत होतो. केवढी मजा ती ! असं आम्ही कधी पाहिलं नव्हतं. वारा पश्चिमेकडून पूर्वेकडे भन्नाट सुटला होता. काही धबधबे उत्तर अन् दक्षिण दिशांना कोसळत होते. ते ह्या वादळाने उधळले जात होते. त्यांची धार खाली तळापर्यंत पोहोचतही नव्हती.

गडावर शेती करणारे काही शेतकरी आपल्या खोपटाच्या तोंडाशी बसले होते. आम्हाला अशा पावसात गडावर आलेलं पाहून त्यांना मोठा ' चिमित्कार ' वाटला. मी एकाला विचारलं, ' असं वादळ रोजच असतं का ?' त्यावर तो म्हणाला,

" वावटळ जोरकस असती, पन् इकती न्हाई. आज लईच दांडगावा मांडलाय. झाडांची हिरवी पानंबी सडा सडा उडत्याती बघा ! "

खरोखर झाडांची हिरवी पाने तुटून वाऱ्यावर उडत होती. वाऱ्याचा जोर व्यक्त करणारी ही खूण आमच्या लक्षात तेव्हा आली.

गडावर एक भव्य दर्गा आहे. मलिक रेहान नावाच्या पुरुषाचा हा दर्गा. बिनपावसाच्या दिवसांत इथं दर्ग्याच्या दर्शनासाठी लोकांची रीघ लागते. दोन महिन्यांपूर्वी (दि. १९ मे, ६५ रोजी) आम्ही इथं आलो होतो. त्यावेळी खूपच गर्दी होती. दर्ग्याचं बांधकाम अर्वाचीन आहे. निदान दोन लाख रुपये खर्च करून हे बांधकाम झालेले असावे. स्वतंत्र यंत्र बसवून विजेचे दिवेही लावण्यात आलेले आहेत. निदान एक लाख लोक सबंध वर्षात मिळून गडावर येऊन जातात. त्या प्रमाणात आर्थिक उलाढाल केवढी होत असेल याचा अंदाज करावा. दर्ग्याचा थाट उत्तम आहे.

जवळ एक शिवमंदिर आहे. विशाळगडकर भगवंतराव प्रतिनिधींनी हे इ. स. १८१६ साली बांधलं. मंदिराची घडण फारच आकर्षक आहे. शिवपिंडी व इतर मूर्ती अप्रतिम आहेत. देवळात अतिशय घाण होती. पावसाच्या धारा गाभाऱ्यात गळत होत्या. बाहेरच्या सभामंडपात गवत उगवलं होतं. वरचे पत्रे नाहीसे झाले होते. अप्रतिम नक्षीची लाकडी तख्तपोशी व डौलदार कमानी तुटून लोंबत होत्या. एका दगडावर लेख कोरलेला होता. त्यात लिहिलं होतं, ' श्री भगवंतेश्वर प्रसन्न ...'

वादळातच आम्ही त्या भयाण किल्ल्यावर फिरत होतो. गडावर छत्रपती शिवाजीमहाराजांच्या एक सुनेची समाधी आहे. छ. राजाराम महाराज दि. ३ मार्च, १७०० रोजी सिंहगडावर वयाच्या तिसाव्या वर्षी वारले. त्यांच्या एक पत्नी अंबिकाबाईसाहेब त्यावेळी विशाळगडावर होत्या. त्यांना महाराजांच्या मृत्यूची बातमी दि. ६ मार्च, १७०० रोजी समजली. तेव्हा त्या विशाळगडावरच सती गेल्या. त्यांचं वृंदावन गडावर आहे. आम्ही दर्शन घेतलं.

श्रीमंत पंत प्रतिनिधी विशाळगडकर यांचा एक चिरेबंदी फारच सुंदर वाडा गडावर आहे. आहे म्हणजे होता! हा वाडा इ. स. १९५० पर्यंत उत्तम स्थितीत होता. आता त्याचे अक्षरशः वाभाडे निघाले आहेत. त्याची दारे-खिडक्या व लाकूड-सामान केव्हाचं लोकांनी आपलंसं केलं आहे. दगडाचे चिरेही बहुतेक नेण्यात आलेले आहेत. आता थोडे उरले आहेत. इतक्या सुंदर वाड्याची ही दैना! एक ऐतिहासिक इमारत पाहता पाहता लोकांनी धुळीला मिळवली.

गडावर आणखीही तीन देवळं आहेत, पण ती देवाची देवळं आहेत हे पटवून द्यायला मला जरा त्रास पडला. पण नंतर सर्वांना पटलं की, ही देवळंच आहेत.

इथं एक सतीचा माळ आहे. तिथं बावन्न स्त्रिया सती गेल्या. त्या सतींच्या बावन्न स्मारकशिला इथं मी पूर्वी पाहिल्या होत्या. आज इथं एकही सतीस्मारकाची शिला जागेवर नाही. लोकांनी ह्या स्मारकशिलाही पळवल्या आहेत.

गडाला दोन दरवाजे आहेत. एक पूर्वेस आणि दुसरा वायव्येस. दोन्हीही साफ पडून गेले आहेत. तिसरा एक दरवाजा शिल्लक आहे. त्यालाच टेहळणीचा किंवा भुंडा दरवाजा म्हणतात. गडावर यादवकालीन मंदिराचे भग्नावशेष असंख्य पडले आहेत.

रामचंद्र नीलकंठ पंत अमात्य यांनी गडावर एक अर्धचंद्राकृती विहीर बांधलेली आहे. हिचा झोक फारच सुंदर आहे. दारूचं कोठार आता कोसळलं आहे. गोडे, पोतदार आणि सरदेसाई यांच्या घरांच्या केवळ खुणा शिल्लक आहेत. एके काळी राजधानीच्या रुबाबात नांदलेल्या ह्या गडावर आज काहीही धड उरलेलं नाही. येथील दर्‍यांचे वैभव मात्र फार मोठे आहे.

परंतु अचाट उंचीचे ताठ कडे, भयंकर खोल असलेल्या दऱ्या, जिथं वाराही प्रवेश करू शकणार नाही अशा कपाऱ्या अणि घनदाट झाडी हेच विशाळगडाचं वैभव टिकून आहे. यातील कडे व कपाऱ्या शिल्लक राहतील; पण ते सुंदर हिरवंगार अरण्य मात्र टिकेल असं वाटत नाही. कारण कोळशासाठी जंगल तुटत आहे. मुलूख उजाड बनत चालला आहे.

वादळ आणि पाऊस चालूच होता. अंधार पडू लागला होता, पण माझी इच्छा होती, की साऱ्यांना गडाचे ते पश्चिमकडे दाखवावेत. गडाची पश्चिम दरी म्हणजे यमराजांची जांभईच! भयंकर अक्राळविक्राळ रूप आहे. तिचं. पश्चिमेकडे निसरडा


उताग्ही फार आहे. पाणी भरधाव खाली दरीत उड्या घेत असतं.

पण अप्पासाहेबांनी माझा बेत मोडून काढला.

मन मात्र त्या रौद्रदर्शनासाठी कड्याकडे धावत होतं. अप्पासाहेबांना वाटत असावं, आम्ही तिथं काही तरी दांडगाई करू...भलतीच !

अन् मग त्यावेळी आम्हाला अप्पासाहेबांचा राग यायच्याऐवजी मुकुंदा गोंधळेकरचा आणि राम डिबळेचाच भयंकर राग आला. असं वाटलं, ह्या दोघांनाच बडवून काढावं. का ? का ? म्हणजे! ह्याच दोघांनी मघा वाहून जात असलेल्या अप्पासाहेबांना वाचवलं होतं! !

● ● ●



मुलाचे पत्र येते. नातवंडांना घेऊन तूर्त येणे शक्य नाही. आजोबा त्राग्याने म्हणतात– 'तुम्ही करा तयारी त्या रगाड्यात जायची.'–आजी म्हणते 'मला कुठं जायचं नाही.' – हे आहे नव्या जमान्यातील एक उत्तरायण.

# उत्तरायण

अरविन्द दीक्षित





बाबांनी केसरीची घडी घातली अन् तो दूर सरकवला. तोंडासमोर चुटक्या वाजवीत एक भली मोठी जांभई दिली– " हरी ओम्, हरी ओम् " म्हणत बगलेखालून हात घालून कण्याजवळ पाठ खाजवली अन् वळकटीला टेकून बसले. उन्हं बरीच वर आली होती. तापल्या अंगाचा खरपूस वास येत होता. त्यांनी जवळचा पानाचा पितळी डबा समोर ओढून घेतला अन् सुपारी कातरीत केसरीच्या घडीकडे नजर लावून बसले. सगळे वाचून झाले होते.

' च्यांदी 'चं रेडकू रहाटाजवळ भरून ठेवलेल्या प्यायच्या पाण्याच्या तपेल्यात तोंड घालत होतं. बाबांचं तिकडे लक्ष गेलं अन् ते ' अरे, अरे, अरे ' असं म्हणून पुढं वाकून पंजावर जोर देत उठले. जानव्यातलं कानकोरणं पुढच्यातल्या पितळी डब्यावर वाजलं. कमरेवर दोन्ही हात टेकवून जोराजोरानं रहाटाकडे निघाले. रेडक्याचं पाणी पिणं व्यवस्थितपणे चालू होते. बाबांनी त्याच्या दाव्याला हात घातला अन् तोंड जबरदस्तीनं तपेल्यावाहेर ओढून काढायचा प्रयत्न करीत त्याच्या समोर उकिडवे बसले अन् त्याच्या दोन मुस्कटात मारीत म्हणाले, ' शेफारलास गुलामा ! गवड्या, पाणी मागता येत नव्हतं का तुला ? अं ! सरळ तपेल्यात तोंड घालतोस माजोऱ्या ! ' रेडकू सरळ त्यांच्या नजरेला नजर लावून उभं राहिलं. ते स्वतःशीच

हसले अन् दावं सोडून देत म्हणाले, ' पी–पी–सगळं पाणी पी. माझं काय जातंय, तुझ्या म्हातारीलाच ओढावं लागेल पुन्हा. ' रेडकू आज्ञाधारकपणानं पुन: पाणी पिऊ लागलं. त्याच्या पाठीवरून हात फिरवून तेथून ते उठले.

त्याचं पिणं संपल्यावर बाबांनी दोन कळशा ओढल्या अन् तपेलं भरून ठेवलं. जास्वंदीची, तगरीची उरलीसुरली चार फुलं खुडून कर्दळीच्या पानात घेतली अन् पडवीत जाऊन बसले. ' येऊ दे खायचं आता, ' असं स्वयंपाकघराच्या दिशेने बघत म्हणून त्यांनी पुन: केसरी चाळायला घेतला.

" ऐकलं का, जरा बाहेर ये बघू. "

काकू लगबगीनं बाहेर आल्या. एका हातातली वाटी अन् दुसऱ्या हातातलं तांब्या-भांडं त्यांच्यासमोर टेकवत म्हणाल्या, ' तुम्ही तरी असं काय करता लहान मुला-सारखं. एक अर्धं मिनिट तरी वाट बघायची. चहाचं आधण ठेवून साखर टाकीपर्यंत तुमच्या हाकावर हाका...'

' अहो पण म्हणतोय कोण खाण्यासाठी हाक हारली म्हणून ? ' समजावणीच्या स्वरात बाबा म्हणाले, पण लगेच चेहरा पालटला. " अन् मारली म्हणून काय झालं, मला उपाशी मारायचा तर विचार नाही तुझा ? मार एकदा म्हणजे सुटलीस तू. " तिकडे दुर्लक्ष करून स्वत:शीच काहीतरी पुटपुटत काकू आत निघाल्या. ' हे नेहमी-चंच आहे. एवढ्यातेवढ्या कारणावरून चिडतात अन् काहीच्याबाही बोलत असतात. '

★

चुलीपुढचं आवरताना त्यांच्या हाताला गरम पाण्याचा तांब्या लागला. ' म्हणजे काय, गार पाणीच का नेऊन दिलं मघाशी ! ह्या हाकांच्या गडबडीत असा सगळा गोंधळ होतो. आता पुन: चिडतील गार पाणी दिलं म्हणून ' काकू चहा नेऊन पडवीत आल्या. दरवाजात असतानाच बाबांनी विचारलं, " बरव्याच्या थोरल्या मुलाचं नाव काय ग ? "

' कोण गणपत भाऊजींच्या का ? '

' हं. '

' आता थोरला की धाकटा हे बरीक माहीत नाही, पण पुण्याला असतो तो श्रीकांत की कायसं वाटतं. '

' म्हणजे तोच तो. ' बाबांनी सुस्कारा टाकला.

' मी म्हणते झालं तरी काय ? '

' काय व्हायचं काय ? सुटला बिचारा या जंजाळातून—'

' वय झालंच होतं नाही म्हटलं तरी. '

' अं ? '

' नाही. वय झालं होतं म्हटलं. ' आणि मग काकूंच्या लक्षात आलं, की ते

हुंकारणं उगाचच नव्हतं. गणपतभाऊजी अंमळ लहानच ह्यांच्याहून. स्वत:ला सावरून घ्यायचा प्रयत्न करीत म्हणाल्या, ' खाऊन घेताना थोडंस...'

' राहू दे आता, दोन तांबे पाणी उपस आंघोळीला. '

आजकाल बाबा देवपूजा करीत नाहीत. देवघर हल्ली काकूच सांभाळतात. पूजेच्या वेळेस बाबांचं काही काम असलं, कधी भूक लागली असली तर म्हणतात, ' ऐकलं का—पूजाअर्जा मागनं होऊ द्या. बाहेर या पाहू आधी. नाहीतर राहू दे पूजा आजच्या दिवस. '

' राहू द्या कशी ? तुमचं आपलं काहीतरीच ! '

' काय होतं राहिली म्हणून. गावाला गेलीस की महिने दोन महिने देव पारोसे राहिलेले चालतं—'

' ती गोष्ट वेगळी. जोपर्यंत जमतंय तोपर्यंत करीत राहायचं जेवढं होईल तेवढं. ' बोलण्यात वेळ काढायचा काकूचा उद्देश बाबांना ठाऊक असतो मग ते चिडतात. ' दगडांच्या आंघोळी चालल्येत अन् जिवंत माणसाचे हाल इकडे. ' तोपर्यंत ताम्हनातलं पाणी तुळशीत रितवून परत येत काकू म्हणाल्या, ' कसली एवढी घाई होती. दोन मिनिटं थांबायचं तरी. '

घाई कशाशीच नसते. असली तरी बाबा विसरून गेलेले असतात. उगाचच शब्दाला शब्द वाढत असतो. दिवसेन्दिवस असंच चाललं आहे. कधी बालिशपणा... कधी उतावळेपणा...

आज बाबा दगडीवरून आंघोळ करून येत होते, तेवढ्यात काकू तुळशीकडे जाताना दिसल्या. ' हे काय, आटोपली का पूजा ? '

' हो ! काय झालं ? पाणी मी उपसून ठेवलं होतं '

' तसं काही नाही. वाटलं होतं आज पूजा करावी. '

' मी म्हणते करावी, मनात आलंय एकदा ती. '

' तेही खरंच. करा तयारी पुन: एकदा. '

पुष्कळ वेळ पूजा चालली होती. काकूंचा अकरावा अध्यायसुद्धा वाचून झाला, तेव्हा त्यांनी देवघरात डोकावलं. समईच्या वातीचा कोळी झटकायचा प्रयत्न करीत बाबा म्हणाले, ' वैश्व देवाची तयारी करता का ? ' काकूंना बरं वाटलं. देवात असं मन रमल्यावर आणखी काय पाहिजे.

★

दुपारची झोप कशी ती येत नाही. जुनेऱ्याचं उसं करून डोळे मिटून पडून राहायचं. या कुशीवरून त्या कुशीवर वळता वळता जीव नुसता गुदमरून जातो. काकू या उकाड्याला कंटाळतात अन् उठून मागच्या पडवीत जाऊन बसतात. वाड्यात 'च्यांदी' डोळे मिटून संथपणे रवंथ करीत असते. तिचं रेडकू डोळ्यांची उघडझाप करीत, कानानं माश्या उडवीत स्वस्थ बसून राहिलंय. " मलाच तेवढी शांती नाही. "

वाऱ्याची झुळूक झाडांतून घरंगळत पायाशी आली अन् जरा बरं वाटलं. पानांच्या सळसळीनं कसल्याशा आठवणीनं त्या उठल्या अन् माजघरातून फणसाची पानं अन् चोयांचा जुडगा आणून खांबाला टेकून बसल्या. बघता बघता दहा पंधरा गोल गोल पत्रावळी तयार झाल्या अन् काकू एकदम थांबल्या. 'करायचेत काय इतक्या ? इनमिन दोन माणसं. सुट्टीचे दिवस असते तर गोष्ट वेगळी होती.' बाहेर सासरे–जावई, बापलेक गप्पा मारीत असतात. लेक, सून, नातवंडांनी घर भरलेलं असतं....

'आजी मला भूक लागल्ये–'

'आजी मला थालीपीठ कर–'

'आजी मला तिखटा–मिखटाचा सांजा–'

'अगदी नवीन गम्मतजम्मत करते हं आज–'असं म्हणत आजी उठतात. तरातरा स्वयंपाकघरात जातात. घाईघाईनं तयारी करून पातेल्यात फोडणी टाकतात. त्यातली मोहरी तडतडते. बाबा दरवाजात येऊन उभे राहतात. त्यांच्या हातात दोन पत्रं आहेत. 'ऐकलं का–अहो, अहो, ए रमा, चाललंय काय ? ' डोळे घट्ट बंद करून विळीवर कांदा चिरत त्या दरवाजाकडे मान वळवून म्हणतात, 'एवढी घाई कसली आल्ये–पोरं एवढी मागं लागल्येत, त्यांना खायला करून देते अन्–'

बाबा हळूहळू आत येतात. चुलीवरचं पातेलं उतरून काकूंच्या खांद्यावर हात टेकवीत शेजारी बसतात. 'कुठली पोरं ? म्हणतेस तरी काय ?' दंडावर डोळ्यांतलं पाणी टिपत त्या डोळे उघडतात. उतरून ठेवलेली फोडणी मधूनच तडतडते आहे. चूल मोकळीच धगधगते. जवळ फक्त बाबा बसलेले आहेत.

'काही नाही. काही नाही. तुम्हाला भूक लागते ना वेळी अवेळी, म्हणून खायला करीत होते... की चहा करून देऊ आधी ?'

'राहू दे सगळं असंच. बाहेर चला जरा, म्हणजे बरं वाटेल.'

बाहेर ओटीवर काकू भिंतीला टेकून बसतात. दोन्ही हातांच्या अंगठ्यांनी कपाळ घट्ट धरून ठेवलेलं आहे. बाबा झोपाळ्याच्या कडेवर अर्धी मांडी घालून बसतात. उजवा पाय जमिनीवर टेकवून हळूहळू झोके घेतात. शेजारचा गुंडू पाठीमागून येऊन हळूच झोपाळ्यावर चढतो. बाबांच्या पाठीशी उभं राहून त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजतो. त्याला खांद्यावरून पुढ्यात ओढून घेऊन त्याचा पापा घेत बाबा विचारतात, 'पण कशाला रे गुलामा ? '

'मला पायजेल.'

'जा आधी, तुझ्या आयशीला सांग म्हातारीनं बोलावलंय म्हणून. काय सांगशील?'

'–की म्हातारीनं बोलावलंय म्हणून,' असं म्हणत तो चड्डी सावरीत पळून जातो, पण त्यापूर्वी, 'पण मागनं नक्की द्यायला पाहिजे हं,' अशी मान तिरकी करून कबुली करून घ्यायला विसरत नाही.

गुंड्याची आई पदर सावरीत ओटीवर येते. काकूंच्या कपाळाला हात लावीत म्हणते, ' बरं नाही का काकूंना ? ' अंग थोडं गरम वाटतंय. '

बावा पत्रावरची नजर काढीत म्हणतात, ' आलीस पोरी ! घोटभर चहा करून दे झकासपैकी अन् दोन वळसे वाताची मात्रा उगाळून दे म्हातारीला.'

गुंड्या कपडे वाळत घालायची काठी घेऊन घोडा घोडा करीत आपल्या आईची नजर चुकवून बाहेर पडतो.

★

विश्वेश्वराचं दर्शन घेऊन बावा दीपमाळेच्या कट्ट्यावर येऊन बसले. खरं म्हणजे एवढी पाटवाडी चढून दर्शनाला यायला नको होतं. कंबर दुखायला लागली. चढताना अर्ध्यावरूनच उतरायचा विचार होता, पण ते मनाला पटलं नाही. ' विश्वेश्वराची ' इच्छाच दिसते भेटायची. कदाचित ही शेवटची भेट असेल ! अंधार पडायच्या आत घरी पोहोचलेलं बरं, असा विचार करून ते उठतात. उजव्या हातातल्या काठीवर जोर देत पहिलं पाऊल पुढे टाकलं अन् कंबरेतून चांगलीच चमक गेली. ' देवा नारायणा, विश्वेश्वरा, वाचव रे बाबा या जंजाळातून. '

' रामचं पत्र आलंय्. '

' मग काय म्हणतोय् ? पाठवतोय् ना मुलांना ?'

' मुलांची यायची फार इच्छा आहे, पण–'

' पण काय ?'

' कसलं काय अन् कसलं काय. नेहमीचीच अडचण. पैशाची निकड. दुसरं काय. सासऱ्यानं बोलावलंय हे कारण पुढं करतोय अन् पोरगी म्हणते, तुम्हीच इकडे या महिनाभर. '

' चला. करा तयारी निघायची !' हा सगळा राग आहे अन् तो काकूंच्या चांगलाच लक्षात आलाय. त्याही मग चिडतात अन् म्हणतात, ' मला कुठ्ठं म्हणून कुठं जायचं नाहीय्. मुलं आली असती म्हणजे जरा बरं वाटलं असतं, एवढं बरीक खरं !'

' इतकी वर्षं पंचवीस माणसांच्या घरात राबलीस अन् विश्रांतीचे दिवस आले, तेव्हा तुझं सुख दुखतंय्. '

'——'

' तू असं कर तूच जाऊन ये चार दिवस त्या रगाड्यात, मी राहतो इथं.'

' तुमचं एकट्याचं इथं कसं व्हायचं. आधीच तुम्हाला एवढ्या तेवढ्याचा त्रास होतो. त्यात आंबा–फणसाची विक्री म्हणजे नाही म्हटलं तरी दगदग व्हायचीच.'

' माझी नको काळजी. शेजारीपाजारी घालतील दोन घास खायला अन् काही विकलं नाही, तर पोट काही पाठीशी लागणार नाही आपलं. खातील कावळेबावळे झाडावरचं. '

'मग जाऊन येऊ म्हणताय्–'

बाबा पाठीवर हात बांधून फेऱ्या मारताहेत. काकू आत जायच्या तयारीनं उठतात.

'चाललीस लगेच ! जा जा. मरण कसं शांतपणे येईल मला. जवळ भाऊ नाही, पोरगा नाही, पोरगी नाही, बायको नाही, कोऽणी नाही. गंगाजळ पाजून जा जाताना, म्हणजे माझी इच्छा राहायची नाही कशात.'

★

'ए विष्णू ऽऽ' सदू जोशी आपल्या अंगणात माच्यावर बसून सुपारी कातरीत हाका मारीत होते. बाबा देशावर गेले, शिकले, ऑफिसर म्हणून पेन्शनीत निघाले, पण या सद्याचा एकेरीपणा अजून गेला नाही, पण बाबांना ते आवडतं. ते क्षणभर थांबले. त्यांचे पाय ठणठणत होते. दिवेलागणी झाली होती. घरसुद्धा फार दूर नव्हतं. एका दमात चालत जाऊन घरीच पडायला हरकत नव्हती, पण त्यांनी कवाड लोटलं अन् आत शिरले. माच्यावर स्वतःला सावरून घेत सदू म्हणाला, 'इकडे कुठं रे तिन्हीसांजचा ? "

'म्हटलं होतंय तोपर्यंत विश्वेश्वराचं दर्शन घेऊन यावं.'

'येतोस का रात्री ? मंडळी बोलवल्येत. टाकू दोन डाव.'

'नको रे. जागरण सोसत नाही हल्ली.'

'इथं कुणाला सोसतंय, पण पोरं पाठीमागे लागलेत गंजीफा शिकवा म्हणून. आता आपण आहोत चार डोकी, तोंपर्यंत ह्यांना समजेल तरी काय खेळ आहे ते. दडप्या पोह्याचा कार्यक्रम करून टाकू. कसं ?'

बाबा तोंड उघडून शिलकीतले दोन दात दाखवीत उभे राहिले. सदूनंही स्वतःचं मोकळं बोळकं दाखवलं अन् दोघेही जोराजोरात हसले.

दोन पावलं टाकून बाबा मागे फिरले, 'सदू, तुला गणपत बऱ्या आठवतो?'

'न आठवायला काय झालं. का ?'

'नाही, 'केसरी'मध्ये गृह्यसंस्कार वाचला.'

'वाचला मीसुद्धा, पण आपला गण्या हा नव्हे. तो इंदूरच्या बाजूला असतो.'

'खरं की काय ?' बाबांचा चेहरा उजळला. पावलं झपझप पडायला लागली. कंबरेची कळ कुठल्या कुठे नाहीशी झाली.

'इतका उशीर कसला तो ?' बाबांनी ओटीवर पाय ठेवताच झोपाळ्यावरून उठत काकू म्हणाल्या, 'मी आपली वाट बघत्ये केव्हाची.'

'बसलो होतो जरा सदूकडं. गंजीफा खेळायला बोलावत होता रात्री.' काकू आत जाऊ लागल्या, अन् बरं का रमा, तो गेलेला बऱ्या काही तुझा गणुभाऊजी नव्हे.'

'मला वाटलच होतं तसं. त्यांचं कुठं एवढं वय झालंय ?'

बाबा डोळे मिटून अंथरुणावर पडले होते. काकूंनी ज्ञानेश्वरी बंद केली. कोपऱ्या-

तल्या कोनाड्यातली तेलाची वाटी घेऊन त्या बाबांच्या पायाशी बसल्या. त्यांनी बाबांचा पाय मांडीवर घेतला. 'राहू दे आता. तू पण दमली असशील. मलाच काय एवढी धाड भरल्ये. तुझ्या पायावर घे हात चोळून जरासा.' काकूंना हे ऐकून अगदी हलकं–फुलकं वाटलं. त्या म्हणाल्या, 'करतील माझं लेकी–सुना.'

बाबा या कुशीवरून त्या कुशीवर वळत होते. मधूनच 'आईग ऽ, देवारे–' म्हणत कण्हत होते.

'काय झालं ?'

'काही नाही. कंबर दुखत्ये थोडीशी.'

'तरी मी म्हणत होते, एवढी पाखाडी चढून जाऊ नका म्हणून. इथं विठ्ठलाला जायचं होतं.'

'म्हणून नव्हे ग, सकाळी दोन कळशा पाणी ओढलं ना !'

'मग लावू का तेलाचं बोट जरा—'

'नको, होईल सगळं व्यवस्थित.'

एवढ्यात काकूंचा डोळा लागला. बाबा बराच वेळ चुळबुळ करीत होते. शेवटी उठले. त्यांनी मागच्या पडवीतला केसरी धुंडाळून काढला. चष्मा चढवून दिव्या-जवळ गेले. डोळ्यांपासून दूर हात पसरून तो चांगल्या प्रकाशात धरला. 'पुण्याचा असला तरी हा बरवा आपलाच असला पाहिजे. आला असेल इंदूरहून पुण्याला. कुणी सांगावं.' बाबा अस्वस्थ झाले. झोप उडाली. ते बाहेर येऊन झोपाळ्यावर बसले.

'विष्णू ऽ ए विष्णू ऽऽ' खणखणीत आवाजाच्या दिशेने बाबा मागं वळून पाही-पर्यंत गणपत बरवा नेहमीच्या उडत्या चालीनं त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला. बाबांनी बावरून आजूबाजूला पाहिलं. जवळपास कुणीही दिसत नव्हतं, तरी सगळं वातावरण गजबजलेलं आहे याची जाणीव होत होती. बाबांनी उपरण्याखालून हात घालून मांडीला चिमटा घेतला. नेहमीप्रमाणं सातमजली हसत बरवा म्हणाला, "घाबरलास मला बघून ?'

'न् न् न् नाही रे, आजचा केसरी. तुझा गृह्यसंस्कार—' तोंडातली तंबाखूची पीक सांभाळीत बरवा पुनः हसला. आपल्या तोंडावर उडालेल्या थेंबाची त्यांना शिसारी आली. गणपतच्या मनाला न लागेल अशा बेतानं तोंड फिरवलं अन् चेहरा खसखसून रगडला.

बाबांनी डोळे उघडले तेव्हा ते झोपाळ्यावरच होते. 'बरं झालं नुसता भासच झाला ते.' त्यांनी आवंढा गिळला अन् पायानं हळूच झोका दिला.

'खरं आहे वाचलंय ते. मी मेलोय्.'

'मरताना काही वाटलं नाही तुला ?'

'वाटायचं काय, लहानपणी शेंडीला गाठ मारून गीता मुखोद्गत केली ती उगाचच का ? आत्मा अमर आहे. फक्त जुने कपडे टाकून नवे बदलायचे.'

' ते खरं रे. पण पोरं, बाळं, पैसा-अडका, रडारड...सगळी पोरं जवळ नव्हती म्हणून वाईट वाटलं...पण थोडसंच. '

' चल येतोस? कंटाळवाणं वाटतंय् एकट्याला. '

' नको, नको. रामचा अजून जम बसत नाही धंद्यात. तिची तब्येत-'

' लवलर आटप. फार थोडे दिवस राहिलेत. फार थोडे दिवस राहिलेत. तुझी वेळ झालीय्--'

फार उशीर झालाय. बाबांना घाम फुटला. झोपाळा जोरजोरात झोके घेत होता. फार उशीर झालाय. सदू जोशाकडे गंजीफाचा खेळ रंगला असेल, विड्या ओढत असतील, ताटातल्या दडप्या पोह्यांनी तोबरे भरत असतील. मग जायफळ लावलेली कॉफी येईल. कदाचित् ही शेवटची संधी असेल. बाबांनी काकूंना जागं केलं, ' रमा, दडपे पोहे कर दोन मुठी. ' काकू त्यांच्याकडे बघतच राहिल्या.

' आत्ता ?'

' हं. ' देवा नारायणा करीत काकू तयालीला लागल्या. बाबांनी एक सिगारेट पेटविली अन् सावकाश झुरके मारीत मारीत पत्र लिहावयाला सुरुवात केली.

पोह्यांची चिमटी दाढेखाली ठेवत ते म्हणाले, ' रामला पत्र लिहिलंय. बापापुढे पैसे मागायची कसलीच लाज नाही. सगळं आहे हे तुझ्यासाठीच आहे. कसलीही सबब न सांगता सरळ पोरांना घेऊन निघून ये अन् विमलला पत्र लिहिलंय, सगळ्यांना घेऊन ये म्हणून. कसं ? पिकली पानं आपण. उद्याचं कुणी सांगितलंय ?'

काकूंना बरं वाटलं. जया, विजू, संजय, चंदा आपल्याभोवती दंगा घालताहेत... ओटीवर गप्पा रंगल्यात...स्वयंपाकघर सून सांभाळते आहे...घर कसं गजबजून गेलंय्.

माजघराचा दरवाजा कुरकुरतो. काकू उठून तो बंद करतात. परत येताना उशागतचं पाणी प्यायचं तांब्याभांडं घरंगळतं. बाबांची झोप चाळवते. त्यांच्याकडे अपराध्यासारखं बघत चोरासारखं चुपचाप लवंडतात.

● ● ●


## व्यापार विषयक

तुम्हाला स्वतःच्या व्यापार धंद्यांत प्रगती हवी आहे ना ? मग वृत्तपत्रांच्या साह्यानेच ही प्रगती तुम्हाला मिळू शकेल ! ती कशी !

**जाहिरात दिली म्हणजे !**

मराठवाडा, महाराष्ट्र, आणि भारतांतील प्रकाशित होणाऱ्या मुख्य मुख्य वृत्तपत्रांत जाहिरात देण्याकरिता लिहा अगर भेटा !

**मॅनेजर : मेसर्स नागदकर पब्लिसिटी**

बुढ्ढी लेन, औरंगाबाद

# 'रूपवती भव!'

हा आशीर्वाद सध्या वातावरणात घुमत आहे.
या आशीर्वादाची ही एक चिकित्सा.

लेखक : प्रा. मधुसूदन गोखले

**सापडली आहे...सापडली आहे (एक कामधेनू सापडली आहे !)**


ज्याला डोळे आहेत आणि वाचता येते, त्याला 'लूप' ही गोष्ट आज नवी राहिली नाही. रेडिओ सिलोनवरच्या जाहिराती जशा ऐकून ऐकून नकळत पाठ होतात, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रे व मासिके वाचणाऱ्या वाचकाला सकलगुणमंडित 'लूप' त्याच्या सर्व विशेषणांसह तोंडपाठ आहे. या आखुडशिंगी, बहुदुधी, सुबक, सुंदर, सुलक्षणी कामधेनूचे तिच्या रूप-रंगासह सचित्र रसभरीत वर्णन वर्तमानपत्रे आणि मासिकांतून रकानेच्या रकाने भरून येत आहे. नायलॉनच्या निळ्या धाग्याचे शेपूट असलेली, पॉलिथिन प्लास्टिकची ही नितळधवल नागमोडी वस्तू 'भारतीय कुटुंब नियोजन चळवळीला मिळालेले वरदान,' 'भारतीय लोकसंख्या-समस्येवरील रामबाण उपाय,' 'स्त्री-दास्यविमोचनाचे आयुध' या गौरवपूर्ण शब्दांत वर्णिली जात आहे. आजपर्यंत वापरात असलेल्या कुठल्याही साधनापेक्षा अतिशय सोयीस्कर, सुलभ व सुरक्षित, पाळणा लांबवणे व थांबवणे या दोनही बाबतींत उपयुक्त, अशा या साधनाच्या प्रसाराचा आज धुमधडाक्याने प्रचार चालू आहे.

सरकारने उघडलेली ही प्रचार मोहीम आणि त्यात या साधनाबाबत केली जाणारी अत्युक्त वर्णने वाचली, की मात्र मनात धडकी भरल्याखेरीज राहत नाही. आज उत्साहाच्या भरात या साधनाचे जे गुणानुवादन चालले आहेत, त्यामुळे लोकांच्या मनात या साधनाबाबत ज्या प्रचंड आशाआकांक्षा निर्माण होतील,

त्यांना थोडा जरी धक्का बसला तरी ती गोष्ट या चळवळीला घातक ठरणारी होईल आणि म्हणूनच प्रचारातील परिणामकारकता मान्य करूनही या प्रचारातील काही भाग अधिक चिकित्सेने व डोळसपणे तपासून पाहणे आवश्यक आहे.

## ९९.५ टक्के यशस्वी (एक अर्धसत्य !)

लूप हे साधन ९९.५ टक्क्यांहून अधिक यशस्वी आहे, असे हिरीरीने सांगण्यात येत आहे, हे पूर्ण सत्य नाही. ही अतिशयोक्ती आहे. या साधनाची ९९.५ टक्के यशस्विता एका विशिष्ट मर्यादित अर्थानेच खरी आहे आणि तो अर्थ असा, की ज्या स्त्रियांच्या गर्भाशयात लूप हे साधन व्यवस्थितपणे टिकू शकते, त्यांच्यापैकी शंभरांपैकी ०.३ ते .४६ टक्के स्त्रियांना (म्हणजेच दोनशेंपैकी एकीस) याही अवस्थेत गर्भ राहण्याचा संभव लक्षात घेता हे साधन गर्भप्रतिबंधक म्हणून पूर्ण शंभर टक्के नव्हे, तर ९९.५ टक्क्यांहून अधिक परिणामकारक आहे; पण या बरोबरच एक महत्त्वाची गोष्ट विसरून चालणार नाही ती म्हणजे सर्वच स्त्रियांच्या गर्भाशयामध्ये लूप व्यवस्थितपणे टिकू शकतो असे नाही, गर्भाशयात दुखणे, रक्तस्राव होणे आणि इतर काही कारणासाठी ५ टक्के स्त्रियांचे लूप डॉक्टरांना काढून टाकावे लागतात, तर आणखी ५ टक्के स्त्रियांच्या गर्भाशयातून बसवलेले लूप आपोआप बाहेर पडून जातात. (भारतातील चाचणीत हे प्रमाण अनुक्रमे ५.२७ टक्के व ४.८९ टक्के असून पोर्टोरीकोतील चाचणीत ते अनुक्रमे ६.७% व ७·८% आहे.) ही गोष्ट लक्षात घेता असे दिसून येईल, की लूप बसवल्या गेलेल्या १०० स्त्रियांपैकी ९० स्त्रियांचे बाबतीतच गर्भप्रतिबंधक साधन म्हणून लूप उपयोगी आहे (आणि या ९० स्त्रियांचे बाबतीत मात्र ते ९९.५% गर्भप्रतिबंधक म्हणून परिणामकारक आहे.) या गोष्टी लक्षात घेऊनच काटेकोररीतीने बोलणारे, सावधपणे हे साधन ८५% यशस्वी आहे असे सांगतात आणि ते म्हणणेच बरोबर मानावयास हवे. कारण ज्या स्त्रियांची ही साधने गळून पडतील व काढून टाकावी लागतील, अशा १०% स्त्रियांना हे साधन गर्भप्रतिबंधक ठरू शकत नाही. याच अर्थाने परदेशांत ही साधने ८५ टक्के यशस्वी म्हणून सांगितली जातात. आणखीही एक इतकीच महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयास हवी, ती म्हणजे ' लूप ' हे साधन बसवून घेण्याच्या इच्छेने जाणाऱ्या सर्वच स्त्रियांना हे साधन बसवले जातेच असे नाही. साधन बसवून घेण्यासाठी येणाऱ्या एकूण स्त्रियांपैकी २० ते २५ टक्केपर्यंत स्त्रियांना हे साधन बसवण्यास डॉक्टरांकडूनच नकार देण्यात येतो. परदेशांतील व भारतातील चाचण्यांत ही गोष्ट स्पष्ट झाली आहे, की २० ते २५ टक्के स्त्रियांना त्यांच्या तपासणीनंतर ' हे साधन तुमच्या उपयोगाचे नाही. तुम्ही दुसरे काही साधन वापरा,' असे डॉक्टरांकडून सांगितले जाते व त्यांना निराश होऊन परतावे लागते. या निराश होऊन परतणाऱ्या स्त्रियांचा वरील टक्केवारीत विचार केलेला नाही व या स्त्रिया वगळून उरलेल्या स्त्रियांच्या




शेकडा वीस ते पंचवीस स्त्रिया वैद्यकीयदृष्टचा 'लूप' ला अयोग्य ठरतात.

बाबतीत हे साधन ८५ टक्के यशस्वी आहे, ही गोष्ट लक्षात घेता सध्याच्या प्रचारातील "९९.५% हून अधिक **यशस्वी**" ही घोषणा पूर्ण सत्य नसून सत्याभास कशी आहे, हे सहज कळेल.

## Look well before you Loop !

'लूप' चा प्रचार हिरीरीने करण्यात येत आहे. त्यामागील उत्साह पाहून आणि 'लूप' बसवण्यासंबंधी पुढील वर्षभराच्या काळासाठी केन्द्राने व प्रांतिक सरकारांनी, शहरी व ग्रामीण विभागांसाठी जे उद्दिष्टांचे आकडे जाहीर केले आहेत, ते पाहून अनेक देशी व विदेशी टीकाकार अवाक झाले आहेत. 'स्त्री डॉक्टर हे लूप काही थोडचा मिनिटांच्या आत बसवितात. यात काहीसुद्धा त्रास किंवा वेदना होत नाही. शस्त्रक्रियेची गरज नसते. भूलही द्यावी लागत नाही. सरकारी कुटुंब नियोजन केंद्रात लूप मोफत बसवून देतात.' ही जाहिरातीतील आश्वासने आणि खेडचापाडचांतील भित्तिपत्रकांवरील घोषवाक्ये प्रचार म्हणून ठीक आहेत, पण 'लूप' बसवणे ही शस्त्रक्रिया किंवा शल्यक्रिया नसली तरी ती कौशल्यक्रिया आहे. त्यात भूल द्यावी लागत नसली तरी 'चूक' होऊन उपयोगी नाही. लूपमुळे **काहीसुद्धा** त्रास किंवा वेदना होत नाहीत, हेही पूर्ण सत्य नाही. फारसा त्रास होत नाही, असे म्हणणेच योग्य. कारण साधारणत: मासिकपाळीच्या वेळी स्त्रियांना जितका व जितक्या प्रमाणात त्रास होतो, तेवढा त्रास बहुतेक स्त्रियांना लूप बसविल्यानंतर २–३ दिवस होतो, असा सर्वत्र अनुभव आहे. काही स्त्रियांना हा त्रास जास्त होतो. ओटीपोटात वेणा होतात. अधूनमधून रक्तस्राव होतो. पहिल्या २–३ पाळ्यांचे वेळी अधिक

प्रमाणात रक्तस्राव होतो. या गोष्टी प्रचारात सांगितल्या गेल्याच पाहिजेत. हे कौशल्यकर्म अत्यंत काळजीपूर्वक गर्भाशयाची तपासणी केल्यानंतरच "खास प्रशिक्षित अशा पदवीधर स्त्रीरोगचिकित्सक डॉक्टराने (गायनॉकॉलॉजिस्ट) नेच केले पाहिजे," अशी जी अट इंडियन मेडिकल कौन्सिलने या साधनाच्या सार्वत्रिक प्रसाराला संमती देताना घातली आहे, ती याच कारणास्तव. इतर कोणत्याही व्यक्तीला (मग ती आरोग्यखात्याशी संबंधित असली तरी) ही परवानगी नाही. No para-medical person should be permitted to insert the IUD.–असा खास नकारात्मक इशारा देण्यास कौन्सिल विसरलेले नाही. गर्भाशयाच्या खोलीचा खास साधनाने अंदाज घेणे, गर्भाशयाचा आकार पाहून लूपची निवड करणे, गर्भाशय निरोगी, दोषहीन, सुस्थित आहे, याची तपासून खात्री करून या सर्व गोष्टी तज्ज्ञ गायनॉकॉलॉजिस्टच करू शकेल.

## याला तोडगा शिबिरे...???

लूप या साधनाच्या सार्वत्रिक प्रसारात अशा डॉक्टरांची कमतरता ही फार मोठी अडचण येणार आहे. अगदी शहरी विभागातील सरकारी वा खासगी कुटुंब नियोजन केंद्रातूनदेखील अशा तऱ्हेचे डॉक्टर मिळणे कठीण. मग ग्रामीण विभागात विखुरलेल्या कुटुंबनियोजन केंद्रांतून असे डॉक्टर्स व सर्व साधनसामग्रीने सुसज्ज दवाखाने मिळणे दुरापास्तच आहे. ही अडचण लक्षात घेऊन खासगी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने एक यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न चालू आहे. शहरी विभागांतून हे थोड्या प्रमाणात शक्य तरी आहे, पण ग्रामीण विभागातून अनंत अडचणी आहेत. खेड्यांतून असे डॉक्टर्स मिळणार नाहीत. शिवाय ग्रामीण भागांत स्त्री-डॉक्टरांखेरीज 'लूप' बसवून घेण्याचे हे काम करून घेण्यास स्त्रिया तयार होणार नाहीत. या अडचणीवर रामबाण तोडगा म्हणून महाराष्ट्र सरकारने आपले कँप–तंत्र सुरू करण्याचे जाहीर केले आहे. पूर्वी पुरुषशस्त्रक्रिया शिबिरे होत, त्याप्रमाणे आता 'लूप' शिबिरांचे मोहोळ उठेल. आतापर्यंत अशी



**पुरुष डॉक्टरांकडून 'लूप' क्रिया करवून घेण्यास स्त्रिया तयार होणार नाहीत.**

पाच–पंधरा शिबिरे झालीही आहेत.

## अनंत अडचणी

या शिबिरांचेबाबत अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. ज्या ठिकाणी स्थायिक तज्ज्ञ डॉक्टरीण व सुसज्ज हॉस्पिटल आहे, अशा ठिकाणी अनेक प्रश्न सोडवणे सहज शक्य असते, पण स्थायिक डॉक्टरणींची अनुपलब्धता व सुसज्ज दवाखान्यांची उणीव आहे, अशाच दूरवरच्या ग्रामीण विभागात ही शिबिरे होणार. या ठिकाणी शिबिर होऊन गेल्यावर मागे या साधनाबाबत जी इतर काळजी घेणे आवश्यक असते, ती कोण घेणार? काही स्त्रियांची साधने गळून पडतील, काही स्त्रियांना रक्तस्राव व वेदनांचा त्रास होईल व त्यांची साधने डॉक्टरणीस काढून टाकावी लागतील. साधन ठिकाणी व्यवस्थित आहे की नाही. अशी काही स्त्रियांना शंका निर्माण होईल, तेव्हा स्त्रीला तपासावे लागेल. गर्भाशयाच्या आकुंचनप्रसरण प्रक्रियेमुळे एखाद्या स्त्रीचे साधन गर्भाशयात पूर्णपणे सरकेल व त्याचा नायलॉनचा धागा स्पर्शाने कळणार नाही. अशावेळी पूर्ण तपासणी व प्रसंगी एक्स-रेखालीच ते पाहावे लागेल. लूप व्यवस्थित बसलेल्या स्त्रियांनाही पहिले काही दिवस वेळोवेळी व नंतर अधूनमधून ते ठिकाणी आहे का, याची चाचणी घ्यावी लागेल. हे सारे निर्माण होणारे प्रश्न, या अडचणी, यांची काळजी कोणी घ्यायची? दरखेपेला शहराकडे धाव घ्यावयाची काय? आणि ती कुणी, केव्हा? या साऱ्यांची निश्चित उत्तरे असल्याखेरीज शिबिरे यशस्वी होणार नाहीत.

## हे ठरवणार कसे......?

शिबिरांचे बाबतीत आणखी एक ठळक धोका असा, की असे शिबिर एके गावी ठराविक दिवशी घेतले जाणार म्हणजे प्रचार करून 'लूप' बसवून घ्यावयास तयार असलेल्या सर्वच स्त्रियांना त्याच दिवशी लूप बसविण्यासाठी आणले जाणार, पण 'लूप' बसवण्यास योग्य असा तोच दिवस या प्रत्येक स्त्रीच्या बाबतीत कसा असणार? या देशात व परदेशांत आता ही गोष्ट सर्वसामान्य आहे, की स्त्रीच्या मासिकपाळीनंतर २–३ दिवसांत हे साधन बसवणे हे सर्वांत बिनधोक समजले जाते. कारण यावेळी गर्भ राहिला असण्याची शक्यता कमीतकमी असते. काहीजणांच्या मते मासिक पाळी सुरू होण्यापूर्वीचे एकदोन दिवस ही वेळही लूप बसवण्यास योग्य होय, पण या वेळपर्यंत (त्या महिन्यात) गर्भ राहिलेला नाही, याची खात्री कशी द्यायची? आता कोणी सोयीसाठी असेही म्हणत आहेत, की पाळीनंतर १४ दिवसांच्या आत लूप बसवून घेण्यास हरकत नाही, कारण या काळात गर्भधारणेचा संभव कमी असतो– पण या मतात सत्य कितपत आहे? ज्या सुरक्षित काळ (Safe period) सिद्धांतावर हे मत आधारलेले आहे, ती पद्धतच मुळी केवळ ५० टक्केच यशस्वी

असल्याचा जगभरचा अनुभव आहे. तेव्हा पहिल्या १२–१४ दिवसांत गर्भधारणा झालेलीच नसेल, असे छातीठोकपणे कसे सांगणार? प्रश्न इथेच संपत नाहीत. ग्रामीण भागात पाळीच्या तारखा बरोबर लक्षात ठेवून नंतर अचूकपणे सांगणाऱ्या स्त्रिया किती सापडतील ? आता या साऱ्यांवर पळवाट म्हणून एक उत्तर सांगण्यात येते, ते म्हणजे तज्ज्ञ डॉक्टरीणबाईच लूप बसविण्याचे काम करणार असल्याने लूप बसविण्यापूर्वी प्रत्येक स्त्रीच्या गर्भाशयाची तपासणी करणार असल्याने त्यांच्या ही गोष्ट लक्षात येईलच ! पण या उत्तरात सत्य आहे काय ? ४–६ दिवसांचा गर्भ असता (किंबहुना पहिल्या महिन्यात) तज्ज्ञालाही छातीठोकपणे ते सांगता येत नाही. हे जर खरे तर शिबिराच्या भाऊगर्दीत (किंवा महिलागर्दीत) हें सारे कसे जमायचे ? यामुळे शिबिरात अपयशाचे प्रमाण मात्र वाढेल. तसेच वर उल्लेखिलेल्या अडचणींना योग्यरीतीने उत्तरे सापडली नाहीत, तर या साधनाविषयी फार मोठा अविश्वास निर्माण होईल. या गोष्टीला ग्रामीण भागात अत्यंत जपले पाहिजे. काहीजणींच्या अशा अनुभवाने अनेकांची मने या साधनाविषयी कलुषित होतील आणि ती साफ करण्यास कोणताही बुद्धिवाद वा युक्तिवाद पूर्णपणे असमर्थ ठरेल.

**तज्ज्ञांचा इशारा**

या साऱ्या गोष्टींची कल्पना असल्याकारणानेच एप्रिल १९६५ मध्ये यूनोमार्फत भारतीय कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे बाबत मार्गदर्शन करण्यासाठी आलेल्या तज्ज्ञांच्या गटाचे प्रमुख सर कॉलव्हिली डेव्हरेल (इंटरनॅशनल प्लँड पेरेंटहूड फेडरेशन न्यूयॉर्कचे

**सकाळ : २४ ऑगस्ट**

जुन्नर, ता. २३–कुटुंब नियोजनाकामी जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या 'लूप शिबिरा'चा सुमारे ४०० स्त्रियांनी फायदा घेतला होता. तथापि स्त्रीसुलभभावना, मासिकपाळी, रोगराई वगैरेंबाबत त्या शिबिरात पुरेसे मार्गदर्शन झालेले नव्हते. अशा परिस्थितीत घाई-गर्दीत उरकून घेतलेल्या शिबिरानंतर अनेक स्त्रियांनी त्यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी केल्यावर आता ज्यांना त्रास होऊ लागला होता, अशा स्त्रियांना बसविलेले "लूप" काढून घेण्यासाठी सरकारी दवाखान्यात स्त्रियांची गर्दी दिसून येते. संतति-नियमनाचा हा प्रकार नवा असल्याने त्याबाबत अगोदर संपूर्ण माहिती व ती कोणास उपयुक्त ठरतील, याची पाहणी करणे जरूर आहे, असे अनुभवी वैद्यकीय पदवीधरांनी सांगितले.

सेक्रेटरी जनरल) यांनी पुढील स्पष्ट इशारा दिला होता–" The mission feels that the loop should first be launched in areas where there is no dirth of doctors and people are educated enough to accept the method." या सूचनेकडे दुर्लक्ष परिणामी घातूकच ठरेल.


कुटुंबनियोजनाची इतर साधने वापरण्यासाठी लागणारा एकांत, त्या साधनांची पूर्वी व नंतर घ्यावी लागणारी काळजी, ती साधने वापरण्यात सतत घ्यावी लागणारी जाणीवपूर्व दक्षता, या सर्व कटकटींतून लूप हे साधन सोडवणारे असल्याने, ग्रामीण भागांत ते फारच उपयोगी व सहजच मान्य होणारे साधन ठरणार आहे, यात शंका नाही; पण या विभागातील स्त्रियांना ते योग्यरीतीने उपलब्ध करून देण्यातील वरील अनंत अडचणींतून मार्ग काढला पाहिजे. नाहीतर उत्साहाच्या भरात संख्येच्या मागे लागून विक्रमी कार्यक्रमाची आखणी होईल आणि दोन केंद्रे, दोन जिल्हे, दोन प्रांत यांच्यात स्पर्धेने व अहमहमिकेने संख्याउच्चांक स्थापण्याच्या प्रयत्नात कार्यनाशच होईल, अशी फार मोठी धास्ती वाटते.

**एक तांत्रिक अडचण . . .**

लूप हे साधन बसवताना थोडा जरी निष्काळजीपणा घडला, तरी त्याचे आरोग्य-दृष्टया घातूक परिणाम होतील, असा इशारा अनेक तज्ज्ञांनी दिलेला आहे, त्याकडे यत्किंचितही दुर्लक्ष होऊन उपयोगी नाही. पोलिथिनचा लूप गर्भाशयात असल्याने कॅन्सर होईल ही भीती सर्वथा खोटी असल्याचे आतापर्यंतच्या प्रयोगातून दिसून

## केसरी : २० ऑगस्ट

नगर, दि. १८ – गेल्या महिन्यात नगर येथे भरलेल्या गर्भाशयवलय शिबिरात शेकडो खेडूत स्त्रियांनी भाग घेतला होता. वलय बसविल्यानंतर आवश्यक ती वैद्यकीयतपासणी व इतर मदत मिळू न शकल्याने वलय बसविलेल्या अनेक स्त्रियांना शारीरिक वेदना आणि यातना भोगाव्या लागत असून, नको ती वलये असे म्हणण्याचा प्रसंग आला आहे. एका गावचे एक कार्यकर्ते ही तक्रार घेऊन आरोग्यखात्याची मदत मागण्यास आले असताना औषधे, डॉक्टर व मोटार यांची एकत्र गाठ न पडल्याने काही उपयोग झाला नाही. अखेर अनेक महिला नगरच्या सरकारी दवाखान्यात उपचारार्थ आल्या. तेथेही त्यांना २५–३० रुपयांची औषधे, इंजेक्शने आणण्यास सांगितले गेले. हा भुर्दंड कोण सोसणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. आरोग्यखात्याच्या अनागोंदी कारभारामुळे हे वलय स्त्रियांना वरदान ठरण्याऐवजी उपद्रवी ठरू पाहत आहे.



**इन्सर्टर स्टर्लाइझ करण्यास लागणारा विलंब अत्यंत गैरसोयीचा.**

आले आहे; पण आता एक नवीनच भीती व्यक्त करण्यात येत आहे; ती म्हणजे हा लूप गर्भाशयात बसविण्यासाठी जो प्लास्टिक इन्सर्टर वापरावा लागतो, तो दर खेपेस पूर्णपणे निर्जंतुक करून घेणे अत्यावश्यक आहे. बारीकशी प्लास्टिकची नळी व त्यात सरकवण्याची प्लास्टिकची काडी असा पंपाच्या स्वरूपाचा हा इन्सर्टर लूप बसवताना एका स्त्रीचे बाबतीत वापरल्यानंतर पुन्हा वापरण्यापूर्वी निर्जंतुक करून घेतला पाहिजे व त्यासाठी तो **'स्टराईल' करावा लागतो.** पण ही वस्तू प्लास्टिकची असल्याने उकळवणे शक्य नाही; म्हणून आयोडाईन सोल्यूशन, किंवा झेफिरिन वा मोनोसाईड डिसइन्फेक्टंट सोल्युशनमध्ये हे १८ ते २४ तास ठेवल्यास पूर्ण बिनधोक ठरतील असे अनेकजण मानतात. दक्षिण कोरियामध्ये तोच इन्सर्टर पुन:पुन: वापरल्याने हेपाटीटाईज (कावीळ) या रोगाचा संभव होत असल्याचे लक्षात आल्याने प्रत्येक वेळी नवा कोरा इन्सर्टर वापरण्याची दक्षता घ्यावी लागली आणि या गोष्टीची काळजी भारतात तर जास्तच घ्यावयास हवी, कारण Hepatitis (कावीळ) हा रोग भारतातील स्थानिक ( endemic ) रोग समजला जातो. याचसाठी Dr. Mc. Bride या प्रख्यात ऑस्ट्रेलियन स्त्रीरोग-चिकित्सकाने मुंबईत भरलेल्या जागतिक कुटुंबनियोजनतज्ज्ञांच्या सभेत जो इशारा दिला, तो ध्यानात घ्यावयास हवा, या सभेचे इतिवृत्त याबाबत म्हणते, "Dr. William Mc. Bride pointed to the hazard involved in re-using the plastic inserter because of the imposibility of sterilising it. Recalling the field trials in South Korea, Dr. Mc. Bride said that such use had resulted in increased incidence of hepatitis. It was therefore essential that a new inserter be used for each loop inserted; this was particularly important in India where Hepatitis was endemic."

### त्यातल्या त्यात एकच मार्ग

सध्या जेथे लूप बसवले जातात, तेथे २।४ इन्सर्टर्स असतात व १।२ बायकांआड तोच इन्सर्टर वापरावा लागतो. मध्यंतराच्या १५-२० मिनिटांच्या काळात तो

दिनांक १६ जुलै १९६५ रोजी बारामती येथे झालेल्या
एका गावच्या I. U. C. D. शिबीराचा रिपोर्ट : शेकडेवारी

| | | एकूण | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १. एकूण लूप बसविलेल्या स्त्रियांची संख्या | ... | १५ | (मुळात २७ गेल्या.) |
| २. लूप आपोआप निघाल्यांची संख्या | ... | २ | १३ |
| ३. अतिरक्तस्रावामुळे लूप काढलेल्यांची | ... | २ | १३ |
| ४. पाठ दुखणारांची संख्या | ... | ७ | ४७ |
| ५. पोट दुखणारांची संख्या | ... | — | — |
| ६. चार दिवस रक्तस्राव झालेल्यांची संख्या | ... | २ | १३ |
| ७. आठ दिवस रक्तस्राव झालेल्यांची संख्या | ... | २ | १३ |
| ८. आठ दिवसापेक्षां जास्त दिवस रक्तस्राव झालेल्यांची संख्या | ... | ४ | २७ |
| ९. उपचार न करता लूप काढणारांची संख्या | ... | — | — |
| १०. औषधोपचाराने बरे झालेल्यांची संख्या | ... | ७ | ४७ |
| ११. अत्यवस्थ परिस्थितीमुळे पुण्याला किंवा इतर ठिकाणी पाठविलेल्यांची संख्या | ... | — | — |
| १२. इतर कांही कारणामुळे | ... | — | — |
| १३. उपचार न करता बरे झालेल्यांची संख्या | ... | ४ | २७ |

प्रेषक : श्री. रतनलाल भंडारी

डिसइन्फेक्टंट सोल्युशनमध्ये ठेवलेला असतो. २ टक्के आयोडाईन सोल्युशनमध्ये १० मिनिटे इन्सर्टर्स ठेवल्यास तो निर्धोक म्हणून पुन: वापरावयास हरकत नाही, अशा सूचना सध्या देण्यात आल्या आहेत. त्या बाबतीत वरील विरोधी मते लक्षात घेता हा एक महत्त्वाचा धोका ठरण्याची शक्यता आहे. यासाठी प्रत्येक ठिकाणी भरपूर इन्सर्टर्स पुरवणे आवश्यक आहे. म्हणजे निदान एके दिवशी जितके लूप बसवले जातील, तितके प्रत्येकी नव्या (निराळ्या) इन्सर्टरने बसवणे व ते सर्व २४ तास स्टराईल करून दुसऱ्या दिवशी पुन्हा बिनधोक म्हणून वापरणे हेच योग्य ठरणार आहे. लूप शिबिरांच्या घिसाडघाईन ही सारी काळजी घेतली जाणार आहे काय ?

## All the eggs in one basket...!!

सर्वच टीकाकारांचा आणखी एक आक्षेप आहे; तो म्हणजे सध्याच्या प्रचारा-तील एकांगीपणाचा. 'लूप' हे जणू काही कुटुंबनियोजनाचे एकमेव साधन आहे,



सर्वत्र मिळतात
व्यापाऱ्यांनी लिहावें
बेडेकर मसालेवाले, मुंबई ४

अशा थाटात जो सध्या प्रचार चालू आहे, तो सर्वस्वी अयोग्य होय. याबाबतीत मुंबईत १७ ते १९ जुलै १९६५ मध्ये भरलेल्या जागतिक तज्ज्ञांच्या बैठकीने एकमुखी इशारा दिला आहे– " India is putting all her family planning eggs in one basket, " असे खोचक उद्गार तेथील तज्ज्ञांनी काढले. एक इंग्लिश तज्ज्ञ डॉ. G. I. M. Swyer यांनी भारत सरकारच्या या धोरणावर टीका करताना अशी डोळ्यावर झापड बांधणे अयोग्य आहे, असे सांगितले आहे. (" It was wrong for the Govt. of India to have 'closed mind' on methods of family planning. ")

या साऱ्या गोष्टींचा विचार करता लूप या साधनाचा प्रचार करताना किती प्रकारची व कोणकोणती काळजी घेतली पाहिजे हे लक्षात येऊन या बाबतीत प्रत्येक पाऊल जपूनच टाकण्याची कशी आवश्यकता आहे, ही गोष्ट स्पष्ट होईल. म्हणूनच शेवटी कुणीतरी विनोदाने पण अत्यंत मार्मिकपणे काढलेल्या पुढील उद्गारांची आठवण होते– " Those concerned would do well to look well before they loop ! "

• • •

परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस
सहा साहसे — दा. सी. देसाई
मूल्य प्रत्येकी दोन रुपये
राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

# सूनबाई

चंद्रकांतराव जर्मनिस्न बायको करून घेऊन आल्यात, ही वार्ता पंचक्रोशीत झाली. पाटील आणि पाटलीणबाई मुंबईला सुनेकडे जाऊन आले. पाटलावर प्रश्नांची सरबत्ती उडाली– "पाटील बोलला काय तिच्याशी ?

## आनन्द घाटुगडे

डाक्तरकीची विद्या शिकायला सा वर्सपत्तर जर्मनीत जाऊन राहिलेला हुपरीच्या काकासाब पाटलाचा चंद्रकांत गावाकडं परतला; सात समिंदर पार करून आला. असा हुपरीच्या स्टँडावर उतरला आणि सगळं हुपरी गाव त्याच्या स्वागताला सामोरं आलं. त्येच्या गळ्यात मानाचा पहिला हार घातला त्यो गावच्या इनामदारांनी. मागनं त्या भागातनं निवडून आलेल्या आमदारांनी. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षातर्फेही योक हार आला. नंतर शाळेचे हेडगुरुजी नेहरूंच्या फोटोला घालतात तसला भलाभक्कम सुती हार हातात घेऊन पुढे सरकले...आणि मग एका वेळीच चंद्रकांतरावांच्या गळ्यात मावंनात, एवढं नुस्तं हारतुरंच झालं !

गावातल्या नवबौद्धांचं तीन बँड धडाक्यानं पुढं वाजत निघालं. सनई, तुताऱ्या नि चौघडं झडायला लागलं. ठिकठिकाणी थांववून आयाबायांनी पंचारत्या ओवळल्या. घास उतरून टाकलं आणि काय एक राजे–महाराजांच्या लग्नाची वरात निघावी तसल्या दणक्यात चंद्रकांतरावांची मिरवणूक हुपरी गावातनं पुढं पुढं सरकायला लागली.

सा वर्सांनी पोरगा नदरला पडला आणि आईचा जीव गलबलला. भनी–भावंडं तर आनंदानं पार येलवाडून गेल्यागत झाली. जाऊन धडाधडा चंद्रकांतरावांच्या गळ्याला बिलगली, तर एकेकाला वडून बाजूला करावं लागलं. असली त्यांची उघानलेली येडी माया बघून, बघ्यांच्या डोळ्यांत पाणी तरारलं !

मिरवणुकीच्या बिनटपाच्या मोटारीत बसल्या बसल्या चंद्रकांतरावांनी बारीक



न्याहाळून बघितलं. आपल्या स्वागताला सगळा हुपरी गाव लोटालाय– थेट वरच्या आमदार–मामलदारापासून खाली येसदार, चोपदार, रामोशापतर झाडून सगळी गोळा झाल्यात. मनी, भावंडं, काकी, मावशी, मामा–मामी, नात्यागोत्यातली सगळी माणसं भांडण–तंटा विसरून एक होऊन आल्यात; पण या सगळ्या गर्दी, गोमगाल्यात आपले वडील कुठंच कसे दिसत नाहीत ? मोटारीच्या आगे–मागे, आजू–बाजूला चंद्रकांतरावांनी पुन्हा एकदा चौफेर नजर फिरवून नीटपणे न्याहाळलं, पण मिरवणुकीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत खरेच वडील कुठेही दिसत नव्हते.

घरापाशी पोहोचल्यावर मिरवणुकीच्या मोटारीतून उतरल्या उतरल्या चंद्रकांतरावांनी पहिली गोष्ट केली. आधी सगळ्या गर्दीतनं आईला थोडी बाजूला नेली आणि वडिलांची वास्तपुस्त केली. त्या खुळीला म्हणजे पोरगा कुणाविषयी बोलतोय तेच आगुदर कळंना आणि जेव्हा कळलं तेव्हा तिनं अगोदर पदर तोंडाला लावून हसू लपवलं. मग अप्रुवाईनं बोलली,

" म्हंजी ह्यंच्याविषयी इचारतोयास व्हय तू. मग बाबा, ते तू मला इचारूनेस आणि मी ते तुला सांगू ने ! "

" अग पण आबासाहेब गावातच आहेत ना ?"

" हैत की. गावात कशाला अगदी घरातच हाइत..."

" मग माझ्या भेटीला स्टँडवर आले नाहीत कसे ?"

" चंद्रकांता, तुला बाबा जर्मलीस्नं हिकडं येऊन किती दिस झालं ?"

“ह्या काय, आजच येतोय ?”

“हुपरीला आज येतोयास रं, पर तिकडं पुन्या–म्हमईला येऊन किती रोज झालं ?”

“मुंबईला मी तीन महिन्यांपूर्वीच आलोय.”

“आनि तीन महिनं उलटल्यावर तुला गावाकडची आठवण हुतिया ... आमी बाबा सगळं इसरून आलो, पन त्येंची गोष्ट येगळी हाय. तू एक मानाचा हाइस, तर ते सात मानाचं हाइत !”

“म्हणजे ?”

“म्हंजे म्हून इचारशील तर आनि मी काय सांगू ? त्ये तुमचं दोघा बाप–ल्येकाचं भांडान तुमचं तुमी बगा जावा. गाडीतनं उतरलाइस तर आता असाच जाऊन आदुगर ह्यास्नी भेट. वर माळवद्यावरल्या खोलीत बसून हाइत ते.”

गळ्यातल्या हारतुऱ्यांची गुंडाळी तशीच गळ्यातनं काढून चंद्रकांतरावांनी हातावर घेतली. याच्या त्याच्याशी हातमिळवणी करीत, हसून ओळख देत, पाठीवर थाप देत आणि थाप घेत...गर्दीतनं वाट काढीत जिना चढून माळवद्यावर गेले. माळवद्यावरच्या खोलीतलं वातावरण ताणलं होतं. चंद्रकांतरावांच्या येण्याची चाहूल लागली आणि मानी काकासाहेब पाटलांनी आपला म्होरका दुसऱ्या दिशेला वळवला. काही क्षण असेच निरव स्तब्धतेत गेले आणि मग खाली मान घालून निमूटपणे चंद्रकांतराव बोलले,

“आबासाहेब, मी आलोय !”

“व्हय, आलाइसाच की. कवादरनं बगतोय मी. खिडकीतनं दिसतंय् सगळं. सगळ्या गावानं मानपान केलं. काय एक लग्नाच्या नवऱ्याची वरात काडू ने तशी तुमची मिरवणूक काडली. बगून डोळं निवलं माजं !...पर आता आमा अडान्यास्नी आनि कशाला भेटायला आलाइसा ?”

“काय चुकलंय् माझं, ते तरी सांगा ?”

“तुमचं कुटं काय चुकलंय वो. चूक सगळी आमचीच हाय ! जर्मलीस्नं सगळी इद्या शिकून हिकडं हिंदुस्थानात कवा आलासा ?”

“झाले की तीन महिने ?”

“अगागा, आनि ह्ये इक्ते दिवस कुटं होतासा ?”

“मुंबईला...”

“त्येच म्हंतोय मी. तुमी जर्मलीला गेला तवाच सगळं तुटलं. तुमाला शिकवून शानी–सुर्ती करनारी ती जर्मली तुमची. मुंबई तुमची. आमी बाबा तुमचं कोन ? सा वर्सं सगळा जीव डोळ्यांत गोळा करून तुमची आई हिकडं तुमची वाट बघतिया. काय एक तुमचं सादं पत्र तिकडनं आलं तर तुमची मनीभावंडं ते पत्र नेऊन देव्हाऱ्यात पुजऱ्यात. त्यो दिवस सणासुदीसारखा गोडधोड करून साजरा करत्यात;

पर त्याची पर्वा कुनाला ? आता या अडान्यास्नी कोन इचारतंय् ? कोन लागत्यात म्हना आता ती तुमची ? "

" असं कसं म्हणता आबासाहेब ? कुठेही गेलो, कितीही शिकलो, तरी आई–वडि-लांची थोरवी वेगळी आहे. किती केले तरी बहीण–भावंडांच्या गाठी या आतड्याच्या गाठी आहेत ! "

" आनि म्हनून अशी तीन–चार महिन्यानं आटवण हुतिया व्हय तुमाला त्येंची ? "

" एवढ्यासाठीच जर आबासाहेब तुमचा हा सगळा राग असेल, तर मी तुमची क्षमा मागतो! "–पुढे होऊन चंद्रकांतरावांनी अगोदर आबासाहेबांचे पाय धरले आणि म्हटले,

" आबासाहेब, मी तुमचा आशीर्वाद मागायला आलोय्. काय माझ्या चुका झाल्या असतील, तर तो माझा अज्ञपणा समजून पोटात घ्या आणि मला आशीर्वाद द्या! "

आणि एवढ्या ऊन, वाऱ्या, पावसाच्या खस्ता खाऊन लोखंडाच्या कांबीगत टणक झालेले आबासाहेब लोण्यासारखे वितळून गेले. शिकून फार मोठ्या झालेल्या, सरकार–दरबारी मानमरातब मिळविलेल्या आपल्या मुलाला उठवून त्यांनी पोटाशी धरले. त्यांचे करारी पाणीदार डोळे डबडबून आले.

" लेकरा, तुज्याशी दिसभर बोलायचं नाही म्हणून जीव लै घट केला होता. मनानं लै योजलं होतं. तू तीन महिनं थांबलास, पर मला बाबा तुला बघितल्यावर घटकाभरबी निभावलं नाही...ही मया लै खुळी असतिया बघ ! "

बाप-लेकरांचा असा समेट झाला आणि दुधात साखर कालवल्यागत आनंदाला एक नवेच उधाण आले.

सगळ्या गावात पोराचं सत्कार–पात्कार चालले. भाषणं ठेवली गली. जेवणाची, फराळाची आमंत्रणं आली. आल्या आल्या आठ–पंधरा दिवस पोरगा असा बांधल्यागत झाला.

ते दिवस उलटू दिलं. सारं आटपेपर्यंत बाप मुकाट राहिला. आठ–पंधरा दिवस त्यानं कड काढली आणि मग पोराला जरा उसंत मिळाली आहे, निवांतपणा मिळाला आहे, हे बघून बाप बोलला,

" चंद्रकांतराव, लिवनं–शिकनं काय आता तुमच्या विच्छेप्रमाणं पूर्ण झालं असेल म्हणायचं? "

" होय, झालंच म्हणायचं. "

" मग आता फुडचा विचार कवा ? "

" पुढचा विचार कसला ? "

" न्हवं लगनाचं म्हंतोय मी ! आसपासच्या गावच्या, नात्यागोत्यातल्या थोरा–मोठ्यांच्या मुली सांगून येताहेत. त्यांना उत्तर काय द्यायचं म्हणून लै पंचा-

इत पडतिया. तवा तुमालाच एकदा इचारून काय तो सोक्षमोक्ष लावून घ्यावा म्हणतोय ? "

पण यावर चंद्रकांतराव काहीच बोलले नाहीत. चार इकडच्या तिकडच्या गोष्टी काढून त्यांनी मूळ विषयच टाळला.

असंच दोन–चार वेळा झालं. चंद्रकांतराव मूळ विषयाला बगल देत राहिले आणि घरची माणसं कावून गेली.

नक्की हेच्या मनात विचार तरी काय आहे?

म्हातारा एकदा अगदी थटूनच बसला. म्हणाला,

" चंद्रकांतराव, ह्ये भिजत घोंगडं आता कवापत्तर पडून राहृयाचं ? काय तुमच्या मनात इचार असंल नसंल त्यो सपष्टपणी बोलून दावा. पर ह्यो उगचचा खोळंबा नगो. तुमचाबी नगो आनि आमचाबी नगो ! "

चंद्रकांतरावांना तसं एकदम कात्रीत गावल्यागत झालं. पायाच्या आंगठ्यानं ते नुसते जमीन टोकरत खालीच बघत राहिले. ' सांगावं की नको, ' म्हणून त्यांच्या मनाची घालमेल झाली आणि मग मनाचा हिय्या करून दबलेल्या आवाजात ते बोलू लागले–

" आता कोणत्याही परिस्थितीत बोलणे भाग आहे, त्याशिवाय सुटका नाही, म्हणून सांगतो आहे,–आबासाहेब, माझ्या लग्नाचा विचार सोडून द्या! "

" का ? "

उत्तर नाही.

" सांगा, सांगा. काय मनात असंल ते एकदा झट्शिरी सांगून टाका ?"

" सांगू? "

" पाक समदं बोलून टाका. काही मनात राखू नका! "

" तुम्ही रागावणार नाही? "

" न्हाई. "

" मी लग्न करूनच आलोय ! "

" कुठनं? "

" जर्मनीस्नं. "

" जर्मलीस्नं? आनि मुलगी ?"

" मुलगी तिथलीच जर्मनीतली आहे ! "

" आनि हृये सगळं तुमी आता सांगताय. आल्या आल्याच कसं बोलला न्हाईसा ? "

" तेच तर मगाशी म्हणालो. तुम्ही रागवाल म्हणून सांगायची भीती वाटली ! "

आणि मग मुलगा आल्या आल्या तीन महिने तिकडं मुंबईलाच का राहिला, याचा पाक सगळा उलगडा झाला. जर्मनीतल्या मुलीशी लग्न केल्याचे पत्रद्वारे कळ-

वायची हिंमत झाली नाही. मग मुलीसकट येऊन मुंबईला दाखल झाला, तेव्हा तसंच बेधडक जोडीनं येऊन बापापुढं उभं तरी कसं राहायचं ? हा प्रश्न पडला. तेव्हा लगेच मुंबईला तात्पुरती नोकरी धरली. चांगला पगार मिळू लागला. मित्रांच्या ओळखी–पाळखीनं पागडी देऊन मुंबईला एक चांगलासा ब्लॉक मिळवला. बायकोची आणि प्रपंचाची सगळी सुरळीत व्यवस्था लागेपर्यंत तीन महिने उलटले. एकदाची सगळी स्थिर–स्थावर झाली आणि मग पोरगा उठून गावाकडं–हुपरीला आला.

चंद्रकांतराव जर्मनीस्नं बायको करून घेऊन आल्यात ! ही वार्ता वाऱ्यासारखी उभ्या पंचक्रोशीत पसरली आणि तिने मोठीच खळबळ उडवून दिली. मायेपोटी आईला आपल्या पोराच्या सगळ्याच गोष्टी अप्रुवाईच्या वाटत होत्या. ही गोष्टही तिने त्याच कौतुकानं पोटात घेतली. आबासाहेब ह्याच्या त्याच्याजवळ चारचौघांत तणतणले खरे, पण आपला मुलगा हिटलरच्या देशातनं एक मुलगी बायको म्हणून करून आणतोय, याची त्यांना मनोमन बहादुरीच वाटली. बरे, मुलगी आणली ती आणली, पुन्हा तिला घेऊन बिनदिक्कतपणे बापापुढं येऊन उभा राहिला नाही. एवढा मोठा झाला तरी बापाची काही मानमर्यादा राखली, याचेच कुठेतरी खोलवर त्या मानी बापाला समाधान वाटले ! 'जातीसाठी माती खावी,' म्हणणाऱ्यांनी तेवढा धुरळा उडवला. पाटलाच्या पोरानं शाण्णव कुळी बुडवली म्हणून ओरड केली, पण हळूहळू तीही विरली. चंद्रकांतरावांच्या लग्नाची ही बातमी बाहेर फुटल्यानंतरच गावातल्या देसायांकडे चंद्रकांतरावांना जेवणाचं आमंत्रण आलं होतं. पंगत खाजगीत होती आणि अगदी घरगुती अशा मोजक्या लोकांचीच होती. स्वत: देसाईणबाई आणि त्यांची सून पंगतीत वाढायला होती.

तेव्हा पंगतीत जेवता जेवता सहज थट्टेच्या सुरात देसाई चंद्रकांतरावांना बोलले, " चंद्रकांतराव, तुम्ही परदेशी शिक्षण घेऊन परतलेली विद्वान माणसं म्हणून एक विचारतोय, राग मानू नका."

" त्यात राग कसला आलाय् ? विचारा काय विचारायचं असेल ते. "

" नाही, तुम्ही एक जर्मनीतून शिकून आलात. खूप मोठे झालात पण परत फिरताना लग्न करून तिकडचीच मुलगी घेऊन आलात ! आता इकडं आमच्या मुलींचं काय करायचं ? "

" काय करायचं म्हणजे ? "

" अशीच सगळी जर तिकडून शिकून येताना तिकडच्याच मुली घेऊन यायला लागली तर आम्हाला आमच्या मुली विहिरीतच ढकलाव्या लागतील ? "

" विहिरीत कशाला ढकलाव्या लागतील ? इकडं काय मुलं शिल्लक उरत नाहीत ? "

" मुलं तशी पुष्कळ शिल्लक उरतात हो; पण ती अशी जर्मनीहून एम्. डी. एफ्. आर. सी. एस्. होऊन परतलेली नसतात ! म्हणजे रूपगुणसंपन्न असूनही

आमच्या मुलींच्या माथी पुन्हा शेतीभांगलण आली. शेतीतला जन्म पुन्हा शेतीवाडीत घालवावा लागणार. या मुलींना आणि पर्यायाने पुन्हा त्यांच्या मुलाबाळांना अशा शिकून शहाण्या झालेल्या मोठ्या माणसाचा आधार नाही. त्यामुळे पुन्हा चांगले संस्कार नाहीत. कारण की जी मुले आमच्यातून मोठी होणार, तिकडे परदेशी चमकणार ती अशी तिकडच्याच मुली घेऊन परतणार...यावर तुम्ही म्हणाल, एवढा सगळा विचार करून आम्ही जर्मनीतल्या मुलीशी विवाह केलेला नाही. प्रेमातून आमचे विवाह जमले आणि झाले ! पुन्हा एक लहानसा प्रश्न. या जर्मन मुलींनी तुम्हाला सहवास आणि प्रेम दिले. शिकून सहीसलामत तुम्ही इकडे परतला असतात तर आमच्या मुलींनी तुम्हाला तेवढाच उत्कट सहवास आणि प्रेम दिले नसते काय ? मी तर म्हणतो भारतीय संस्कृतीत .वाढलेल्या या मुली नवऱ्यावर प्रेमाचा वर्षाव करण्यात कदाचित जर्मनीतल्या आणि अमेरिकेतल्या मुलींवर मात करतील ! यावर तुमचे मत सांगा. "

" नानासाहेब, तुमचे हे सगळे बोलणे ऐकून मी पुरता गोंधळून गेलो आहे. तुमच्या या प्रश्नांच्या सरबत्तीला या क्षणाला तरी माझ्यापाशी उत्तर नाही. तेव्हा आपण हा विषयच टाळू ! "

" विषय टाळूच, पण चंद्रकांतराव, तुम्ही माझे समाधान केलेले नाही ! "

आज-उद्या करीत पंधराचे वीस दिवस आणि विसाचा महिना भरत आला तरी चंद्रकांतराव गावीच होते. मग एक दिवस सुंदरशा नाजुक लपेटी अक्षरांतले चंद्रकांतरावांच्या नावाचे पत्र आले आले आणि आज-उद्या करीत चाललेली चंद्रकांतरावांची चाल-ढकल एकदम थांबली.

उलट शक्यतो लौकर गाव सोडण्याची चंद्रकांतरावांना घाई झाली. सगळे मनोमन उमजून कुणी त्यांना मग गावी अजून राहा म्हणून उगीच आग्रह धरला नाही. तसा आग्रह याउपर चंद्रकांतरावांनीही मानला नसता.

प्रत्यक्ष निघण्याचा दिवस उजाडला आणि गालातल्या गालांत मिश्किल हसत, कोपरखळ्या देत, चंद्रकांतरावांना टोमणे देत, मंडळी निरोप देण्यासाठी दुपारी स्टँडवर जमली.

" चंद्रकांतराव, आता पुन्हा कवा येणं हुनार ? "

" आता मीच कितीदा येऊ ? तुमीच या की तिकडं मुंबईला ? "

" आमी तर येतावच. तुमी बोलावल्याबिगरबी आलो असतो; पर पयला मान आई-वडिलांचा असतोय् ! "

" कसला ? "

" कसला म्हंजी सूनमुख बघायचा ! "

चंद्रकांतरावांनी गेल्यागेल्यावरच मग आठदहा दिवसांत घरी पत्र पाठविले आणि आई-वडिलांना मुंबईला येण्याविषयी आवर्जून लिहिले.

वारीला निघायची तयारी करावी, तसला साजसरंजाम करून आबासाहेब पाटील आपल्या घरधनिणीला संगट घेऊन सूनमुख बघायला मुंबईला निघाले. मुंबईला निघाले खरे, पण त्यांची मोठी विचित्र अवस्था झाली होती. आपली सून दिसेल कशी ? बोलेल कशी ? ऊठबस करेल कशी ? आपल्याशी वागेल कशी ? कसलाच म्हणून अंदाज त्यांना बांधता येईना.

एकदाची दोघं मुंबईला पोहोचली आणि चांगला आठवडाभर आपल्या मुला-कडचा पाहुणचार झोडून परत हुपरीला आली.

त्या दिवशी त्यांच्या घरी काय एक राजापूरची गंगा प्रकटल्यागत जत्रा फुटली.

"मग काय पाटील नि पाटलीनबाई मुलाकडं जाऊन मुंबईस्नं परतलीं म्हणायची ?"

"व्हय. परतलाव वगा ! "

"काय काय बघिटलं मुंबईत ? "

"रानीचा बाग बघिटला, चौपाटी बघिटली, बोरीबंदर ठेचन बघिटलं..."

"त्ये न्हवं वो, त्ये काय सगळंच लोक बघून येत्यात आनि बगून आल्यावर सांगत्यात बी ! तुमचं काय इशेस असंल तेवडंच सांगा ? "

"इशेस आनि कसलं ? "

"इशेस म्हंजी तुमचं हक्काचं काय बगून आलाय तेवढंच सांगा ? "

"हक्काचं रं कसलं काय ? "

"आबासाब, हे येड पांगरून पेडगावला जाणं झालं ! "

"आरं पर तू काय म्हंतोयास ते एक नीटपणी सरळं सांग की !..."

"न्हवं सरकार, त्यो तुमच्या सूनबाईविषयी काय त्यें सांगा म्हंतोय ! सूनबाई तुमची हक्काची हाय न्हवं ? "

"हायेच की पर तिच्याविषयी आनि काय सांगायचं ? मला काय सांगता येत न्हाई बा ! "

"असं कसं हुईल आबासाब ? "

"व्हय त्ये तसंच हाय ! का म्हनशील तर डोळ्यांनी जे बघिटलं, ते सांगायला डोळ्यांना वाचा न्हाई आनि वाचेला डोळं न्हाईत !"

"जमंल तेवडं सांगा ! सूनबाई कशा बोलत्यात ? कशा दिसत्यात ? कशा वागत्यात ?"

"जमंल तेवडं सांगू म्हनतोस ?"

"व्हय."

मग पाटील जागचं हललं. माजघरात गेलं. कपाटात त्यांनी गौरी-गणपतीच्या वेळी आरासात पुढं मांडून ठेवायची तेवढी बाहुली बाहेर काढली. सगळ्यांच्या म्होरं आणून बशिवली नि विचारलं,

" मंडळी, ही भावली कशी दिसतीया ?"

" कशी म्हंजी एकदम झॅक !"

" पर झॅक म्हंजी तरी कशी ?"

" आँ ?"—सगळीच पुन्हा कोडयात पडली. आता झॅक म्हणजे काय म्हणून विचारल्यावर आणि कसं सांगायचं ?

तसा घोरपड्याचा म्हादू पुढं सरला. म्हणाला,

" आबासाव, खरं तर भावली एवडी साजरीगुजरी हाय, की तिच्याविषयी काय बोलावं तेच कळत न्हाई !"

" कळत न्हाई न्हवं ?"

" न्हाई कळत."

" मग झालं बगा. माजी सूनबाई सुदमुद या रांद्याच्या भावलीवानी हाय !"

" आत्ता हृयेला !"

" वया ग !"

" तिला काय म्हराटी-बिराटी समजत हुतं ?"

" कुनाला ?"

" सूनबाईला हो. काय बोलणं-पालणं झालं असंल की ?"

" बोलणं व्हायला तिला म्हराटी समजायला नगो व्हय ? आमची भाषा त्यास्नी कळायची न्हाई आनि त्यांची भाषा आमास्नी."

" मग ?"

" मग काय. खुळ्यागत एकमेकाकडं बगून निस्तं हसायचं, नाहीतर खाणाखुणा करायच्या ? मुकं बोलतंया न्हवं ? तसंच समदं. चंद्रकांतराव मदी असला म्हंजी काय तरी थोडसं जमायचं. त्या दोघांचं ' एस् फॅस् ' चाललं की आमी ऐकत गप्प गुमान बसत हुतो ! आमा अडान्यास्नी काय कळणार वो त्यातलं ?"

" पर सासू-सासरं म्हणून सूनबाईनं काय आचार-पाचार पाळला असंलच की ?"

" पाळला तर. आमाला कल्पना न्हवती, पर सूनबाई तशी लै गुणी आनि नम्र निघाली. गेल्या गेल्या डोक्यावरचा पदर सावरत असा पायाला हात लावून नमस्कार केला !"

" म्हंजी काय पातळ नेसतिया का काय वो ?"

" व्हय की. आमालाबी वाटलं न्हवतं..."

एकूण जर्मनीहून आणलेली मुलगी मडबिनीवाणी फ्राक घालीत असेल हीच सर्वांची कल्पना होती. ती पातळ नेसून सामोरी येईल, असे आबासाहेबांना काय पण कुणालाच वाटले नव्हते, पण आबासाहेबांनी आणि पाटलीणबाईंनी चांगलं आठ दिवस मुंबईत राहून बघितले होते. सूनबाईनं पातळ नेसलं होतं आणि रोज नेसत होती !

सूनबाईचे असले हे कौतुक आबासाहेब पाटलांच्या आणि पाटलीणबाईच्या तोंडून जे जे म्हणून ऐकायला मिळाले, ते ते शब्द नि शब्द सगळ्या गावभर पसरले आणि गावाची उत्सुकता एवढी शिगेला पोहोचली, की ज्याने त्याने येऊन मग पाटलांच्या जवळ आग्रह धरला, की पाटलांनी आपल्या सूनबाईला एकदा इकडे गावी आणावी. सूनबाई जशा पाटलांच्या तशा त्या सगळ्या गावाच्यादेखील सूनबाई आहेत. तेव्हा गावाला सूनबाईचे मुख बघायला मिळावे आणि तिचे कोडकौतुक पुरवता यावे.

मग पाटलांनी आपल्या मुलाला मुंबईला पत्र लिहिले–घरच्या सगळ्या माणसांना आणि गावाला सूनबाईंना बघायची इच्छा आहे; तरी सवड होईल तेव्हा उभयता एकदा इकडे येऊन जावे. पहिल्या एकदोन पत्रांची चंद्रकांतरावांनी विशेष दखल घेतली नाही, पण मग पत्रांवर पत्रे आली. समक्ष मुंबईला येणाऱ्या माणसांबरोबर निरोपावर निरोप धाडले गेले, तेव्हा चंद्रकांतरावांचा नाइलाज झाला.

आणि अगोदर वर्दी देऊन, चंद्रकांतराव आपल्या तांबुस–गोऱ्या बायकोबरोबर एक दिवस हुपरीला आले !

सगळं हुपरी गाव हललं ! घरातली माणसं तर सूनबाईसमोर बुजलेल्या जनावरागत अबून दबून वावरायची. मात्र चोरट्या नजरेनं तिची प्रत्येक बारीकसारीक हालचाल टिपली जात होती. आसपासच्या आयाबाया काहीबाही निमित्त करून पाटलांच्या घरी येत आणि त्या नव्या नवलाच्या सूनबाईला एकवार नजरेखाली घालून, आरखूनपारखून निघून जात. सगळ्या गावभर घराघरांतनं तिला आमंत्रणं आली.

हुपरी गावातल्या सगळ्याच गोष्टी अगदी नवखेपणानं अनुभवीत असलेल्या त्या जर्मन सुवासिनीलादेखील मग त्या साऱ्यांची अपूर्वाई वाटली आणि पहिल्या दिवशी मोठ्या हौसेनं आणि कौतुकानं ती आमंत्रणं आलेल्या चारएक घरी फिरून आली.

पण ती ज्या ज्या घरी गेली, तिथे तिची पाटावर बसून खणा-नारळानं ओटी भरण्यात आली. त्या ओटी भरलेल्या पदरानं वडीलमाणसांच्या पाया पडण्याचा रिवाज तिला शिकवला गेला.तिला नाव घ्यायचा आग्रह झाला. फराळानं भरलेली ताटं आणून तिच्यासमोर ठेवण्यात आली आणि तिची मोठीच तारांबळ उडाली !

संध्याकाळी या सगळ्या गोतावळ्यातून जेव्हा तिची सुटका झाली आणि वरच्या खोलीत चंद्रकांतरावांच्याकडे जायला तिला मोकळीक मिळाली, तेव्हा कुठे तिला हायसे वाटले.

गोड तक्रारीच्या स्वरात ती चंद्रकांतरावांना इंग्रजीत म्हणाली,

"या सगळ्या भाबड्या, प्रेमळ नि अत्यंत अगत्यशील अशा माणसांत मिळूनमिसळून जायची, त्यांच्याशी एकरूप व्हायची खूप हौस आल्या आल्या मला वाटली, पण ती पहिल्याच दिवशी पुरती फिटली म्हणायची !"

"का ? काय झाले ?"

" अहो, एक इथले रीतिरिवाज म्हणजे मला मुळीच ठाऊक नाहीत. बरे ते सगळे समजून घेऊन वागायचे म्हटले तरी सवय नसल्याने माझी नुसती तारांबळ उडाली. जिथे जात होते तिथे चांगले ताट भरभरून फराळाचे पदार्थ समोर आणून ठेवीत होते. पहिल्यांदा तर आता हे सगळे ताट संपवावे लागते की काय म्हणून मला धडकीच भरली. खाऊन खाऊन -तरी माणूस किती खाणार ? शेवट शेवटच्या एक दोन घरी तर एक घास उचलून तोंडात टाकायचा म्हणजे जिवावर येत होते. बरे, काही न घेता तसेच उठायचे म्हटले तर पुन्हा एवढी अगत्याने बोलवणारी ती माणसे नाराज होतील, म्हणून नको वाटायचे !"

सगळे तिचे म्हणणे समजून घेऊन चंद्रकांतराव तिला समजावून देत म्हणाले,

" हे बघ, तुझ्यासमोर आणून ठेवलेल्या फराळाच्या ताटांना तू नुस्ता हात लावून ते बाजूला सारलेस तरी चालेल. पुन्हा इथले सगळे रीतिरिवाज तू काटकोरपणे पाळले पाहिजेस, अशी तुझ्याकडून अपेक्षा नसते. फक्त या निमित्ताने सगळ्यांना तुला बघायचे आहे. तू दिसतेस कशी ? हसतेस कशी ? बोलतेस कशी ? वागतेस कशी ? याचेच खरे तर सगळ्यांना कौतुक आहे. तेव्हा जिथे जिथे निमंत्रणे आली आहेत, तिथे तिथे तू थोडा वेळ औपचारिकरीत्या जाऊन बसलीस आणि परत फिरलीस तरी खूप आहे. यातूनही तुला शक्य होईल, जेवढे झेपेल तेवढेच तू कर. अधिक आग्रह नाही."

चंद्रकांतरावांच्या या खुलाशाने ती बरीच निःसंकोच झाली. दुसऱ्या दिवसापासून जिथे जिथे निमंत्रणे आली, तिथे ती आवर्जून गेली, पण ताटातल्या फराळांच्या पदार्थांना तिने फारसा हात लावला नाही. चहाही दिलगिरी व्यक्त करून नाकारला. इथल्या रीतिरिवाजांची बंधने तिने मनावर ओझ्यांसारखी मानली नाहीत. ज्या गोष्टी तिला स्वतःच्या कुवतीपलीकडे वाटल्या त्या तिने टाळल्या, पण ओटी भरून घेण्याचा कार्यक्रम तिला मनापासून आवडला. म्हणून तिने तो स्वीकारला.

चंद्रकांतरावांच्या रजेचे हे चार-सहा दिवस कसे सरले हे तिच्या लक्षातही आले नाही. घरोघरी जाऊन ती फिरून आली. स्वयंपाकातले इकडचे पदार्थ, पक्वान्ने कशी करावीत, याच्या पद्धती समजावून घ्यायचा, शिकायचा प्रयत्न तिने केला. बायकांच्या फुगड्या, झिम्मांच्या खेळात ती रंगली. देऊळ-मंदिरे ती फिरून आली. रात्री बारा बारापर्यंत जागून तिने लग्नातल्या नवरा-बायकोंच्या वराती पाहिल्या. शेत-मळ्यांतून फिरली. विहिरीतून पाणी खेचून वर काढणाऱ्या मोटांचे आणि साध्या बैलगाड्यांचेही तिला वेडे आकर्षण वाटले. इरकली लुगडे नेसून बघताना त्याचा घोळ सावरता सावरता तिला पुरेवाट झाली.

प्रत्यक्ष गाव सोडायचा आणि मुंबईला जायचा दिवस उजाडला, तेव्हा तर तिला खरेही वाटेना. मुंबईहून बायकोला घेऊन येताना चंद्रकांतराव साशंक होते, पण येथून परत फिरताना मात्र त्यांना मोठे समाधान वाटले. ' अजून एक दोन दिवस राहा ,'

म्हणून थेट गाडीत बसेपर्यंत चंद्रकांतरावांना आग्रह होत होता, पण रजा संपत आली असल्यामुळे त्यांचा नाइलाज होता. चंद्रकांतरावांनी सहकुटुंब हुपरी सोडली.

आणि नुसत्या त्यांच्या आठवणी मागे उरल्या. त्यांनी सगळ्या पंचक्रोशीत कौतुकाच्या-कुतूहलाच्या लाटांवर लाटा उठवल्या.

यावर सात-आठ महिने उलटले.

नवे वर्ष उजाडले. जुन्या वर्षाच्या सुगीनं चांगलाच हात दिला आणि त्याच्या बळावर चंद्रकांतरावांच्या पाठच्या भावाचं लगीन उरकून घ्यायचा बेत आबासाहेबांच्या मनानं योजला. मुलाचे म्हणून घरचे असे, तसे हे पहिलेच कार्य होते. त्यामुळे ते मुलाघरीच व्हावे आणि घडाक्यात वाजतगाजत मोठ्या थाटानं साजरे करावे, अशी सगळ्यांचीच इच्छा होती. चंद्रकांतरावांना सांगून आलेल्या मुलींतलीच एक मुलगी निश्चित केली. साखरपुडा झाला. लग्नाची तिथी निश्चित झाली आणि चंद्रकांतरावांना पत्र गेले–

' तुझ्या लग्नाच्या निमित्तानं खूप हौस करावयाची होती, पण तशी संधी मिळाली नाही, म्हणून हे दुसरं घरचं कार्य आपल्याकडंच योजलंय. तेव्हा लग्नाला सहपरिवार अवश्य ये. सूनबाईंना बरोबर घेऊन यायला विसरू नको. कोणत्याही प्रकारची अडचण मध्ये उभी करू नकोस.'

पत्र तर पाठविलंच, पण तेवढ्याच विश्वासावर थांबायला पाटलांची तयारी नव्हती. आबासाहेब स्वत: जातीनं एकदा मुंबईला जाऊन आले आणि दुसऱ्या मुलाच्या लग्नाला येण्याविषयी आपल्या थोरल्या मुलाला आणि सूनबाईला आग्रहाने बजावून आले.

उद्या लग्न तर आज पहाटे तीन वाजल्यापासनं मांडवाच्या सजावटीच्या कामाला प्रारंभ झाला होता. नवरीकडलं वऱ्हाड असं दिवस उजडायला गावसीमेवर येऊन ठेपणार होतं, तेव्हा त्यांच्या उसाभरीत माणसं गुंतली होती. घरच्या पै-पावण्यांची आणि जमलेल्या गोतावळ्याची व्यवस्था बघायला हवी होती. गावच्या पाटलाचं वड्या घरचं-लगीन ते. त्याची नुसती एकच धांदल उडाली होती आणि त्या धांदलीत पूर्णपणे बुडालेल्या आबासाहेब पाटलांना नि घरच्या माणसांना क्षणाची म्हणून फुरसत नव्हती. या गडबडघाईत दिवसाचे दोन प्रहर उलटले.

तिसरा प्रहर उजाडला आणि हातात एक सुटसुटीत लेदरबॅग घेऊन चंद्रकांतराव लग्नघरच्या दारात हजर झाले. आले ते सडेच ! चंद्रकांतरावांनी सूनबाईला आपल्याबरोबर आणले नाही, ते एकटेच आले आहेत, हे पाहिले आणि आबासाहेबांचे मस्तकच बिघडले. पाटलीणबाईंना तर हुंदकाच फुटला. तोरणा-बाशिंगानं सजवलेल्या त्या घराची कळाच फिरली. आडामोडा घातल्यासारखी कार्यात गुंतलेली सगळी माणसं थटून उभी राहिली. चंद्रकांतकडं ढुंकूनही न बघता आबासाहेब उठले आणि सगळे पुढचे कार्यकर्तव्य सोडून सरळ जाऊन मांडवातल्या मधल्या मंचकावर गुडघामिठी

घालून ढिम् बसून राहिले ! कर्तापुरुषच असा रुसून फुगून बसल्यावर सगळ्यांनाच अवघडल्यागत झालं. चंद्रकांतरावांचं आगमन असं शुभकार्याच्या वेळी अपशकुना-सारखं ठरलं आणि कर्तीसवरती सुज्ञ माणसं सगळी तणतणायला लागली. चंद्रकांत-रावांना उघड उघड दोष द्यायला लागली.

चंद्रकांतरावांच्यावर चारी दिशांनी असा बोलण्याचा मारा व्हायला लागला आणि त्यांना स्पष्ट काहीतरी खुलासा देण्याशिवाय गत्यंतर उरले नाही.

"तुमचं सगळ्यांचं खरं आहे. मी माझी बायको बरोबर आणलेली नाही, हा माझा घोर अपराध झाला. हे मी मान्य करीन, पण अगोदर माझीही बाजू ऐकून घ्यावी !"

"तुमची बाजू आनि आता काय ऐकून घ्यावी ? आईवडिलांच्या शब्दाला आनि परत्यक्ष पाठच्या भावाच्या लग्नाला तुमी काय किंमत दिलिया आनि त्येंचा काय मान राखलाय ?"

"आधी ऐकून तरी घ्या ! कुणाच्या मानखंडणेचा माझा हेतू नाही. लग्न करून मुलगी मी जर्मनीहून आणली. तिचा सगळा जन्म जर्मनीत गेला. तिथल्या हवा-पाण्यात ती वाढली. तिथल्या खाण्या-पिण्यावर पोसली गेली. एकाएकी सात समुद्र पार करून मी तिला मुंबईला घेऊन आलो. मुंबईत हवा, पाणी नि वातावरणा-पासून सगळ्याच गोष्टी बदलल्या. या बदललेल्या परिस्थितीत तिचा कितपत निभाव लागेल, म्हणून मी साशंक होतो. तिला जपता येईल तितका जपत होतो. तरीसुद्धा मुंबईची हवा तिला सुरवातीला बाधलीच. मागच्या वेळी तुमच्या सर्वांच्या आग्रहाखातर मी तिला हुपरीला घेऊन आलो. इथेही आणल्यावर आपण सर्वांनी तिला कशाची काय कमतरता पडू नये, म्हणून सर्वपरीने प्रयत्न केले. सगळे तिच्या कलाकलाने घेतले, तिला जपता येईल तितके जपले, पण तरीही मी साशंक होतो आणि शवटी हा संशयच मुंबईला गेल्यावर खरा ठरला."

"तिला हुपरी मानवली नाही. उलट बाधली. मुंबईला गेल्या गेल्या तिनं चांगलं महिनाभर अंथरूण धरलं. 'जगते की मरते,' अशा एकेकदा अवस्था आल्या आणि माझी नोकरी सांभाळून, तिचा आजार निस्तरतानिस्तरता माझ्या नाकी नऊ आले. तिच्या आजाराचं मी मुद्दाम पत्रद्वारे कळवलं नव्हतं. का की हुपरीहून गेल्या गेल्या ती आजारी पडली, हे ऐकून तुमच्या सर्वांच्याच जिवाला घोर लागला असता. तसं मला होऊ द्यायचं नव्हतं. त्या आजाराविषयी मी कधीच बोललो नसतो, पण तुम्हाला योग्य तो खुलासा देणे भाग होते. त्याशिवाय तुमचे समाधान झाले नसते आणि म्हणून माझा नाइलाज झाला. सारे बोलावे लागले."

"इथल्या वातावरणात अजून ती रुळलेली नाही. अजून दिवस जाऊ द्यात. इथल्या हवापाण्याचा तिला सराव होऊ द्या. इथल्या मातीत तिला मुरू द्या आणि मग सावकाश तुम्ही म्हणाल तेव्हा केव्हाही तिला इथे हुपरीला आणून ठेवतो.

वाटेल तितके दिवस राहिली तरी मी बिनघोर होईन! पण या वेळेला—एवढ्या लौकर—तिला इथे आणण्याचा आग्रह मला अनाठायी वाटतो. तो तुम्ही धरू नये. मी नुसती सोय पाहिली आहे. यात मानअपमान मानण्यासारखं काय आहे ?..."

मध्ये कुणीच बोलत नव्हते. निवांतपणे प्रत्येकजण चंद्रकांतरावांचा हा सविस्तर खुलासा ऐकून घेत होता. या बोलण्यानं निवत चाललेले आबासाहेब पाटील विचार करीत होते.

मांडवातल्या कामानं आता पुन्हा हळूहळू गती घ्यायला सुरवात केली. खोळंबून उभी राहिलेली माणसं जी ती आपआपल्या उद्योगाला वळली आणि रागारागानं मघनंच सगळं सोडून देऊन, आमानधपक्यानं मांडवातल्या मधल्या मंचकावर जाऊन बसलेल्या आबासाहेबांची गुडघेमिठी आता सैल पडत चालली.

• • •

## खुलासा

'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही लेखमाला 'माणूस' मध्ये जून १९६४ या अंकापासून सुरू आहे. ही लेखमाला असलेल्या 'माणूस'च्या मागील अंकांची अनेक वाचकांकडून सारखी मागणी येत आहे. अंक शिल्लक नसल्याने ही मागणी पुरी करता येत नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

— व्यवस्थापक




तुमचा पैसा


**पंजाब नॅशनल बँकेंत**

कारणी लागतो, गतिमान होतो.

**समर्थ**

होऊन राष्ट्राची सेवा करतो.

Pr 6528/Mar Ad 2



एल् अलेमिन घेऊन तिथेच थबकलेल्या रोमेलला पुरेशा रसदीचे अभावी तिथेच संरक्षक-भूमिका घ्यावी लागलेली होती. परंतु १५ ऑगस्टच्या सुमारास आफ्रिकेतील दोस्त सैन्याची सूत्रे ऑचिनलेक्कडून काढून घेण्यात येऊन त्याचे जागी जनरल माँटगोमेरी व जनरल अलेक्झांडर हे कमांडर इन चीफ (मिडल् इस्ट) म्हणून नेमले गेले होते. अमेरिकेतून आलेल्या शेरमन टँक्सचा पुरवठा आता दोस्त सैन्याला झालेला होता. दोस्तांची आफ्रिकेतील आतापर्यंतची दैन्यावस्था अमेरिकेने शस्त्रास्त्रे व अन्नधान्य या दोन्ही बाबतीत संपुष्टात आणलेली होती.

दोस्तांच्या सुदैवाने याचवेळी रोमेल आजारी पडला व व्हिएन्ना शहराजवळील थंड हवेच्या ठिकाणी विश्रांतीसाठी गेला. त्याला लिव्हरचा त्रास सुरू झाला होता. २२ ऑक्टोबरपर्यंत रोमेल विश्रांती घेत होता, परंतु २३ ऑक्टोबरला रात्री ९।। वाजता माँटगोमेरीने एल् अलेमिनच्या दिशेने चढाईला सुरवात केल्याचे वृत्त हिटलरला मिळाले व २४ ऑक्टोबरला रोमेलचा फोन घणघणला. हिटलरने फोनवर सांगितले—

" Rommel, the news from Africa sounds bad. The situation seems somewhat obscure. Do you feel capable of returning to Africa & taking over there again ?"

[ रोमेल, आफ्रिकेतील वृत्त ठीक दिसत नाही. तेथील परिस्थिती काहीशी चमत्कारिक झाल्याचे दिसते. तुला तावडतोब आफ्रिकेत जाऊन पुनः सूत्रे हाती घेणे शक्य होईल काय ? ]

फ्यूररचा हा शूर इमानी सेनानी आजारी अवस्थेत तातडीने आफ्रिकेत परतला. परंतु तो पोचविण्यापूर्वी एल् अलेमिनच्या लढाईचे पारडे दोस्तांच्याकडे झुकले होते.

उत्तरार्ध

लेखांक : १२ वा

# आगी

## भस्मासुराचा उदयास्त

**रा. म. शास्त्री**

रोमेलने आल्या आल्या परिस्थितीचा अंदाज घेतला. ब्रिटिश विमानदलाने माल्टा येथून जोराचे हल्ले सुरू केले होते व जर्मन सैन्याची पिछाडी बरीचशी खिळखिळी केली होती. लढाई हातातून गेल्यासारखी होती. तेव्हा दाणादाण उडण्यापूर्वी एल् अलेमिनहून माघार घेऊ द्यावी, याकरता २ नोव्हेंबरला रोमेलने हिटलरला त्याच्या छावणीत रेडिओ-संदेश धाडला की 'टिकाव लागणे कठीण आहे व माघार घेत आहे.' अलेमिनपासून चाळीस मैल मागे फुका (Fuka) या ठाण्याच्या दिशेने रोमेलने फौजा मागे घेण्यास तदनंतर सुरवातही केली होती. कारण एल् अलेमिनच्या दक्षिण बगलेला दोस्त सैन्याने खिंडार पाडून इटालियन सैन्याचा खातमा उडवायला सुरवातही केली होती.

हिटलरचे प्रत्युत्तर आले व ते वाचून रोमेल स्तिमित झाला. हिटलरने कळवले–

" I and the German people are watching the heroic defensive battle in Egypt with faithful trust in your power of leadership. In the situation in which you now find yourself, there can be no other consideration save that of holding fast– of not retreating one step. You can show your troops no other way than that which leads to victory or to death......"

–Adolf Hitler

[ मी व जर्मन जनता इजिप्तमध्ये चालू असलेल्या तुमच्या शूर संरक्षक लढाईकडे उत्सुकतेने पाहत आहोत. तुझ्या नेतृत्वावर आमचा भरपूर विश्वास आहे. आता ज्या परिस्थितीत तुम्ही आहात, त्या परिस्थितीत एकही पाऊल मागे न घेता निर्धा-

राने उभे ठाकणे यापेक्षा अन्य पर्यायच उरत नाही. तू तुझ्या सैन्याला 'जिंकू' किंवा 'मरू' यापेक्षा अन्य मार्ग दाखवू नये. – ॲडॉल्फ हिटलर ]

### संदेश आला, पण उशिरा

"एक पाऊलही मागे न घेता निर्धाराने उभे ठाका," ही फ्यूररची लक्ष्मणरेषा एकीकडे व जवळजवळ ५०,००० सैनिकांची कत्तल उडणार ही काळ्या दगडावरची रेघ दुसरीकडे, अशा विलक्षण पेचात रोमेल आता सापडला होता. कालांतराने जे संकट हिटलरच्या सर्वच विश्वासू सेनानींपुढे उभे राहिले, त्याची छाया आता याक्षणी रोमेलवर पडली होती. रोमेलचा सहाय्यक सेनापती जनरल रिटर याने फ्यूररची ही आज्ञा मानण्यास स्पष्ट नकार दर्शविला, परंतु रोमेलने मात्र नेत्याची आज्ञा शिरसावंद्य मानणे हेच आपले कर्तव्य मानून हिटलरच्या या उघडउघड आत्मघाता-कडे नेणाऱ्या निर्णयाला मान तुकवली. रोमेलनेच आपल्या दैनंदिनीत लिहिले आहे–

"मी स्वत: माझ्या सैनिकांकडून विनाअट प्रत्येक आज्ञेचे पालन व्हावे, अशी अपेक्षा ठेवीत असे आणि म्हणून याच तत्त्वानुसार मी यावेळी वागण्याचे ठरवले." नेत्यांचे चुकीचे निर्णय शांतताकालात विनातक्रार सहन करणे व युद्धकालात 'सहन' करणे यात महत्त्वाचे अंतर नेहमीच राहणार. रणांगणावर साधकबाधक विचार करण्यासही फुरसत नसते–अशावेळी रोमेलने स्वीकारलेले धोरणच योग्य समजले पाहिजे. हिटलरचा हा निर्णय कमालीचा आत्मघातकी ठरला तरी त्याबद्दल सर्व दोष हिटलरच्या आसुरी आत्मविश्वासाला द्यावा लागेल."

३ नोव्हेंबरला रोमेल व रिटर यांचे या बाबतीत बोलणे झाले. ४ नोव्हेंबरला "हिटलरची आज्ञा ही अचाट मूर्खपणाची आहे व त्याच्या तंत्राने चालणे मला शक्य नाही," असे उद्गार काढून जनरल रिटर आपली सर्व लष्करी सन्मानचिन्हे अंगावर घालून त्याच्या जळणाऱ्या टँकजवळ निश्चल उभा राहिला व ब्रिटिशांना शरण गेला. त्याच दिवशी सायंकाळी ब्रिटिश छावणीत जनरल माँटगोमेरी याचेबरोबर त्याने खाना घेतला.

रोमेलने पिछेहाट थांबविण्याची आज्ञा सोडली व एक खास दूत विमानाने त्याने हिटलरच्या भेटीस पाठवला. ५ नोव्हेंबरला हिटलरचा संदेश आला–

" I agree to the withdrawal to your Army into the Fuka position. "

[ फुका ठाण्यापर्यंत तुझ्या सेनेने मागे येण्यास माझी हरकत नाही. ]

फूकापर्यंत सेनेने माघार घेण्यास हिटलरची ही संमती फार उशिरा आली... कारण माँटगोमेरीच्या टँक्स तोपर्यंत फुका परिसरात थडकल्या होत्या.

पुरत्या १५ दिवसांत रोमेलला जवळजवळ ७०० मैल माघार घ्यावी लागली ! बेगाझीदेखील ब्रिटिशांच्या हाती पडले. एल् अलेमिन हे हिटलरचे छोटेसे वॉटर्लू

ठरले. या पानिपतात रोमेलच्या सैन्याची मोठ्या संख्येने लांडगेतोड झाली. ५९,००० जर्मन व इटालियन सैन्य मारले गेले वा जखमी होऊन कैद झाले. उरलेले सुमारे ३७,००० सैन्य (यात १०,००० जर्मन होते.) सुमारे ५०–६० टँकनिशी आता सतत माघार घेत होते.

ज्या दोन प्रमुख लढयांत हिटलरच्या तिसऱ्या राईशला कायमचे तडे गेले, त्यांतील एल् अलेमिनची ही लढाई संपते न संपते तोच उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर जिब्राल्टरजवळ अमेरिकन व ब्रिटिश सैन्य उतरल्याची बातमी ७ नोव्हेंबर, १९४२ ला हिटरला कळली.

## आयसेन हॉवर उतरला

जिब्राल्टरभोवती ब्रिटिश व अमेरिकन आरमाराची जमवाजमव सुरू झाल्याचे वृत्त हिटलरच्या कानी गुप्तहेरखात्यातर्फे आलेले होते, परंतु ही तयारी रोमेलला मागून घेरण्यासाठी व त्याकरिता ' ट्रिपोली ' किंवा बेगाझी येथे दोस्त सैन्ये उतरवण्यासाठी असावी, असा हिटलरचा कयास होता. अर्थातच जनरल आयसेन हॉवर याने ८ नोव्हेंबर, १९४२ ला पहाटे ५–३० वा. मोरोक्को व अल्जीरियाच्या समुद्र-किनाऱ्यावर पाऊल टाकले व हिटलर गडबडला. अल्जीरिया हा पराभूत फ्रेंच सरकारच्या ताब्यातील भूभाग असल्यामुळे तेथे अॅडमिरल दाली हा फ्रेंच नाविकदल प्रमुख दोस्त सैन्याला कडवा प्रतिकार करीत आहे, अशा बातम्या प्रथम प्रथम हिटलरला मिळाल्या.

७ नोव्हेंबरला हिटलर तातडीने प्रशियातून म्युनिचकडे निघाला होता. गाडीतून त्याचा हा प्रवास सुरू होता व या प्रवासातच फ्रेंच सैन्याने व आरमाराने दोस्तांना प्रतिकार सुरू केल्याचे वृत्त त्याला मिळाले. जे फ्रेंच आरमार व सैन्य दोन वर्षांपूर्वी ब्रिटिशांच्या खांद्याला खांदा लावून लढले होते, तेच सैन्य व आरमार आता ब्रिटिशांवर गोळीबार करू लागले होते.

हिटलरने तातडीने दोन आज्ञा सोडल्या.


१. क्रीट बेटावरील सैन्य वाढवा. कारण आफ्रिकेत रोमेलला त्याची गरज आता लागेल.

२. जनरल वेंगाँ व जनरल गिराँ यांना कैद करून त्यांना अटकेत टाका.

यांपैकी जनरल गिराँ हा ५ नोव्हेंबरलाच एका ब्रिटिश पाणबुडीच्या सहाय्याने निसटला होता व अमेरिकन व ब्रिटिश सैन्य आफ्रिकन किनाऱ्यावर उतरण्यापूर्वी जिब्राल्टर येथे त्याची आयसेन हॉवर यांच्याशी भेटही झाली होती.

## फ्रान्सचा दोस्त सैन्याला प्रतिकार

पराभूत फ्रेंच सरकारचा पंतप्रधान यावेळी पिरी लावल हा होता व अध्यक्ष वयोवृद्ध मार्शल पेताँ होते. ८ नोव्हेंबरला सकाळी पेताँ यांनी अमेरिकन सरकारशी संबंध तोडून टाकण्याची घोषणा केली व फ्रेंच सरकारही दोस्तांना आफ्रिकेत विरोध करील, असे जाहीर केले.




८ जानेवारी १९४३

पराभूत फ्रेंच सरकार इंग्लंड–अमेरिकेशी आता वैर मांडून बसले, तरी ते केवळ परिस्थितीमुळे, ही गोष्ट उघड होती. अर्ध्या फ्रान्सवर अतिक्रमण करून बसलेल्या जर्मनांच्या प्रेमाखातर काही फ्रेंच सैनिक लढणार नव्हते, तर फ्रेंच सरकारला हिटलरकडून अधिक त्रास होऊ नये व व्याप्त फ्रान्समधील फ्रेंच नागरिकांना जर्मनांनी छळू नये, याकरताच केवळ पेताँचे पराभूत फ्रेंच सरकार हे अल्जीरियात दोस्त सैन्याला आता विरोध करणार होते.

याचा योग्य तो अर्थ हिटलरने काढलेला होता. जर दोस्त सैन्ये उद्या आफ्रिकेत उतरली– त्याप्रमाणे पराभूत फ्रेंच सरकारच्या किनाऱ्यावर म्हणजे टुलोनच्या आसपास उतरली– तर फ्रेंच सरकार त्याला फारसा विरोधही करणार नाही. टुलोन येथील सर्व फ्रेंच आरमार व फ्रेंच सैन्यच दोस्तांना जाऊन मिळाले तर? यावर उपाय एकच होता, की सर्व फ्रान्सचा कबजा जर्मनांनी करणे. हिटलरने हाच निर्णय घेतला व १० नोव्हेंबरला म्युनिच येथे भेटीसाठी, पराभूत फ्रेंच सरकारचा पंतप्रधान पिरी लावल याला निमंत्रण रवाना झाले.

जर्मनीशी संगनमत करून दोस्तांवर उलटलेल्या या फ्रेंच पंतप्रधानाला युद्धसमाप्तीनंतर देशद्रोही म्हणून स्वतंत्र फ्रेंच सरकारने फासावर लटकावले. हा लावल १७

नोव्हेंबरला हिटलरच्या भेटीसाठी आला तेव्हा कसा दिसत होता, याचे खुमासदार वर्णन सियानो या इटालियन परराष्ट्रमंत्र्याने आपल्या दैनंदिनीत केलेले आढळते.

" Laval with his white tie and middle class French peasant attire, is very much out of place in the great salon, among so many uniforms. He tries to speak in a familiar tone about his trip & his long sleep in the car, but his words go unheaded. Hitler treats him with frigid courtesy. "

[ पांढरा टाय व मध्यमवर्गीय फ्रेंच शेतकऱ्यासारखा नटलेला लावल हा त्या गाडीत, लष्करी पेहराव घातलेल्या अधिकाऱ्यांच्या घोळक्यात शोभत नव्हता. फार घसट असावी तशा आवाजात तो आपल्या प्रवासासंबंधी व मोटारीत त्याला लागलेल्या स्वस्थ झोपेसंबंधी काही सांगत होता, परंतु त्याच्याकडे कुणाचेच लक्ष नव्हते. हिटलर त्याच्याशी आढचतेखोर सभ्यतेने वागत होता– ]

एकीकडे लावल यांच्याशी उर्वरित अव्याप्त फ्रान्स व्यापण्याच्या वाटाघाटी चालू असतानाच हिटलरने १० नोव्हेंबर, १९४२ ला सकाळी १० वाजता सर्व फ्रान्सचा कबजा करण्याचे व टुलोन बंदर ताब्यात घेण्याचे हुकूम सोडले. परंतु टुलोनचा कबजा करण्यापूर्वी बरेच आरमार निकाली करून फ्रेंच नाविकदलाचे काही अधिकारी टुलोनहून निसटले.

याचबरोबर फ्रेंच ट्युनिशियात हिटलरने सुमारे २५०० इटाली–जर्मन सैन्य उतरवून आयसेन हॉवरचे सैन्य तेथे पोचण्यापूर्वी कबजा बसवला व रोमेलच्या पिछाडीस निर्माण झालेला धोका कमी करण्यात यश मिळवले. परंतु हेच सैन्य व सामग्री रोमेलला त्याने एल् अलेमिन येथे तो हाका घालीत असताना पाठवली असती तर ! मध्यपूर्वेतील युद्धाचा रंगच एव्हाना पालटला असता ! !

## रशियन चढाईला प्रारंभ

आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर आयसेन हॉवरची दोस्त सैन्ये उतरलेली, रोमेलचा पाठलाग करीत मॉंटगोमोरी सुटलेला, अशा परिस्थितीत ट्युनिशियात सैन्य उतरवून हिटलरने आफ्रिकेतील युद्धात जर्मन सैन्याची पिछेहाट सावरण्यात थोडेफार यश मिळवले व पुन्हा प्रशियात युद्धछावणीत परतण्यापूर्वी हिटलर बर्चेसगार्डन येथे विश्रांतीसाठी गेला. परंतु १९ नोव्हेंबरला रशियन आघाडीवरून स्टॅलिनग्राडच्या उत्तर व दक्षिण बगलेवर रशियन सेनेने नवी चढाई सुरू केल्याचे वृत्त येऊन थडकले. याचा अर्थ स्टॅलिनग्राडला वेटोळे घालून बसलेल्या जर्मन सैन्याच्या उत्तर–दक्षिण बगला आता धोक्यात आल्या होत्या. जी गोष्ट जनरल हाल्डर व फील्ड मार्शल लीस्ट याने दोन महिन्यांपूर्वी होणार होणार म्हणून हिटलरला स्पष्ट सांगून वनवास पत्करला, ती रशियन चढाई १९ नोव्हेंबरला सुरू झाली.

प्रशियातील रास्टेनबर्ग येथील युद्धछावणीत जनलर हाल्डरच्या जागी आलेल्या

जनलर झेइटलेर याने कळवले,–

" The Russians are clearly driving in great strength from the north and the south to cut off Stalingrad & to force the German sixth Army there either to beat a hasty retreat to the west or to see itself surrounded. "

म्हणजे रशियन सैन्ये मोठ्या संख्येने उत्तरेकडून व दक्षिणेकडून स्टॅलिनग्राडला कोंडीत घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्टॅलिनग्राडमध्ये घुसलेल्या सहाव्या जर्मन सेनेला आता कोंडी पुरती बंद होण्यापूर्वी स्टॅलिनग्राड सोडून पश्चिमेकडे मागे हटले पाहिजे, अन्यथा हे सैन्य कोंडले जाणार आहे.

जनलर झेइट्लेर याने सहाव्या जर्मन सेनेला रशियन सेनेचे जबडे मिटविण्यापूर्वी बाहेर खेचण्याची परवानगी हिटलरकडे तातडीने मागितली. स्टॅलिनग्राडमध्ये कोंडल्या जाणाऱ्या या सहाव्या जर्मन सेनेचा सेनापती जनलर पोलस यानेच या बाबतीत छावणीकडे विचारणा केली होती.

जनरल झेइटलेरकडून स्टॅलिनग्राडचा विळखा उठवण्याची सूचना येताच हिटलर चढ्या आवाजात गरजला––

" I won't leave the Volga ! I want go back from the Volga. "

[ मी व्होल्गा सोडणार नाही. व्होल्गापासून मागे फिरणे मला मंजूर नाही. ]

स्टॅलिनग्राड शहराच्या पूर्वेस व्होल्गा व पश्चिमेस डॉन नद्या उत्तर–दक्षिण वाहतात. जर्मन सैन्य उत्तरेस व्होल्गापर्यंत पोचले होते, त्याला उद्देशून हिटलरची ही वल्गना होती. प्रत्यक्षात मात्र उत्तरेकडे व दक्षिणेकडे रशियन सैन्याचा रेटा क्षणाक्षणाला वाढत होता.

२२ नोव्हेंबरला हिटलर रास्टेनबर्ग येथे युद्धछावणीत येऊन पोचला, तो रशियन प्रतिचढाईचा चौथा दिवस होता. आघाडीवरील वृत्त भयंकर होते. जनलर पोलसचे सैन्य कोंडीत पकडले गेले होते. उत्तर–दक्षिणेकडून आलेल्या रशियन सेनेने स्टॅलिनग्राडच्या पूर्वेस हातमिळवणी केली होती. कालाच् (Kalach) या ठिकाणी स्टॅलिनग्राडच्या पूर्वेस ४० मैलांवर या रशियन सेनेचे जबडे मिटले गेले होते.

सायंकाळी जनरल पोलसचा रेडिओसंदेश आला––

" आम्ही कोंडले गेले आहोत––"

स्टॅलिनग्राडमध्ये कोंडल्या गेलेल्या जर्मन सेनेला आता दारूगोळा व अन्नरसद कशी पोचणार ? रोज ७५० टनांची रसद विमानमार्गे टाकणे लुफ्तवाफ्च्या आवाक्याबाहेर होते. रशियन फायटर विमाने आकाशात त्यांचा मुकाबला करायला आता सज्ज होती.

### मॅन्स्टीनचा सल्लाही धुडकावला

२५ नोव्हेंबरला लेनिनग्राड आघाडीवरील फील्ड मार्शल मॅन्स्टीन या घडाडीच्या



शत्रूच्या प्रतिकारार्थ हजारो रशियन महिला खंदक खणीत होत्या.

जर्मन सेनानीला हिटलरने पाचारण केले. मॅन्स्टीनने परिस्थितीचा अंदाज घेऊन सांगितले, की जनरल पोलसचे सैन्य कोंडीतून वाचवावयाचे असेल, तर एकच मार्ग आहे. तो म्हणजे पोलसने आतून बाहेर पडण्याचा, म्हणजे मागे येण्याचा प्रयत्न करावा व मॅन्स्टीनने दक्षिण बगलांवर खालून रेटा द्यावा. या प्रकाराने आता सैन्य वाचवावयाचे तरी स्टॅलिनग्राडची पकड सोडणे पोलसला भागच होणार होते.

परंतु फ्रान्सच्या युद्धात ज्याच्या व्यूहरचनेमुळे दोस्तांचे ' डंकर्क ' झाले व फ्रान्स गर्भगळीत झाला, त्या मॅन्स्टीनचा हा बहुमोल सल्ला हिटलरने झिडकारला. हिटलरने मॅन्स्टीनला बजावले,

" स्टॅलिनग्राडमधून बाहेर पडण्याची आज्ञा पोलसला देता येणार नाही. मॅन्स्टीननेच रशियन कोंडी फोडून स्टॅलिनग्राडपर्यंत मुसंडी मारली पाहिजे."

अशक्य! त्रिवार अशक्य!! जी गोष्ट शक्यच नव्हती, ती मॅन्स्टीनने अखेर पत्करली, कारण फ्यूरर ऐकेना. १२ डिसेंबरला रशियन कोंडी फोडण्यासाठी मॅन्स्टीनने दक्षिणेकडून स्टॅलिनग्राडपासून सुमारे ७५ मैलांवर जर्मन प्रतिचढाईला सुरवात केली. सात दिवसांत त्याने ४० मैल अंतर काटले व स्टॅलिनग्राडपासून दक्षिणेकडे तो ३५ मैलांवर पोचला. यावेळी मॅन्स्टीनच्या सैन्याच्या हालचाली जनरल पोलसला स्टॅलिनग्राडमधून दिसू लागल्या होत्या. यावेळी तरी जनरल पोलसला कोंडीच्या आतून धक्का देऊन बाहेर पडण्याची अनुज्ञा हिटलरने दिली असती, तरी आत कोंडलेल्या व उपासमार आणि थंडीने गांजलेल्या २,००,००० जर्मन सैन्याची कत्तल टाळता आली असती.

परंतु हिटलरने आता तर आपलाच व्यूह बरोबर ठरणार, असा आत्मविश्वास प्रकट करण्यास सुरवात केली.

" Lost Victoris " (हातीतोंडी येऊन पाठ फिरवलेले विजय)—या आपल्या पुस्तकात फील्ड मार्शल मॅन्स्टीनने युद्धानंतर लिहिले आहे—

" On Dec. 19th in disobedience to Hitler's orders I actually directed sixth Army to begin to break out of Stalingrad & make a junction with the 4th Panzer Army. This was our one and the only chance of saving the Sixth Army. "

[ १९ डिसेंबरला हिटलरच्या आज्ञेविरुद्ध जाऊन मी स्टॅलिनग्राडमधील सहाव्या सेनेला स्टॅलिनग्राडमधून बाहेर पडून चौथ्या पॅन्झर तुकडीशी संपर्क साधण्याची आज्ञा सोडली. सहाव्या सेनेला वाचविण्याची ही अखेरची एकमेव संधी आलेली होती. ]

२१–२२ डिसेंबरला जनरल पोलस हा स्टॅलिनग्राडमधून बाहेर पडण्याची काहीच हालचाल करीत नाहीसे पाहून, मॅन्स्टीनने चौथ्या पॅन्झर तुकडीचा सेनानी जनरल हॉथ याला स्टॅलिनग्राडपर्यंत पोचण्याचा नाद सोडून मागे हटण्यास सांगितले. याला कारण जनरल हॉथच्या पॅन्झर तुकड्यांनाही कोंडीत पकडण्याची हालचाल रशियन सेनेने सुरू केली होती.

मॅन्स्टीनने अशारीतीने स्टॅलिनग्राडभोवती पडलेला रशियन सेनेचा फास तोडण्याचा प्रयत्न २२ डिसेंबरला रात्री सोडून दिला !

स्टॅलिनग्राडच्या भूमीत असंख्य जर्मन सैनिकांना रुधिरस्नान घडणार ही गोष्ट आता अटळ ठरली.

बिचारा जनरल पोलस ! स्टॅलिनग्राड १० नोव्हेंबरच्या आत घेतो म्हणून फ्यूररला वचन देऊन धाडसाने शहराला विळखा देऊन बसला व ससैन्य कोंडला गेला. फील्ड मार्शल मॅन्स्टीनचा संदेश त्याला मिळाला होता, परंतु फ्यूररचा संदेशही होता—स्टॅलिनग्राड सोडू नका ! पोलस गोंधळात पडला व जर्मन सैन्य वाचवण्याची अखेरची संधी संपली.

२५ किंवा २६ डिसेंबरला जनरल झेइट्लेर याने हिटलरला सांगितले—

" कॉकेशसमधून वेळीच माघार घेतली गेली नाही, तर दुसरे स्टॅलिनग्राड कॉकेशसमध्ये आता अटळ आहे. "

यावेळी मात्र चार दिवसांच्या विचारानंतर २९ डिसेंबरला हिटलरने ग्रोझनीच्या दिशेने पुढे गेलेल्या फील्ड मार्शल क्लीस्टच्या सैन्याला मागे फिरण्याचा हुकूम दिला.

## ६,००० घोडी फस्त केली

१९४२ साल उगवले, तेव्हा हिटलरची सैन्ये स्टॅलिनग्राडवर पंजा टाकून कॉकेशसची दारे ठोठावीत होती, परंतु ४२ साल मावळण्याच्या सुमारास सुमारे २,७०,००० जर्मन सैन्य स्टॅलिनग्राडमध्ये मृत्यूच्या दाढेत देऊन जर्मन सैन्य कॉकेशसचा नाद सोडून मागे फिरल्याचे दृश्य जगाला दिसले.

नाताळ तोंडावर आला होता, परंतु कोंडलेल्या जर्मन सैन्याला अन्नाची भ्रांत होती. जर्मन सैन्याबरोबर सुमारे १२,००० घोडे टॅंक्स ओढण्यासाठी असलेले सैन्या-बरोबरच आत कोंडले गेलेले होते. सैन्याला नाताळच्या दिवशी उपास पडू नये म्हणून यांतली ६००० भुकेने व्याकूळ झालेली उमदी घोडी कापण्यात आली. घोड्याच्या मासाचे सूप जर्मन सैन्याने ओरपून नाताळचा दिवस भरल्या पोटाने काढला.

नाताळ संपला. कोंडीबाहेरील जर्मन सैन्ये स्टॅलिनग्राडपासून पश्चिमेकडे आता रोज मागे मागे सरकत होती. ही सैन्ये पुरेशी मागे जाताच स्टॅलिनग्राडची कोंडी करणारा रशियन सेनापती रोकोझोव्स्की ( Rokossovski ) याने दोन्ही बाजूंची रक्तहानी टळावी म्हणून ८ जानेवारीला एका तरुण रशियन लष्करी अधिकाऱ्याच्या हातात पांढरे निशाण देऊन, त्याने त्याला उत्तर स्टॅलिनग्राडमधून आत पाठवून जनरल पोलसच्या हाती निर्वाणीचा खलिता ठेवला. या खलित्यात त्याने लिहिले होते——

" तुमच्या सैन्याची परिस्थिती दयनीय आहे. भूक, आजारीपणा व थंडी यांमुळे सैन्य दुर्बल झालेले आहे. काळीज नसलेला रशियन हिवाळा तर अद्याप पुरता सुरुही झालेला नाही. तुमची परिस्थिती निराशाजनक आहे व अधिक प्रतिकार आत्मघातक ठरणार आहे. याचा विचार करून व निरर्थक रक्तपात होऊ नये म्हणून तुम्ही शरणागतीच्या पुढील अटी स्वीकाराव्या—"

## अखेरच्या सैनिकापर्यंत लढा

शरणागती ! त्यासाठी अटी ! ! युद्ध सुरू झाल्यापासून हिटलरच्या सैन्याने शरणागती पत्करलेली नव्हती. एल् अलेमिनमध्ये जवळजवळ ६०,००० सैन्य मारले वा जखमी झाले, परंतु रोमेलने शरणागती दिलेली नव्हती. जनरल रिटरचा अपवाद सोडला, तर आतापर्यंत एकही जर्मन सेनानी शरण गेलेला नव्हता. रशियाच्या अटी फारशा कडक नव्हत्या, परंतु शरणागतीची अट हीच मुळी हिटलरला मरणप्राय दुःख देणारी ठरेल, याची पोलसला जाणीव होती.

२४ तासांची अंतिमोत्तराची मुदत १० जानेवारी १९४३ ला संपली व स्टॅलिनग्राडच्या लढाईतील भीषण पर्व सुरू झाले. पाच हजार रशियन तोफा कोंडल्या गेलेल्या जर्मन सैन्यावर सर्व बाजूंनी भडिमार करू लागल्या. सहा दिवसांच्या भडिमारानंतर सुमारे तीस मैलांच्या परिसरात सुरू झालेली घनचक्कर लढाई १५ मैलांच्या पट्ट्यात आकुंचित झाली. जखमींना उचलण्यासाठी जर्मन विमानांना आता उतरायलाही जागा उरली नाही. हा १५ मैलांचा जर्मन ठिपका—तरीही २४ जानेवारीपर्यंत लढतच होता. २४ जानेवारीला जनरल पोलसला, आपल्या सैन्याच्या उडणाऱ्या चिंधड्या पाहवेनात. त्याने हिटलरला रेडिओ—संदेश पाठवला—

" १८,००० जखमींना ड्रेसिंग नाही की औषधपाणी नाही. प्रतिकार व्यर्थ आहे. पराभव अटळ आहे. शरणागतीची परवानगी द्या ! "

हिटलरचा संदेश आला—

" Surrender is forbidden— शरणागतीला परवानगी नाही. अखेरच्या सैनिकापर्यंत लढा. "

## शरणागती की आत्महत्या ?

१९४३ चा जानेवारी महिना संपत आला व स्टॅलिनग्राडचा हा भीषण रणसंग्राम संपुष्टात येऊ लागला. मेण संपत आलेली मेणबत्ती ज्याप्रमाणे विझता विझता तडतडते व मालवते, त्याप्रमाणे ही लढाई संपली. जर्मन सैन्याचे आता तीन छोटे छोटे भाग झाले होते. परस्परसंबंध तुटला होता. एका तळघरात डोके सुन्न होऊन जनरल पोलस बसला होता.

३० जानेवारी, १९४३ उजाडला. नाझी राजवटीचा आज दहावा वर्षदिन होता. रात्री रेडिओवरून येणारा राईश मार्शल—हर्मन गोअरिंगचा आवाज जनरल पोलसनेही ऐकला.

" हजार वर्षे लोटली तरी जर्मन जनता स्टॅलिनग्राडच्या युद्धाची आठवण काढताच आदराने भारावून जाईल...जर्मनीच्या अंतिम विजयाचा निर्णय या लढाईने लागला असे भविष्यात लोक सांगतील..."

गोअरिंग रेडिओवरून हे सांगत असताना हिटलरच्या खास घोषणेप्रमाणे पोलसला फील्ड मार्शल करण्यात आल्याचे वृत्त प्रसृत करण्यात आले. पोलस-

व्यतिरिक्त ११७ अधिकाऱ्यांना पदके व बढत्या जाहीर झाल्या.

३१ जानेवारी, १९४३ ला फील्ड मार्शल पोलस व जनरल श्मिद हे सुन्न मनाने बसले असता, ती इमारत रशियनांनी काबीज केली. रशियन सैनिक तळघरात आलेले पाहताच जनरल श्मिदने शरणागती पत्करली. चोवीस तासांपूर्वी फील्ड मार्शल झालेल्या पोलसला त्याने विचारले—

"फील्ड मार्शलसाहेबांना काही सांगायचे आहे काय ?"

पोलसने सांगितले– "त्यांना सांगा, शरणागती स्वीकारण्यासाठी माझ्या तोलाचा रशियन लष्करी अधिकारी घेऊन या...म्हणजे मी स्वाधीन होतो—"

पोलसच्या तोंडून अधिक शब्द फुटत नव्हता. त्याने मान खाली घातली व तो फक्त उभा राहिला. रशियन सैनिकांनी काही वेळाने एका वरच्या रशियन अधिकाऱ्याला आणण्यात यश मिळवले व पोलस गिरफदार झाला.

१ फेब्रुवारी, ११४३ ला स्टॅलिनग्राड पडले. २ फेब्रुवारीला स्टॅलिनग्राडवर घिरटचा घालणाऱ्या जर्मन विमानाने दुपारी २।। वाजता रेडिओसंदेश दिला—

"No sign of any fighting in Stalingrad"

[स्टॅलिनग्राडमध्ये लढाई चालू असल्याचे चिन्ह दिसत नाही.]

स्टॅलिनग्राडचा भीषण संग्राम संपला होता. या आघाडीवरील २,८५,००० सैन्यापैकी फक्त ९१,००० जर्मन सैनिक युद्धकैदी बनून अपुऱ्या कपडचानिशी कडाक्याच्या थंडीतून सायबेरियातील युद्धकैद्यांच्या छावणीची वाटचाल करू लागले. जवळजवळ २९,००० जखमी सैनिकांना लुप्तवाफने स्टॅलिनग्राडमधून बाहेर काढले होते. या व्यतिरिक्त २०,००० रुमानियन सैन्य कोंडीतून रशियन जबडे मिटण्यापूर्वी निसटले होते. १,४०,००० सैन्याचा असा हिशेब लागतो. बाकी सर्व १ लाख ४५ हजार जर्मन सैन्य मारले गेले. पकडल्या गेलेल्या ९१,००० जर्मन सैनिकांपैकी ५०,००० सैनिक युद्धछावणीच्या दिशेने पायी चालताना दोन महिन्यांच्या अवधीत मरण पावले. उरलेल्या सुमारे चाळीस हजारांपैकी युद्ध संपल्यावर फक्त ३–४ हजार परत आले. बाकीच्यांचे काय झाले ? त्यांना रशियाच्या तुरुंगात मृत्यूने गाठले असेच समजले पाहिजे.

स्टॅलिनग्राडला फील्ड मार्शल पोलस व जनरल श्मिद हे रशियनांच्या हाती पडले, ही गोष्ट हिटलरला कळली, तेव्हा प्रशियातील आपल्या युद्धछावणीत हिटलर संतापाने बेभान झाला. त्यावेळी तेथील सेनानींना उद्देशून तो जे जे बोलला, त्याचे टिपण उपलब्ध आहे. पोलससंबंधी हिटलर बोलत होता–

"The man should have shot himself. You have to imagine, he will be brought to Moscow & there imagine that rat-trap there. Then he will sign anything. He will make confessions, make proclaimations–you will see..."

" What is life ? Life is Nation. The individual must die anyway. Beyond the life of the individual is the Nation."

" What hurts me most personally is that I still promoted him to Field Marshal. I wanted to give him his satisfaction. That is the last Field Marshal I shall appoint in this war."

[पोलसने स्वत:ला गोळी घालून मरण पत्करावयास हवे होते. कल्पना करा, आता त्याला मॉस्कोला नेतील आणि तिथल्या उंदीर-सापळ्यात तो अडकेल. तिथे त्याला कशावरही सही करायला लावतील. तो कबुली-जबाब देईल, जाहीर निवेदने करील–पाहालच आता.

**आयुष्य हे अखेर काय आहे ? आयुष्य हेच राष्ट्र असते. व्यक्ती अखेर मरणारच असते, परंतु व्यक्ती संपली तरी राष्ट्र उरतेच.**

मला व्यक्तिश: याचेच दु:ख होते, की मी त्याला फील्ड मार्शल म्हणून बढती दिली. त्याला अखेर हे तरी समाधान मिळावे, अशी माझी इच्छा होती. यापुढे कुणालाही या युद्धात मी फील्ड मार्शल करणार नाही... ]

## स्टॅलिनग्राड कुठे आहे ?

हिटलरच्या सैन्याचे ' एल् अलेमिन ' व ' स्टॅलिनग्राड ' या दोन ठिकाणी पाठोपाठ झालेले हे प्रचंड लष्करी पराभव दुसऱ्या महायुद्धाचे पारडे फिरवणाऱ्या महत्त्वाच्या घटना आहेत. चढाईची लढाई आता हिटलरच्या हातातून निसटली ती कायमची. त्याचे शत्रू आता आक्रमक होऊ लागले. चढाई यापुढे दोस्त सैन्ये आखू लागली व युरोपातील असंख्य शहरांना बेचिराख करीत असताना तेथील स्त्री–पुरुष अभकांच्या वाटचाला जे दु:ख आले, तेच दु:ख आता जर्मनीतील जनता हळूहळू अनुभवू लागली. दोस्तांनी जर्मनीवर आता मोठ्या प्रमाणावर बॉम्बहल्ले सुरू केले. ब्रिटिश–अमेरिकन व रशियन विमाने आता हिटलरच्या देशावर आग टाकू लागली.

स्टॅलिनग्राडच्या बर्फात आणि उत्तर आफ्रिकेच्या तापलेल्या रेताड वाळवंटात नाझीचे विस्तारवादाचे प्रचंड व भयंकर असे स्वप्न ठिकऱ्या होऊन पडले.

## हे स्वप्न खरोखरच भयंकर होते

तिसऱ्या राईशचा अखेर जो बिमोड झाला, त्याला पोलस व रोमेल यांची रणांगणावर उडालेली दाणादाणच केवळ कारणीभूत नसून, नाझीव्याप्त प्रदेशात नाझीशाहीने जे क्रौर्याचे थैमान घातले व संहार केला, तोही कारणीभूत आहे. युरोपची ' नवी घडी ' (New roder) बसविण्यासाठी ही निर्दय नाझी योजना. तिसऱ्या राईशच्या त्वरित झालेल्या विध्वंसामुळे फार काळ चालू राहिली नाही हे खरे, परंतु अल्पकाळात नाझींनी घातलेल्या थैमानाची ओळख असणे अवश्य आहे. ही ओळख पुढील अंकी.

●

[ अपूर्ण ]

## □ देव आणि माणूस

इंग्लंडमध्ये चर्चमध्ये जाणारांची संख्या कमी 'होऊ लागली असली तरी त्याचा अर्थ लोक नास्तिक बनत चालले आहेत असा नाही, असा निष्कर्ष लिस्टर विद्या-पीठातील मानसशास्त्राचे प्राध्यापक डेरेक राइट यांनी एका पाहणीनंतर काढला आहे. कॉलेजविद्यार्थ्यांच्या मदतीने त्यांनी ही पाहणी केली. पाहणी केलेल्या लोकां-पैकी फक्त ४१ टक्के लोक चर्चमध्ये दर आठवडचास किंवा महिन्याने जात होते. बत्तीस टक्के नागरिक गेल्या वर्षात चर्चमध्ये कधीच गेले नव्हते आणि वर्षातून फक्त एक ते पाचवेळा जाणारांचे प्रमाण २७ टक्के होते.

चर्चमध्ये आम्ही सवयीने जातो. तेथे आम्हाला - आध्यात्मिक समाधान मिळते. त्या वातावरणातच आम्ही वाढलो, असे उत्तर चर्चमध्ये जाणाऱ्या बहुसंख्य लोकांनी दिले तर चर्चमध्ये न गेल्याने काही विशेष मूल्यांना आपण मुकलो असे वाटत नाही असे उत्तर चर्चला न जाणारांनी दिले. आपण चर्चमध्ये कधीच जाणार नाही का असे विचारता यांपैकी फक्त निम्म्या लोकांनी नकारार्थी उत्तर दिले. चर्चमध्ये आपण जात नसलो तरी देवावर आपली श्रद्धा आहे असे तीनचतुर्थांशजणांनी सांगितले. चर्चेस नसतील तर चांगले होईल असे मत एकानेही व्यक्त केले नाही, पण चर्चेस असली किंवा नसली काय, त्यामुळे विशेष फरक पडणार नाही, असे दहा टक्के लोकांचे मत होते. चर्चेस नसली तर नैतिक अध:पात होईल असे ४० टक्के लोकांना वाटते.

## ● रशियात धोरणाचा फेरविचार

कम्युनिस्ट म्हणजे कट्टर धर्मविरोधी व नास्तिक, पण आपल्या धर्मविरोधी मोहि-मेचा रशियन कम्युनिस्ट नेते नव्या दृष्टीने विचार करू लागले आहेत. धर्मविरोधी मोहिमेत आतापर्यंत चर्चेस बंद करण्यावर भर होता, पण चर्चेस बंद केल्याने उलट लोकांचे धर्माविषयीचे आकर्षण वाढते, असे मत 'कोमसोमोल्स्काया प्रावदा' पत्रातील एका पत्रात व्यक्त केले आहे. ल्व्होव्ह या रोमन कॅथॉलिकांची वस्ती असलेल्या शहरात नास्तिकतेचा प्रचार करणाऱ्या एका कार्यकर्त्याने हा लेख लिहिला आहे. तो लिहितो, 'रशियाच्या अनेक भागांत आता चर्चेस किंवा धर्मोपदेशक नाहीत हे खरे, पण यावरून लोकांचा चर्चवरचा, देवावरचा विश्वासच उडाला, असे समाधान मानणे ही आत्मवंचना होईल.' अनेक वर्षे धर्मविरोधी प्रचार सतत चालू असताही अनेक लोकांच्या घरात मूर्ती आढळतात, याचा उल्लेख रशियन

समाजजीवनाची पाहणी करणाऱ्या एका रशियन प्राध्यापकाने यापूर्वीच आपल्या लेखातून केला आहे.

केवळ नकारात्मक भूमिका घेऊन धर्मविरोधी मोहीम यशस्वी होणार नाही. कम्युनिस्ट आणि ख्रिस्ती यांच्यात आपल्या विचारांची खुली देवघेव झाली पाहिजे असे मत इटालियन कम्युनिस्ट पक्षाचे नेते सिनॉर पामिरो टोगलिॲट्टी यांनी आपल्या शेवटच्या धोरणविषयक निवेदनात व्यक्त केले होते. त्याचा प्रभाव अलीकडच्या रशियन विचारवंतांवर दिसतो.

धर्म ही अफूची गोळी आहे, या कार्लमार्क्स यांच्या मतावर भर देऊन कडवी धर्मविरोधी प्रचारमोहीम रशियात करण्यात आली. पण आता सामाजिक प्रगती व समाजवादाशी धर्माचे अस्तित्व विसंगत असतेच असे नाही, असा विचार 'कोमसोमोलस्काया प्रावदा' मधील लेखात मांडला आहे. नास्तिकवादी प्रचारकांची बौद्धिक तयारी फार कमी असते, कॅथॉलिक धर्मोपदेशकांशी होणाऱ्या वादात ते टिकत नाहीत, अशी स्पष्ट कबुली एका प्रचारकाने काही आठवड्यांपूर्वी याच पत्रात लिहिलेल्या लेखात दिली आहे. माणसाची आत्मिक भावनात्मक गरज चर्च भागविते. अशी गरज भागविणारे आपण काहीतरी दिले पाहिजे. चर्चचे संस्कार व प्रार्थनापद्धतीची जागा घेऊ शकणारी नवी संस्कारपद्धती आपण लोकांना देऊ शकणार नाही काय, असा प्रश्न लेखकाने या लेखात विचारला आहे.

एखाद्या देशात जनतेतील बराच मोठा वर्ग धर्म मानीत असेल, तर तेथे समाजवाद येणारच नाही, असे मार्क्सवाद्यांनी कधी मानलेले नाही असे मत प्रतिपादणारे स्पॅनिश व इटालियन कम्युनिस्टांचे लेख 'दि वर्ल्ड मार्क्सिस्ट रिव्ह्यू'च्या अंकात प्रसिद्ध झाले असून रशियन विचारवंत त्याचा अभ्यास करीत आहेत. ●

## कालाय तस्मै नमः

क्रान्तियुद्धात झारच्या फौजांचे पारिपत्य करण्यात यश मिळवलेल्या जनरल स्टॅलिनचे नाव ज्या शहराला देण्यात आले व ज्या ठिकाणी हिटलरच्या सैन्याचा सर्वात मोठा लष्करी पराभव मार्शल स्टॅलिननेच घडवून आणला, त्या स्टॅलिनग्राडचे आजचे नाव आहे व्होल्गोग्राड ! क्रुश्चेव्ह-कृपेने युद्धानंतर अलीकडे स्टॅलिनच्या पापविसर्जनाचा जो मोठा कार्यक्रम रशियात आखण्यात आला, त्यात स्टॅलिनग्राडचे व्होल्गोग्राड झाले आहे. कालाय तस्मै नमः ।

ता. क.– ब्रेझनेव्ह-कोसिजिन यांच्या कारकीर्दीत व्होल्गोग्राडचे नामकरण पुन्हा 'स्टॅलिनग्राड' असे झाले आहे. कालाय तस्मै नमः ●

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>राजहंस | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्रकाशन, पुणे. |

MANOOS (Fortnightly) : 15 Sept. 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**